कोणत्याही वस्तूचा साजेसा शिणगार केल्याखेरीज त्या वस्तूची शोभा वाढत नाही. नवीन टेबल आणले की त्यावर सुंदरसा टेबलक्लॉथ हवा. नुसत्या टेबलक्लॉथने भागत नाही. त्यावर फूलदानही हवी. पण ह्या खुर्च्या आहेत ना. नवीन टेबलाला शोभा देत नाही, लेटेस्ट फॅशनच्या खुर्च्या ठेवा, मग बघा खोली कशीं उठून दिसेल, पण ह्या दारं-खिडक्यांनी पेलमेट बसवून घ्या, नि छानसें पडदे. आमचेही असेच झाले. मंदिराचे बांधकाम जसजसे शिखराकडे झेप घेऊ लागले तसतश्या आमच्या मनातील भावना बांध फोडून बाहेर यायला लागल्या. श्री बबनरावजी कहाते यांनी वेदीचें समोरील संपूर्ण भागात संगमवरी वेदी दिली. श्रीमतीं आशाताई मनोहरराव भुसारी यांनी पद्मावती देवीला संगमवरी वेदी दिली. श्री बबनरावजी कुकेकर यांनी मंदिरचे वर बाहुबलीची ४ फुट उंच खड्गासन मूर्ती देण्याचा संकल्प केला आणि भ. बाहूबलीच्या या मुर्तीसाठी श्री सुरेश बजाज यांनी संगम-वरी वेदी देण्याचा संकल्प जाहीर केला. ही स्मरणिका प्रकाशित होईतो कदाचित हे दोन्ही संकल्प प्रत्यक्षात उतरलेले असतीलही.' कि ती घेशील दो करांनी --- या ओळीची जाणीव झाल्याशिवाय राहत नाही प्रत्येक वेळी समा-जाने मंदिराच्या विकासाच्या प्रत्येक कामात भरघोष पैसा दिलाः मंदिराचा टप्याटप्याने होणारा विकास हेच दर्शवितो की. वर्धेचा दि. जैन समाज हा आर्थिक दृष्ट्या दिवसेदिवस अधिकाधिक सुदृढ होत चालला आहे, शिखरा-वर आज चकाकणारा पितळेचा कलश कदाचित उद्या सोन्याचाही होईल, यात शंका नाही. सुगीचे दिवस आहेत.

* *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्री सुपार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर, वर्धा



वर्धा शहराच्या प्रमुख बाजाराजवळ सराफा ओळीत हे मंदिर आहे. या मंदिराचे निर्माण च प्राण प्रतिष्ठा सन १९०२ मध्ये झालीं. या ठिकाणी एक लहानसे आदिनाथ दिगंबर जैन मंदिर होते. परंतु हे जुने मंदिर कोणत्या जागी होते व त्याचे निर्माण कोणी केले. याची माहिती मिळत नाही. त्यातील मूर्ती या नव्या मंदिरात पुनः स्थापन करण्यात आल्या असाव्यात असे वाटते.

या मंदिराचा पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव सन १९०२ मध्ये संपन्न झाला. मंदिराच्या निर्माण कार्यांत स्व. श्री बकारामजी रोडे यांचे विशेश योगदान होते. त्यांनी दिलेल्या आपल्या घराजवळच्या जागेत मंदि-राचे निर्माण झाले. प्रतिष्ठा कार्य आणि गजरथ आदि व्यवस्था नामपूरचे सिंघई स्व. श्री गुलाबसावजीं यांनी केली. प्रतिष्ठा महोत्सव वर्धा येथील गोरक्षण संस्थेजवळच्या शेतात कारंजाचे भट्टारक स्वस्तिश्री देवेंद्रकीर्तिजी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. मंदिराची प्राणप्रतिष्ठा महामहोपाध्याय पं. रामभाऊजी यांच्या तत्त्वावधान झाली.

या मंदिरात चार वेदी आहेत. मुख्य वेदी भव्य व विशाल आहे. मूलनायक प्रतिमा सहावे तीर्थंकर श्री सुपार्श्वनाथ यांची आहे. मंदिराच्या तळघरात एक वेदी आहे. तेथील मुख्य प्रतिमा भगवान आदिनाथाची आहे. एक वेदीवर भगवान शांतिनाथाची मूर्ती विराजमान आहे. वेदीवर सुवर्ण आणि काच–काम सेठ बन्सीलालजी पाटणी आणि त्यांची धर्मपत्नी सौ. दातारबाई यांनी करविली आहे. दुसऱ्या मजल्यावरील वेदीवर भ. पार्श्वनाथाची मूर्ती विराजमान आहे. या वेदीचे घुंगट आदि काम स्व. चिरजीलालजी बडजाते यांनी आपली मातोश्री स्व. सगुणाबाई यांच्यातर्फे करवून घेतले.

मंदिराच्या निर्माण कार्यात रोडे, चवडे बडजाते, पाटणी. श्रावणे परिवाराचा विशेष योगदान होते. स्व- श्री रामासावजी रोडे हे प्रमुख श्रावक होते. ते मुख्य वेदीवर नियमितपणे पूजा अर्चा करीत. स्व श्री दौलतरामजी खजानची यांनी मंदिराला मोठी घंटा दिली, तळघराला दार लावून दिले होते. मंदिरात जुन्या काळापासून शास्त्रसभा नियमितपणे सुरू आ मंदिर समितीतर्फे खालील उपक्रम सुरु आहेत.

१) होमिओपॅथिक दवाखाना

मंदिरातर्फे जवळच असलेल्या दिगंबर जैन बोर्डिंग हाऊस मध्ये गेल्या ८–९ वर्षांपासून एक होमिओपॅथिक दवाखाना चालविण्यात येतो. वर्धा येथील प्रसिद्ध होमिओपॅथ डॉ. भोंगाडे व डॉ. सौ. लताताई जुननकर दर गुरुवारी यांची निःस्वार्थ सेवा मिळते.

२) सुगणाबाई ग्रंथालय व वाचनालय

स्व. चिरंजीलालजी बडजाते यांनी आपली माता स्व. सुगणाबाई यांच्या नावाने ग्रंथालय व वाचनालय सुरू केले होते. तसेच सुगणाबाई ग्रंथमालाही सुरु केली होती. ग्रंथालयात हिंदी, मराठी व इंग्रजी भाषेतील अनेक ग्रंथ आहेत हे ग्रंथालय संध्या दिगंबर जैन बोर्डिंग हाऊस मध्ये आहे. या ग्रंथालयाला पं जमनालालजी जैन यांनी आपले साहित्य व आलमाऱ्या भेट म्हणून दिल्या आहेत.

३) पुस्तक पेढी

श्री सुपार्श्वनाथ दि. जैन मंदिर तर्फे पुस्तक पेढी चालविण्यात येथे गरीब व होतकरू जैन विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके विनामूल्य दिली जातात.

४) धर्मशाळा

श्री दिगंबर जैन बोर्डिंग हाऊसच्या मागे मंदिराची ३० फुट X ७० फूट रिकामी जागा होती- जवळच दोन खोल्या आणि विहीर होती. तेथे धर्मशाळा सुरू करण्याचे मंदिर कमेटीने ठरविले त्याकरिता नागपूरचे स्व. उदयकुमारजी पोहरे आणि हैद्राबादचे श्री पहाडे यांनी दान दिले. आता पर्यंत तीन लाख

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रुपयाचे काम पूर्ण झाले आहे. धर्म शाळेत भाडी, बिछायत आदि सर्व आवश्यक सामान उपलब्ध आहे. या धर्मशाळेच्या योजनेत श्री राजेन्द्र भागवतकर यांचा विशेष सहयोग मिळाला आहे. विवाह समारंभ, शिबिरे, सामाजिक कार्यक्रम आदि करिता तिचा विशेष उपयोग होतो.

वर्तमान पदाधिकारी

१. प्रा. महावीर मंगलचंदजी पाटणी, अध्यक्ष
२. श्री अनिलकुमार जयकुमार फरसोले, उपाध्यक्ष
३. श्री देवेंद्र फूलचंदजी बडजाते, सचिव
४. श्री संजय शांतिलालजी सिंगारे, सहसचिव
५. सौ. साधना रवींद्र बन्नोरे, सहसचिव
६. श्री घनश्याम बापुराव सावळकर, कोषाध्यक्ष

व अन्य १३ सदस्य गण

प्रा. महावीर पाटणी
अध्यक्ष,
श्री सुपार्श्वनाथ दि. जैन मंदिर, वर्धा

* *

हार्दिक शुभेच्छा !

वर्धा जिल्हा शेतकरी सूतगिरणी कामगार व कर्मचारी पतसंस्था मर्या. वर्धा

र. नं. ३४२

अध्यक्ष
प्रमोद घोडे

सचिव
अशोक चौधरी

आमच्या हार्दिक शुभ कामना

मे. श्रावणे ॲन्ड सन्स

आधुनिक रेडीमेड गारमेंन्टस विक्रेता

टिळक चौक, वर्धा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्री दिगंबर जैन बोर्डिंग हाऊस, वर्धा

आज से लगभग ७०–८० वर्ष पहले शिक्षण संस्थाओं का नितांत अभाव था। सरकारी स्कूल भी कम, केंवल जिल्हा केन्द्रों पर ही होते थे। वर्धा मे हाईस्कूल तक की ही पढाई होती थी। एक सरकारी स्कूल क्रॅडॉक हाईस्कूल था। मारवाडी विद्यालय मारवाडी शिक्षा मंडल (अब शिक्षा मंडल) की ओर से चलता था। सन १९२५ में स्थापित मारवाडी शिक्षा मंडल द्वारा अन्य गाँवों में प्रायः प्रायमरी तक ही पढाई की व्यवस्था थी। बाहर से पढने के लिए आनेवाले छात्रों के रहने की समुचित व्यवस्था नहीं थी। जैन विद्यार्थियों को भी कष्ट होता था। उन दिनों जैन समाज के महानुभावों के मन मे विचार आया कि जगह–जगह बोर्डिंग हाऊस बनें तो छात्रों को रहने के सुविधा हो सकती हैं। इस पुण्य-कार्य में बंबई के सेठ माणिकचंदजी जे. पी. का योगदान बडा ही महत्त्वपूर्ण रहा। वर्धा में जो बोर्डिंग हाऊस बना, वह तीन मंजिला भवन है। उन दिनों जिले के पुलगांव, आर्वी, देवली आदि विभिन्न स्थानों के छात्र इस बोर्डिंग हाऊस में रहकर विद्याध्ययन करते थे।

इस बोर्डिंग हाऊस की स्थापना आश्विन (भाद्रपद) कृष्ण ६, संवत् १९६९ दिनांक २ अक्टूबर १९१२ के शुभ मुहूर्त पर सेठ माणिकचंदजी जे. पी. की अध्यक्षता में हुई। नागपूर के पं. हीरालालजीने सरस्वती पूजन किया। श्री जयकुमारजी चवरे वकील के विद्यादान विषयक प्रभावशाली भाषण से तत्काल रु. १५,००० के दान की घोषणा हुई।

आजकल बोर्डिंग हाऊस का उपयोग ब्याह–शादी, जन्म–मरण आदि के प्रसंगों पर भी श्रावकों द्वारा होता हैं। बीच शहर में स्थित यह बोर्डिंग हाऊस वर्धा के दिगंबर जैन समाज की एक अनमोल धरोहर है। उक्त बोर्डिंग हाऊस के निर्माण मे सेठ जमनालालजी बजाज के परिवार का भी पर्याप्त सहयोग रहा। प्रारंभ के वर्षो में बोर्डिंग हाऊस के मंत्री श्री जयचन्द्रजी श्रावणे थे, जिन्होंने बडी लगन से तथा उत्साह से अपनी सेवाएँ दीं।

अनेकान्त स्वाध्याय मंदिर तथा योग व निसर्गोपचार केन्द्र

श्री दिगंबर जैन बोर्डिंग की भूमि पर योगासन वर्ग १ जनवरी १९८२ से नियमित चलता है, जिसमें लगभग ३०–३५ स्त्री पुरूष प्रतिदिन नियमित रूप से आकर योगासनों का अभ्यास करते है। साथ में प्राकृतिक चिकित्सा का भी प्रबन्ध हैं। योगासन के साथ–साथ स्वाध्याय भी चलता है। स्वाध्याय योगासन का ही एक द्वारा मन की।

यह सब गतिविधियाँ दिगंबर जैन बोर्डिंग हाऊस, वर्धा द्वारा चलाई जाती है। योग, निसर्गोपचार केन्द्र तथा अनेकान्त स्वाध्याय मंदिर शुरू करने का श्रेय डॉ. प्रियकरजी जैन के मार्गदर्शन में डॉ. भालचन्द्र नेटके को हैं। निःस्वार्थ भाव से यह कार्य बडे उत्साह के साथ कर रहे है। श्री दिगंबर जैन बोर्डिंग हाऊस के वे एक ट्रस्टी हैं। महिलाओं के प्राकृतिक उपचार में श्रीमती सुलोचनाबाई जैन का योगदान मयत्त्वपूर्ण रहा।

क्रोधाच्या उदरी जन्म संमोहाचा निरंतर।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अनेकान्त स्वाध्याय मंदिर परिसर मे कमरे, परिसर के फेंसिंग, कुँआ, गेट, हॉल तथा कंपाऊंड आदि के लिए समाज की ओर से रु. २९,७४१ की सहायता प्राप्त हुई है। जिसमे स्व. चिरंजीलालजी बडजाते परिवार का विशेष योगदान रहा।

निवृत्त-निकेतन योजना :

अनेकान्त स्वाध्याय मंदिर की योजना निवृत्त-निकेतन की है। योजना यह है कि संस्था के परिसर मे ऐसे प्रतिभावान व सेवाभावी लोग आकर बसें और अपनी मूल्यवान सेवाएँ नयी पीढी को प्रदान करें, जो अपने कार्यक्षेत्र से निवृत्त हो गये है और शांतिपूर्ण जीवन की आकांक्षा रखते हैं। ऐसे महानुभाव परिसर मे अपना आवास बनाकर रहें, ताकि प्रकृति के खुले वातावरण में उन्हें आध्यात्मिक शांति के साथ कर्मयोग का सात्विक आनन्द भी प्राप्त हो सके।

सन्मति बालक मंदिर :

श्री दिगंबर जैन बोर्डिंग हाऊस वर्धा के तत्वावधान में सन १९८४ में बडजाते ट्रस्ट के आर्थिक सहयोग से सन्मति बालक मंदिर वहीं टिन के शेड मे शुरू किया गया। शुरू-शुरू मे बहुत परेशानी सहन करनी पडी।

इसमे बालकों को अच्छी शिक्षा तथा संस्कार दिये जाते थे। उसी समय सन १९८५ में एक अकल्पनीय घटना घटी। बालकमंदिर की कार्यपद्धतीसे प्रभावित होकर अॅड. श्री कांवळेजी दम्पतिने शिशुविहार का २५,००० रु. का साहित्य सन्मति बालक मंदिर को प्रदान किया। आज करीब १६० बाल बालिकाये मंदिर मे संस्कार प्राप्त कर रहे है।

सन्मति बालोद्यान :

बोर्डिंग हाऊस की भूमि में अनेकान्त स्वाध्याय मंदिर मंदिर के निकट सन्मति बालोद्यान का निर्माण हो रहा है। इसके लिए डॉ. जयंत जुननकर एवं उनकी धर्मपत्नी डॉ. सौ. लताबाई जुननकर प्रयत्नशील हैं। आपने अपनी काकी श्रीमती केशरबाई की स्मृति में बालोद्यान के विकास के लिए पाच हजार प्रदान किये है।

भगवान महावीर उद्यान :

नगर के मध्य में नगरपरिषद एवं महाराष्ट्र शासन के सौजन्य से भगवान महावीर की पच्चीससौवे निर्वाण महोत्सव की स्मृति मे भगवान महावीर कीर्तिस्तंभ-उद्यान का निर्माण किया गया। यह उद्यान रामनगर में गंगासागर पानी की टंकी के पास हैं, जो इस नगर का आकर्षण केंद्र है। कीर्तिस्तंभ का निर्माण भी जैन समाज के उत्साही कार्यकर्ताओंने पूरा कर इस उद्यान को भव्यता प्रदान की है।

प्रेषक :-

मूलचंद गुलाबचंद बडजाते
अध्यक्ष
दि. जैन बोर्डिंग हाऊस, वर्धा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्री नवखंड पद्मावती सहित श्री पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर, रामनगर, वर्धा



– विनायकराव भुसारी

श्री नवखंड पद्मावती सहित भ. १००८ पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिराची स्थापना सन १९८५ साली झाली. श्री पार्श्वनाथ तीर्थंकराच्या मूर्तीचे पंचकल्याणक छिंदवाडा येथे झालेल्या पंचकल्याणक महोत्सवात करण्यात आले. त्यानंतर दिनांक २७–२–१९८५ रोजी मंदिरमध्ये वेदी प्रतिष्ठा करून श्री पार्श्वनाथ प्रभूची मूर्ती स्थापित केली.

समाजात प्रेमभाव, अक्षय सुख-शांति लाभावी, आत्मशोधन व्हावे स्वाध्यायाची आवड निर्माण व्हावी, स्वःपराची ओळख होऊन कर्माची निर्जरा व्हावी व शुद्ध आत्म्याचे निरंजन दर्शन घडावे हा उद्देश ठेवून एक अल्पसा प्रयत्न साकार झाला व हे लहानसे जिनचैत्यालय उभे झाले.

वर्धा शहरात तीन जिन चैत्यालये म्हणजे शुभ संकेत देणारे शुभंकर आहेत.

प्रथम दर्शन – जिन मंदिरामध्ये पहिल्या मजल्यावर भगवान पार्श्वनाथ तीर्थंकरांची काळ्या पाशानाची अती मनोज्ञ मूर्ती विराजमान आहे. या मूर्ती पुढे बसून ध्यान धारणा केल्यास मनातील सर्व विकल्प दूर होतात व आत्मबल वाढते व मन सात्विक होऊन कर्माची निर्जरा होण्यास मदत होते. या मंदिराचा परिसर फार लहान असला तरी सर्व नित्य कार्यक्रम विधीवत होत असतात.

दुसरे दर्शन – धरणेंद्राच्या फणाखाली पार्श्वप्रभुची यक्षिणी श्री पद्मावती देवीच्या सातिशय मनोज्ञ मूर्तीचे दर्शन घडते. आपले मनोरथ पूर्ण होतात व सुख शांतीचा अनुभव होतो.

श्री पद्मावती दर्शनाची दोन स्थळे मला सुंदर वाटली. एक बनारस व दुसरे हुम्मच. एक उत्तरेला व दुसरे दक्षिणेला. बनारसला शेषफणी खाली पद्मावतीची मूर्ती आहे व हुम्मच येथील खालच्या वेदीवर श्री पद्मावती देवीची मूर्ती व वरील वेदीवर भ. पार्श्वनाथ भगवंताची मूर्ती आहे.

वर्धा हे शहर भारताच्या मध्यभागी आहे. म्हणून माझ्या कल्पनेनुसार या जिन चैत्यालयात दोन्ही तीर्थक्षेत्राच्या प्रतिकृती एकाच दर्शनातून घडविण्याचा प्रयत्न केला आहे. श्री पार्श्वनाथ भगवंतावर झालेल्या कमठ-उपसर्गामधील दर्शन सुद्धा हेच आहे.

या जिन मंदिरचे दर्शन घेण्याकरिता सर्वांनाच आनंद होईल.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

धरा शीघ्र वाट, वर्धेची हो ।

पाऊले वळती वाटेने वर्धेच्या ।
मूर्ति प्रतिष्ठेच्या निमित्ताने ॥ धृ ॥

पंचकल्याणिक तेथे महोत्सव ।
आदि-शांति-वीर त्रिमूर्तीचा ॥ १ ॥

कराया पूजन इंद्रादिक येती ।
पुण्य मेळविती भावनेने ॥ २ ॥

नवागडाहून येती गुरुवर्य ।
पावन आचार्य आर्यनंदी ॥ ३ ॥

पस्तिसावे वर्ष श्रमणदीक्षेचे ।
आत्म उद्धाराचे सद्‌गुरूचें ॥ ४ ॥

आम्हा सकलांची गुरु ही माऊली ।
दयेची साउली शांतिदायी ॥ ५ ॥

गांधी-विनोबाचे सेवेचे हे स्थान ।
अहिंसानिधान वर्धा गाव ॥ ६ ॥

भव्य जीव तुम्ही प्रतिष्ठेचा थाट ।
धरा शीघ्र वाट वर्धेची हो ॥ ७ ॥

गुरू आर्यनंदी देती बोधामृत ।
व्हाया यशवंत जीवनात ॥ ८ ॥

त्रिवार वंदन कर जोडोनिया ।
आशिष मिळाया कल्याणाचे ॥ ९ ॥

मी आर्यानुदास चरणीं शरण ।
निवारा अज्ञान माझे सर्व ॥ १० ॥

अकोला, **– आर्यानुदास**

० नेमिजिनाचा लग्न सोहळा ०

(चाल : भातुकलीच्या खेळामध्ये)

विवाह मंडपी राजुल करिता
चालले होते नेमी ।
अर्ध्यामधुनी सोहळा सोडुनी
झाले पहा ते मुनी ॥ धृ ॥

घटना ऐका त्या दिवसाला
पहा कशी ती होती ।
चौकशी अंती माहित झाले
कां कोंडियले प्राणी ॥
हंबरणे ऐकुन प्राण्यांचे
डोळया आले पाणी
अर्ध्यामधुनी. ॥ १ ॥

रथा रोकुनी उतरुन खाली
कोंडवाडयात गेले ।
सोडुनी सर्व प्राणी प्रभुने
जीवदान हो दिधले ॥
अलंकार त्यागोनी प्रभुने
रथा दिले परतोनी ।
अर्ध्यामधुनी. ॥ २ ॥

गिरनारीला प्रयाण केले
नग्न दिगंबर झाले ।
समवशरण ते शोभित झाले
बलराम कृष्ण आले ॥
यादव वंशी जन्म घेउनी
नेमी जाहले मुनी ।
अर्ध्यामधुनी. ॥ ३ ॥

केवलज्ञाना प्राप्त करोनी
तीर्थंकर ते झाले ।
अपार भक्ती राजूल करुनी
जन्मा सार्थक केले ॥
'पागल' म्हणे दीक्षा घेउनी
धन्य व्हा या जीवनी ।
अर्ध्यामधुनी. ॥ ४ ॥

वर्धा, **–रामभाऊ घाटोडे**

विनयसंपन्न नर जो कोणी, शिवरमणीला प्रिय तो होई ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्री जिनेंद्र स्तुती

(पं. दौलतरामजी विरचित हिंदी स्तुतिपाठाचा मराठी भावानुवाद)

सकल ज्ञेय ज्ञायक तदपि निजानंद रसलीन ।
जय जिनेंद्र जयवंत नित अरि-रज-धूलि-विहीन ।। १ ।।

जय वीतराग विज्ञानपूर प्रभूवर जिनवर नाथा
जय मोहतिमिरहर गुणबहुला असशी तू मम त्राता ।
जय प्रभू अनंत ज्ञानसुधाकर अनंत गुणधारी तू
अनंत दर्शन परम वीर्य सुख आभूषित प्रभुवर तू ।। २ ।।

जय प्रभुवर तव प्रशांत मंगल प्रसन्न विराग मुद्रा
भव्य जनांच्या अनुभूतीला कारण ती जिनभद्रा ।
भाग्याने प्रभु भव्य जनांना तव वच प्रमुदित करिती
जिनवर तव शुभ हितकर वचने विकल्पजाला हरिती ।। ३ ।।

दिव्य गुणांचे चिंतन मंथन स्व-पर विवेका देते
सकल आपदा बहुविध विपदा शीघ्र निवारण करिते ।
विश्वविभूषण विमुक्त दूषण प्रभु तू सदैव असशी
महानतेचा धारक प्रभु तू विकल्पविरहित असशी ।। ४ ।।

अविरुद्ध शुद्ध अघहर नाथा चैतन्य स्वरूपी तू
महान आत्मा अतिशय पावन निरूपम परमात्मा तू ।
निंद्य शुभाशुभ परिणामांचा विनाश प्रभु तू केला
स्वाभाविक परिणतिमाजी तू स्वरूपात रत झाला ।। ५ ।।

क्षुधातृषादिक अठरा दोषा नाथा तू नाशियले
शुद्ध गुणांच्या चतुष्टयाने निज आत्म्या भुषविले ।
ज्ञानी गुणधर मुनिजन यांनी आदेशा मानयिले
केवललब्धींना तू प्रभुवर जिनदेवा मेळविले ।। ६ ।।

अमेय प्राणी तव आज्ञेचे पालन सदैव करिती
अनेक ध्यानी ज्ञानी बनुनी शिवपदास मेळविती ।
भवार्णवाचे खारे पाणी दुःख तया जन म्हणती
तारायाला तुझ्याविना प्रभु समर्थ दुजा न जगती ।। ७ ।।

आधी व्याधी दुःखद जगती स्पष्ट तुला प्रभु दिसती
दूर कराया निमित्त कारण असशी प्रभु तू जगती ।
जाणुन आलो शरण तुला मी शिवकर जिनवर नाथा
चिरकालाच्या शमवी दुःखा माझ्या तू शिवकंथा ।। ८ ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

'स्व' ला विसरुनी भ्रमलो फिरलो नित्य भवाब्धी माजी
नशिबाचे फळ पाप–पुण्य हे मानियलें मी प्रभुजी।
निजापराची ओळख जगती नच प्रभुवर मज झाली
नित्य परातच इष्ट बुद्धि मी सदैव प्रभु धारियली ॥ ९ ॥

अज्ञानाच्या वश मी झालो आकुलता निज ध्यानी
जैसा ग्रीष्मी तृषार्त मृग तो मृगजळास जल मानी।
देहाच्या या परिणतीस मी सदैव निज मानियले
निज आत्म्याच्या परिणतीस मी कधीच ना जाणियले ॥ १० ॥

प्रभुवर तुज मी जाणियले ना दुःखित जीवन झाले
जिनवर नाथा सर्वज्ञ तुम्ही जाणता क्लेश सगळे।
वनचर प्राणी जीव नारकी मनुज देवही झालो
अनंत वेळा भवांतरी मी भटकत नित राहियलो ॥ ११ ॥

प्रभो दयाळा काललब्धिचा लाभ सुदैवे झाला
प्रभुवर अपुले दर्शन घडले सुभाव जागृत झाला।
होता मन हे प्रशांत निर्मळ द्विधा अवस्था मिटली
दुःखविनाशक आत्मसुधेची मधुर रुची मज कळली ॥ १२ ॥

म्हणुनी आता शिवकर नाथा मी तुज करी याचना
राहो हृदयी चरण कमल तव सदैव हीच कामना।
जिनवर देवा मंगल पावन तू अनंत गुणधारी
समर्थ असशी जन ताराया हितकर तू शिवकारी ॥ १३ ॥

आत्मविघातक अहितंकर या विषयकषायामाजी
प्रभु ना व्हावी राग-द्वेषमय अनिष्ट परिणति माझी
प्रभो असावे स्वात्म्यामाजी निरंतर मी तल्लीन
द्यावी सुमती जिननाथा मज व्हाया आत्मलवलीन ॥ १४ ॥

नाही माझी इच्छा दुसरी अघहर मंगल देवा
रत्नत्रय प्रभु मज लाभावे आस एक जिन देवा।
पूर्ण कराया माझ्या कार्या कारण आपण नाथा
कल्याण करा प्रभु हरण करा मोहताप मम नाथा ॥ १५ ॥

चंद्र नभीचा प्रशांत शीतल हरण करी तापाला
वीतराग प्रभु हीच याचना नाशा भवदुःखाला।
पीयूषाचे प्राशन करता व्याधिनिवारण होते
तुझ्या कृपेने भव व्याधी ही दूर तशी नित होते ॥ १६ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्रिभुवनात या त्रिलोकात प्रभु नसे कुणी सुखदाता
तुझ्याविना ना अन्य कुणीही मंगल हितकर त्राता ।
मनात माझ्या पक्के रुजले जिनेश्वरा प्रभो आज
दुःखार्णव हा पार कराया जिनवर आपण जहाज ॥ १७ ॥

प्रभु गुणगण-मणिगण पती, असे गणना अपार ।
'दौल' स्वल्पमतीं वंदन, करी प्रभो शिवकार ॥ १८ ॥

- भद्रदास

दर्शन पाठ

(कविवर बुधजनविरचित हिंदी दर्शनपाठाचा अनुवाद)

प्रभ पतितपावन मी अपावन शरण तुला मी आलो
जन्म-मृत्युचे भय ना उरले धन्य धन्य प्रभु झालो ।
ओळखले ना प्रभु तुम्हा मी इतरांच्या वश झालो
आत्म्याला मी जाणियले ना परभावातच रमलो ॥ १ ॥

कर्मरिपूंनी ज्ञानधना मम भवभवी मोहविलें
इष्ट अनिष्टा नच जाणोनी अतिदुःखा भोगयिले ।
धन्य घडी ही धन्य दिवस हा जन्म सफल मम झाला
तुझ्या दर्शने भाग्य उगवले हर्ष मनी अति झाला ॥ २ ॥

वीतराग प्रभु नग्न दिगंबर नासिकाग्र तव दृष्टी
प्रातिहार्ययुत गुणभास्कर तू शुचि मंगल प्रभु सृष्टी ।
मिथ्यात्वाचा तम ओसरला दृग-रवि उदया आला
हर्षित झाले पुलकित मन हे रत्नलाभ मज झाला । ३ ॥

नतमस्तक मी कर जोडुनिया करी विनंती चरणी
त्रैलोक्यपती सर्वोत्तम प्रभु तारक आम्हा भुवनी ।
नको मला प्रभु निवास स्वर्गी वैभव वा नृपतीचे
असो मनी प्रभु भक्ति निरंतर नाम मुखी तव साचे ॥ ४ ॥

भद्रदास

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

समयसार प्रवचन – १६

– प्राचार्य श्री सुमेरचंद जैन, सोलापूर

दंसण–णाण–चरित्ताणि
सेविदव्वाणि साहुणा णिच्चं ।
ताणि पुण जाण तिण्णि वि
अप्पाणं चेव णिच्छयदो । १६ ॥
(समयसार – १६)

प्रास्ताविक :– आचार्य कुंदकुंदांचा श्री समयसार हा ग्रंथ अभ्यासतांना खूप काळजी घ्यावी लागते. गंगा–यमुनेचे दोन्ही प्रवाह एकत्र वाहत असलेले आपण पाहतो. जवळून वाहून देखील गंगेचे पाणी शुभ्र व यमुनेचे किंचित् काळेपांढरे असे वाहाते. तसे आचार्यांनी एका विशुद्ध आत्म्याचे वर्णन जसे केले–अर्थात् साक्षात् श्री अरिहंत हेही संसारी असल्याने तेथेही आस्त्रव आहे, परिषह आहेत, देशनेची (उपदेशाची) एक आगळी वेगळी शान आहे, तमवशरण आहे. अत्यंत वैभवशाली–गुरु शिष्यांचा गोतावळा आहे. नियम–संयम यांची जोडी आहे. तोही एक मोठा मनोरम अवदर–संसार आहे.

जिन शासन हे देश-काल परिस्थिती सापेक्ष आहे. शासन म्हणजे नियंत्रण, मार्गदर्शन–तेही आहे. आपण जैन मंडळी शासनाचा विचार सोडून शासित झालो आहोत. खरे शासन म्हणजे अरिहंताचे. इतर शासन (सरकारे) येतात–जातात – संपतात. जैनसमाज अशा नाशवंत शासनाला फारशी किंमत देत नाही. कारण हजारो वर्षातून जैन समाजाने अशी शासने (गव्हर्मेंटस्) पाहिली. ती आली तशी गेली. आजचेही शासन त्याच मार्गाने जाईल. खरे चिरकाळ टिकणारे शासन अरिहंताचे आहे. सिद्ध परमात्मा पूर्णतः अमूर्त. या विश्वात साक्षात् दिसणारे शासन हे श्री अरिहंताचेच होय. शाश्वत आहे आत्मा. त्या आत्म्यावर शासन–नियंत्रण केवळ आत्म्याचेच असते. ते स्वयं शासन म्हणून जाणले जाते. असो.

अर्थ – वरील गाथेमध्ये आचार्यांनी आत्म्याचे जे प्रमुख तीन, परंतु एकात्म, गुण सांगितले–ते गुण म्हणजेच आत्मा. आत्मा दिसत नाही–मग त्याला पाहायचे कसे ? तो दिसणार तरी कसा ? आत्माच न मानणाऱ्या व्यक्तीला आत्म्याच्या अमूर्त (अब्स्ट्रॅक्ट स्वरूप सांगायचे तर ते स्वरूप देखील सांगताना त्या आत्म्याच्या ओळखता येणाऱ्या खाणाखुणा तरी सांगितल्या पाहिजेत. म्हणून या गाथेत आचार्यांनी दोन विचार सांगितले. 1] ज्यांना मुक्तीचा आश्रय घ्यायचा आहे, ज्यांना संसार पाश नको आहेत, ज्यांना क्रोधादि विकारांची संगत नको आहे, पंचेंद्रियांचे जे भोग उपभोग आहेत–ते नको आहेत अशा साधुप्रवृत्तीच्या व्यक्तींनी आत्मा कसा जाणावा–तो आत्मा असतो कसा, दिसतो कसा, याच्या खाणाखुणा यात सांगितल्या आहेत. (२) आत्मा कोण–त्या गुणांचा पिंड आहे, त्याच्या प्रत्येक आत्म प्रदेशाचे विश्लेषण केले, तपासणी केली तर प्रत्येक प्रदेशांत– (अणु रेणूत) कोणती गुण वैशिष्टये आहेत, हे जाणून घेणे आवश्यक आहे. आत्मा म्हणजे केवळ अमूर्त नाही, अदृश्य नाही, जाणता–पाहता येत नाही–असा नाही.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तो जाणता – पाहता – अनुभवता येतो. त्या आत्म्याचे संवेदन क्षणोक्षणी होऊ शकते. एखादे घर भूतांनी – पिशाच्यांनी व्यापले आहे. अशी जाण ठेवून जर कुणी त्या घरात प्रवेश केला तर त्याला भूत – पिशाच्याची जाणीव होते. (तो भास ही असू शकतो– मानसिक भावना ही असू शकते.) तसेच आत्मा जाणायचा – पहायचा वा अनुभवायचा असेल तर त्याचे कोणते रूप तुम्हाला दिसेल ? जे आत्मा नाहीच म्हणतात – केवळ पंचमहाभूतांचा पिंड म्हणजे जीव म्हणतात – त्यांनाही हे उत्तर आहे. आजच्या विज्ञानाला देखील हेच उत्तर आहे. आजच्या विज्ञानाला देखील हेच उत्तर आहे. जे दिसते, जे आपण पाहातो, अनुभवतो – ते अनुभवणारे तत्व कोणते ?

आचार्य श्री सांगतात – तुमचा प्रत्येक अनुभव मग तो इंद्रियांनी वा मनांनी घेतला आहे तो खरे तर आत्म्यानेच घेतला आहे. प्रत्येक ज्ञानमयाक्रियेत प्रत्येक जाणिवेत, पदार्थ दर्शनात, तो आत्माच आहे. तो आत्मा नसेल तर मग काहीच जाणता पाहाता अनुभवता येणार नाही. प्रेत म्हणजे आत्मविहीन जड पदार्थ. त्याला चेतना नाही. ते जड शरीर म्हणजे केवळ माती. ती मातीत मिळणारच.

म्हणून कुंदकुंद आत्म्याचे गुणात्मक वर्णन करतात. प्रामुख्याने त्या आत्म्याला सहज ओळखता येणारे तीन गुण म्हणजे श्रद्धा, ज्ञान व चारित्र्य. हे तीन गुण केवळ काल्पनिक रीतीने वेगळे सांगितले असे ही नाही. ते म्हणजे आत्म प्रदेशाचे घटक आहेत. सारा आत्मा त्यांच्या दिव्य रसवत्तेने भरला आहे. केवळ कथन म्हणून तीन. पण ते वेगळे नाही. जशी श्रद्धा तसे ज्ञान व तशीच वागणूक देह म्हणजेच आत्मा अशी श्रद्धा असेल तर ज्ञानही तसेच, व वागणूकही तशीच. संसार म्हणजेच जीवन, भोग म्हणजेच जीवन, सत्ता, संपती, वैभव सुखोपभोग म्हणजेच जीवन अशी श्रद्धा असेल तर सारे ज्ञान, सारे आचरण ही तसेच होऊन जाते. संसार चक्राचे असेच स्वरुप आहे. जन्म मृत्यूलाच जीवनाची सुरुवात व अंत समजाल तर तसेच ज्ञान व चारित्र्य घडेल. आज सूखोपभोगांची तीव्र लालसा वाढत आहे. नवनवीन भोगांची साधने उपलब्ध होत आहेत. त्या साठीच मानवांची जीवने कवडी मोलाने खर्ची पडत आहेत. पैसा, पैसा करीत तो तारूण्य घालवत आहे. प्रत्येक क्षण तो पैसा कमविण्याच्या मागे लागला आहे. त्याची भोगलालसा वाढत आहे त्या लालसेने त्याची जातिवंत, रसवान चेतना शुष्क होत आहे. करुणा, प्रेम मानवता यांचे झरे आटत आहेत. कमालीचा आत्मकेंद्रित, स्वार्थी तो होत आहे. त्यामुळे चेतनेला मुर्च्छा – बेशुद्धी येत आहे. नोटा मोजण्या इतकेच गणित शिल्लक राहिले आहे. जीवनाचे आकर्षक, मोहक इंद्रधनुष्य पाहायलाही तो तयार नाही. काव्य–संगीताने, धर्म ज्ञानाने स्वाध्यायाने, पूजा–अर्चन पोट भरत नाही सुखे मिळत नाहीत. म्हणून त्या साऱ्यापासून तो वंचीत होत आहे. नव धनाढ्यांचे तर विचारुच नका. ते तर कमालीचे बेछूट होत आहेत. काय करू त्या संपत्तीचे, त्या पैशाचे असे त्याला होऊन गेले आहे.

आचार्य म्हणतात – ही पतनाची अवस्था आहे. जीवनाला कीड लागल्याची ती खूण आहे. सुंदर जीवन जगण्याची ती रीत नाही. सुंदर जगायचे तर जीवनाची सुंदरता, कोमलता, मृदुता, निर्व्याजता कळाली तर पाहिजे म्हणून सारे सुंदर जीवन म्हणजे आत्मोन्मुखी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अमृतस्त्रावी श्रद्धा होय. श्रेष्ठतम जीवन-मूल्यांची अधिष्ठाची देवता म्हणजे श्रद्धा. त्या श्रद्धेचा अंतरंगातून स्वीकार झाला पाहिजे. शरीर-इंद्रिये-मन यांच्या आवाक्यात न येणारा, पण ज्ञानाने जाणता येणारा आत्मा (स्वतःचा) हाच उपास्य आहे. तोच माझा सांगाती आहे. त्याचे परम लावण्यमयी रुपच माझे खरे रुप आहे. त्या विश्वविजयी श्रद्धेचा खरा खुरा आविष्कार हृदयात झाला तर सारी सृष्टी बदलून जाते. दृष्टि तशी सृष्टी. दृष्टी आत्मरत, तर ज्ञान ही पवित्र, मंगल व लोक कल्याणकारी. म्हणून त्या श्रद्धेला प्रथम स्थान आहे. ती ज्ञानावर व चरित्रावरही मात करते. सारा आत्माच श्रद्धामय आहे. त्या श्रद्धेला मरण नाही, जन्म नाही, आप-पर बुद्धी नाही. नैराध्य नाही, भीती नाही. राव-रंक भेद नाही. उच्च-नीच भावना नाही. अशी साऱ्यांच्या जीवनाला व्यापणारी श्रद्धा म्हणजे सम्यक्-दृष्टी. ती अंतरंगीच असते. ती बाहेरून येत नाही. आतूनच ती फुलते. ती आतून दरवळत जाते. तिचा मधुगंध जीवनात पसरतो. त्याच श्रद्धेने जीवन प्रकाशमय होते. अगोदर श्रद्धा, मग ज्ञान असा क्रमही नाही. श्रद्धा व ज्ञान दूध व दुधाची गोडी प्रमाणे एकरुप आहे. दुधाची स्निग्धता व माधुरी एकरुप आहे. तसे ज्ञान व श्रद्धा एकरुपच आहे. ज्ञानाने जाणले जाते की ते वेगळे आहेत. हा ज्ञानाचा गुण आहे. श्रद्धा सामान्य रूपाने आत्म्यास व्यापते, तर ज्ञान विश्लेषण करते. ज्ञान भेदरूपाने जाणते विश्लेषण करते. ते बेरीजही करते व वजाबाकीही करते. श्रद्धेत तसे काही नाही. जसे जगातील सारे मातृत्व एकाच प्रकारचे, एकाच धर्माचे तसे पण आई वेगळी वेगळी. माता वेगळी पण श्रद्धा गुणात अभेदत्व. श्रध्दा जोडते. एकत्व आणते. ज्ञान प्रत्येकाचे विश्लेषण करते. कुंदकुंद माऊलीला त्या परम दैवत-स्वरुप श्रध्देचे मोठे कौतुक आहे. सारा समयसार त्या पावन श्रध्देच्या गुणगायनातच समाप्त होतो.

ते आत्म्याला ज्ञान म्हणतात. ज्ञान म्हणजे आत्मा व आत्मा म्हणजे ज्ञान-आणि ते खरेच आहे. आयुष्यभर आपण केवळ जाणतो. माझी श्रद्धा आहे, माझे प्रेम आहे, मी आत्मा आहे, मी ज्ञान आहे हे सारे विचार ज्ञानगम्य आहेत. जाणल्याशिवाय त्यागीवाला चैनच नाही. आजही विश्व वस्तू-विज्ञानाच्या खूप मागे लागले. रहस्यावर रहस्ये तो उलगडत चालला. त्याच्या ज्ञानाला प्रभू अनंतत्व देतात. ते संपणारे नाही, ज्ञान आगी प्रमाणे पसरत जाते. अखिल वस्तु जाताला ग्रास करण्याची ज्ञानाची शक्ती आहे. समुद्र पिणाऱ्या अगस्ती ऋषी प्रमाणे सारे वर्तमान-भूत-व भविष्यकालीन पदार्थांच्या सर्व अवस्थांचे ज्ञान करुन घेण्याची त्याची जिद्द आहे. आणि त्यात अशक्य काहीच नाही. याचे कारण प्रत्येक जीवाच्या अंतरंगात कैवल्य दडून बसले आहे. केवलज्ञाचा विषयच सारे स्व-पर पदार्थ आहेत. केवळज्ञानाचीच प्रभा प्रत्येक जीवमात्रात कमी-अधिक रुपाने प्रकाशत आहे. ती प्रभाच जीवन उजळून टाकीत आहे. ज्ञान श्रद्धेलाही जाणते व चारित्र्याला ही जाणते. जाणणे हा त्याचा गुणच आहे. जाणणे त्यावस्तुत गुंतणे नव्हे. त्या वस्तूची लालसा करणे नव्हे. तिचा हावरेपणाने उपभोग घेणेही नव्हे. जाणणे म्हणजे जाणणे. हाच अधिगम होय. वस्तू संबंधी प्रीती, लालसा, मोह, ईर्षा-द्वेष हा ज्ञानाचा प्रांत नाही. एखाद्या उत्कृष्ट सर्जन जेव्हा एखाद्या अतीव सुंदर स्त्रीचे ऑपरेशन करतो, तेव्हा प्रामुख्याने त्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्त्रीचा दूषित अवयव काढून टाकणे एवढी एकच भावना त्याच्या ठायी असते. ब्लडप्रेशर बघतांना तो दंडाची प्रहरता नाही पाहात, तो प्रेशर पाहतो. तेच कार्य ज्ञानाचे आहे. भगवान महावीर जेव्हा उपदेश देतांना एखादी सुंदर चरित्र-कथा सांगत, तेव्हा त्या कथेच्या पात्रांच्या विकार-वशतेचे वर्णन करतात. पण ते त्यात लिप्त होत नाहीत. ते जाणतात. जाणण्यात ही जी एकांत स्वरुपाची अलिप्तता आहे तोच ज्ञानाचा गुण आहे. ज्ञान जेव्हा मोहाने, वाच्छेने. लोभाने आच्छादले जाते तेव्हाही ज्ञान म्हणजे वासना नव्हे. लोभ नव्हे. ज्ञान वासनेलाही जाणते. विकारांनाही जाणते. म्हणून आचार्य ज्ञानाला सुप्रतिष्ठित करतात. ज्ञान एकांताने एकाच गुणाला जाणेल, त्या गुणाच्या एका क्षणाच्या एका अवस्थेला जाणेल असेही नाही. ते अवस्था व पदार्थ यांना ही एकत्रितपणे वा अलगपणे जाणेल. म्हणून सूर्याप्रमाने नित्य प्रकाशमान, तेजस्वी, अ-मलिन आत्मा म्हणजे हा ज्ञान होय. पण ही व्याख्या सापेक्षच आहे. कारण ज्ञानाला जी अनंतता बहाल केली गेली आहे ती त्याच अर्थाने. अनंतता हा काही ज्ञानाचा गुण नव्हे. ते इतके व्यापक असते की ज्ञान स्वयंमेव अनंतात्मक परिपूर्ण होऊन जाते.

आणखी एक कल्पना कुंदकुंदांनी स्पष्ट केली. ते म्हणतात – मलिन ज्ञान, लोभाविष्ट ज्ञान, संसाराविषयी आसक्त ज्ञान म्हणजे अज्ञान. अज्ञान म्हणजे कु-ज्ञान. ज्ञानाचा अभाव नव्हे. कारण ते ज्ञान कशालाही आपले म्हणते. जसे मूल दुसऱ्याची वस्तू घेते/उचलते. कारण त्याला स्वतःचे व परक्याचे असे विश्लेषण माहीत नसते. ते माहिती करुन द्यावे लागते. परवस्तू घेऊ नये याची जाण वारंवार करुन द्यावी लागते. तीच गोष्ट धार्मिकते बाबत आहे. धर्मवान् माणूस पर वस्तूला आपली समजत नाही/जाणत नाही. जे स्वतःचे नाही, ते पर. ते घेणे म्हणजे चोरी. तें बुद्धीने स्वीकारणे हे असत्य. त्याचा उपभोग हे अ-ब्रम्ह. त्याचा संग्रह ही मूर्च्छा-परिग्रह. म्हणूनच कुंदकुंद माऊली पाच पापांचा प्रपंच करीत नाही. पुण्य-पापांचा पसारा मांडत नाहीत. कारण आत्म्याचे जे गुण,ते आत्म्याचे. त्या व्यतिरिक्त सारे परके. आपले नाही. क्रोध, मान, अहंकार-लोभ ईर्षा ही सारी संतती अनौरस. परक्यांची. ती आपली कशी म्हणायची ? म्हणून कुंदकुंदांना समजणे अवघड वाटेल. ते अतिरेक करतात, एका टोकाची भूमिका मांडतात असे वाटले. कुंदकुंद म्हणतात ज्ञान, आपण म्हणतो माझें-तुझे. मला हवे-नको. कुंदकुंद म्हणतात-केवल जाणा/पाहा. वस्तू व वस्तूचे गुण जाणा. शरीर आहे. सुंदर आहे. जन्मते-मरते. हे जाणा. म्हणू नका मी शरीर आहे, मी गरीब आहे. मी राव आहे, रंक आहें 'आहे' एवढेच पुरसे आहे आहे [अस्ति] एवढे वर्णन पुरे नाही कां ? चेतनेचे असे सुंदर वर्णन कुठेही नाही. कारण चेतना जाणवण्याची, तिच्यात मस्तीने रममाण होण्याची एक आगळी प्रक्रिया आहे. केवळ अस्तित्वात समाधान माना. त्या अस्तित्वाला विनाशी लेबलें नका लावत बसू. आपण पाहातो ना, या भूमीला आपली आपली म्हणणारे व तिच्यासाठी युध्दे करणारे सारे मेले. पृथ्वी इथेच आहे. तिला राजा-रंक्रांत रस नाही. ती तुमच्यात उदासीन आहें. पिशवीत भरलेल्या नोटांना तुमच्याशी काही कर्तव्य नाही. त्या आहेत, व तुम्ही आहात मोहामुळे-लालसेमुळे तुम्हाला त्यात संबंध

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहे, असे वाटते आचार्य कुंदकुंद म्हणतात– आत्मा म्हणजे हे तीन गुण (वस्तुतः एकच)– या तीनांचे मिळून झालेले रसायन. रसायन एक घटके तीन. तेही अभिन्न. केवळ ज्ञानानेच वेगळे करून पाहाता येण्या सारखे चेतना ही या तीन गुणांची एकत्व दर्शक. विश्वात जे जे माणूस घडवितो, पराक्रम करतो, देह-धारणादिक गोष्टी करतो, म्हणजेच संसाराचा पसारा उभा करतो असे जे म्हटले जाते, त्यात हीच चेतना किंवा चेतनेची प्रभा जड कर्म परमाणूंना सहाय्यभूत होऊन घडवितो. संसार म्हणजे चेतनेच्या एक वैभाविक आविष्कारच आहे तो आविष्कार मोठा मनोरम, वैविध्यपूर्ण आणि मतीला चक्रावून सोडणारा आहे. चेतनेची ही ईश्वरीय शक्तीच होय. ती पाहूनच ईश्वराची कल्पना पुढे आली. पण जेंव्हा चेतना मूळ आपल्या दर्शन–ज्ञान–चारित्र्यात्मक विशुद्धतेचा आश्रय करून इतर सर्व संयोग–संबंधातून मोकळी होते ती त्या चेतनेची मुक्ती आहे. मुक्ती असो वा संसार यात चेतनेचाच आविष्कार आहे ती दिव्य चैतन्यमयता म्हणजेच आत्मा होय. तिची निर्मित्ती करता येत नाही. ती स्वयंभू असते. कर्मांचे येणे जाणें स्वयंभू व ती स्वीकारणे वा नाकारणे हे देखील चेतनेचे स्वयंभूषण होय.

– प्राचार्य श्री सुमेरचंद जैन
८–अ सन्मतीनगर,
सोलापूर–४१३ ००४

हार्दिक शुभेच्छा

नमन करू अरहंत को, नमन सिद्ध भगवन्त ।
आचारज उवझाय अरू, सकल साधु गुणवन्त ॥

राजेश ट्रेडर्स

वर्धमान मार्केट, वर्धा

सब प्रकारके हार्डवेअर मर्चंट

प्रो. राजेश मानमलजी जैन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्री समंतभद्र विचार रत्नमाला

(गुरुकुल शिक्षण पद्धतीचे पुनरुज्जीवक अध्यात्मयोगी परमपूज्य गुरुदेवश्री समंतभद्र महाराजांच्या पत्रातील विचारावर आधारित)

भेदविज्ञान लाभाने
विजयी होतसे नर ।
इंद्रियांना कषायांना
भेद विज्ञान जिंकते ॥ १ ॥

ज्ञानाने मन सत्याने
वाणी पवित्र होतसे ।
गुरू सेवा करी देहा
कथिले आगमी जिने ।। २ ।

विवेक शुन्य भावांनी
गर्तेत पडतो नर ।
विवेकाची हवी जोड
भावनेला निरंतर ॥ ३ ॥

आकुलता असे नित्य
परिग्रहास कारण ।
अतएव सुखार्थ्याने
त्यागावी ती प्रयत्नात ॥ ४ ॥

घडणारे घडे नित्य
नसावा खेद हर्ष वा ।
आपदी वैभवी ठेवा
समभाव निरंतर ॥ ५ ॥

मोहामुळे परालाच
मानतो जीव आपले ।
करी भ्रमण संसारी
त्याग तू कसा ।। ६ ॥

सम्यग्दर्शन प्राप्तीने
गळतो मी पणा बुधा ।
तयास्तव करी यत्न
मनोभावे अहर्निश ।। ७ ॥

निरीक्षावे स्वदोषांना
करावा यत्न त्यागण्या ।
करावी शुद्धि आत्म्याची
भावावी स्वात्मभावना ॥ ८ ॥

लाखात गोष्ट जीवा रे
जाण तू सत्य आगळे ।
परमात्मपदासाठी
राग-द्वेषास त्याग तू ॥ ९ ॥

वित्ताचे सार हे दान
देहाचे व्रत धारण ।
तत्वचिंतन बुद्धीचे
वाणीचे मधु भाषण ।। १० ॥

नसे स्वाधीन जीवाच्या
पराचे परिवर्तन ।
' मी करीन ' असा गर्व
वृथाभिमान सोड तू ॥ ११ ॥

गुरूपदेश मेघावे
पडता जल मानसी ।
मौक्तिकें बनती त्याची
सर्व जीया हितकर ।। १२ ॥

दुःखाची जननी जाणा
आसक्ती हीच निश्चित ।
आसक्ती त्यागणे इष्ट
नसो आकुलता कधी ॥ १३ ॥

भजावे अरहंताला
श्वासाश्वासात नित्यशः ।
सांगता येत नाही रे
घेशील काय तो पुनः ॥ १४ ॥

तुझ्या घराचे रे मित्रा नसे साथी तुझा कुणी ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ज्या लक्ष्मीकरिता सोडी
स्वधर्मासहि मानवा ।
तुझ्यासवे न येईल
जाण हे सत्य सर्वदा ॥ १५ ॥

अनंतानंत जीवांचे
क्षेम कल्याण इच्छितो ।
अशा नरा सदा लाभे
सौख्य शांती शुभंकर ॥ १६ ॥

जिनवचन जाणावे
महा औषध उत्तम ।
ते विरेचक भोगांचे
कर्मदुःखविनाशक ॥ १७ ॥

जन्म-मृत्यु-जरा-व्याधी
जिनवाणी विनाशिते ।
पीयूषार्णव ती जाणा
सर्व कल्याणकारक ॥ १८ ॥

क्षण जाती पळे जाती
काळ जाई क्षणोक्षणी ।
आयुष्य जातसे वाया
जप तू जिनराम रे ॥ १९ ॥

शरीरावर या दुष्ट
जितके प्रेम मी करी ।
तितके स्वीय आत्म्यात
करता मोक्ष दूर ना ॥ २० ॥

सदा त्याज्य असे संग
शक्य ना त्यागणे जर ।
करावा संग संतांचा
संत औषध उत्तम ॥ २१ ॥

पीयूषार्णव संतोष
मनीं ज्याच्या अतुल्य तो ।
संतोषात असे सौख्या
शुची निर्मळ मंगळ ॥ २२ ॥

आत्म्याचे हित सौख्यात
नसे आकुलता जिथे ।
आत्म्याचें हित ना तेथें
असे आकुलता जिथे ॥ २३ ॥

रागासमान ना दुःख
त्यागासमान ना सुख ।
असे हे सार तत्त्वाचें
जीवाला सौख्य दायक ॥ २४ ॥

इंद्रिय प्राप्त जे सौख्य
सुखाचा भास ते असे ॥
जयाने ग्रासले ज्ञाना
मानावे ते कसे सुख ॥ २५ ॥

दुःखाचे मूळ अज्ञान
आत्मज्ञान सुखास्पद ।
होताच नष्ट अज्ञान
लाभते सुख शाश्वत ॥ २६ ।

पर द्रव्यात जी बुद्धी
इष्टानिष्ट करी नर ।
मिथ्यात्त्वाचे असे रूप
दुःखदायी भयंकर ॥ २७ ॥

पुरे विकल्प आता ते
आता नकोत जल्पना ।
करी विचार जीवा रे
निजात्म्याचा मनोमन ॥ २८ ॥

धावता सावलीमागे
येई हातात ना कधी ।
पाठ फिरवता येई
मागे मागेच ती सदा ॥ २९ ॥

मिथ्यात्वग्रस्त जीवाला
जिनवाणी न आवडे ।
रागद्वेषात जे मग्न
असतात निरंतर ॥ ३० ॥

काळाच्या उदरी जाता तुला ना रक्षिती कुणी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अंतरंग तपामध्ये
स्वाध्याय तप उत्तम ।
गृहस्थालाहि ते शक्य
श्रमणासम जीवनी ॥ ३१ ॥

मनोवचनकायेने
असावे शुचि वर्तन ।
शुद्धाचरण जीवाला
देते आनंद निर्मळ ॥ ३२ ॥

असाया चित्त सन्मार्गी
मनाचे कोड कौतुक ।
उत्कर्ष इच्छिणाऱ्याने
कदापीही करू नये ॥ ३३ ॥

पुण्योदये मिळाली रे
कायनौका नरा तुला ।
दुःखाब्धी कर तू पार
जौवरी भंग ना तिचा ॥ ३४ ॥

रे सूधारक विश्वाची
चिंता तू सोड रे वृथा ।
निजात्म्यात असे विश्व
आधी सुधार ते भल्या ॥ ३५ ॥

जिनवाणी श्रुताभ्यास
धर्मध्यान तपादिक ।
रुची आवड धर्माची
असे भव्यत्त्व लक्षण ॥ ३६ ॥

– भद्रदास

याच जन्मात दिव्यानंद

मनुष्याने प्रत्येक क्षणाचा सदुपयोग, निरंतर व्यवसाय व सतत शुद्ध विचार या गोष्टींची स्वतःला सवय लावून घेतल्यास त्यास याच जन्मात दिव्य आनंदाची प्राप्ती झाल्याशिवाय राहात नाही. पण त्याने प्रतिज्ञापूर्वक तसे ठरविले पाहिजे. ज्ञान व क्रिया यांचो सांगड हीच जीवन विकासासाठी आवश्यक आहे. म्हणून ती घालण्याचा तुम्ही प्रयत्न करावा. केवळ चांगले काय आहे हे समजून किंवा बोलून उपयोगी नाही. ते कृतीत उतरले पाहिजे. निश्चय केल्यास ते सहज शक्य आहे.

बाहुबली, दि. १७-८-१९३४ – स्वामी समंतभद्र

आयुष्य जातसे व्यर्थ रात्रंदिन तुझं असे ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जैन तत्त्वज्ञानाचे चालते बोलते विद्यापीठ (Mobile University) प. पू. आचार्यश्री आर्यनंदी महाराज यांच्या निर्विघ्न विहाराकरिता वर्धावासियांची मंगल प्रार्थना

होवो विहार निर्विघ्न



वंदितो भावभक्तीने
आर्यनंदी मुनीश्वरा ।
आर्योत्तमा महाचार्या
गुरुश्रेष्ठा दिगंबरा ॥ १ ॥

आरंभ विषया सर्व
परिग्रहादि त्यागुनीं ।
संसारमोह सोडोनी
संयमी बनले मुनी ॥ २ ॥

ज्ञान–ध्यान–तपामध्ये
जाहले लीन तत्पर ।
आत्म्यात रमले त्यागी
आर्यनंदी मुनीश्वर ॥ ३ ॥

समंतभद्र स्वामीच्या
हस्ते दीक्षेस धारिले ।
कराया स्वात्म उद्धार
परकल्याणही तसे ॥ ४ ॥

तीर्थरक्षार्थ देशात
केला विहार निर्भय ।
समाज जागृती केली
व्हावया तीर्थ अक्षय ॥ ५ ॥

काया–वाचा–मने सेवा
धर्माची करण्या दिली ।
प्रेरणा मंगल शक्ती
आम्हा आशीर्वचावली ॥ ६ ॥

स्वाध्यायीं रत राहोनी
आत्मविज्ञान जाणले ।
'देहोऽन्यः पुद्‌गलाश्चान्याः
भेदविज्ञान साधले ॥ ७ ॥

दिधली प्रेरणा आम्हा
स्वाध्यायाची सुमंगल ।
दर्शन–ज्ञान–चारित्र
व्हावया अति उज्ज्वल ॥ ८ ॥

कराया धर्मसंस्कार
कोवळया बालकावरी ।
स्थापिली आश्रमे दोन
वेरूळात नवागडीं ॥ ९ ॥

यथार्थ आत्म–संकल्पी अंतरात्मा असेचितो ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आचार्य आर्यनंदी वंदना

वर्धावासी श्रावक आम्ही हर्षित शुभ आगमनाने
आर्यनंदि गुरुवर आचार्या वंदन मन वच कायेने ॥ धृ ॥

आचार्योत्तम आर्यनंदि मुनि रत्नाकर वात्सल्याचे
दृग्ज्ञानचरित सहित मुनीश्वर प्रखर दिवाकर ज्ञानाचे ।
समंतभद्रासमीप दीक्षा नग्न दिगंबर साधूची
घेती गुरुवर विशुद्ध पावन मंगलकर वैराग्याची ॥
वर्धावासी. ॥ १ ॥

पसतिस वर्षे व्यतीत झाली पंच महा आचाराची
थोर तपस्या भेदज्ञाने निज आत्मा चेतविण्याची ।
संग त्यागुनी गुरुवर बनले लघुनंदन जिनदेवांचे
प्रतीक बनले विरागतेचे श्रद्धा ज्ञान तपस्येचे ॥
वर्धावासी. ॥ २ ॥

गुरुकुल शिक्षण संस्काराचे अनुपम मंगल हितकारी
मिळावयास्तव सकला छात्रा दान योजना उपकारी ।
नवागडाला तीर्थ कराया शिवमंगल संस्काराचे
सदैव यतती प्रेरण देती नित समाजधर्म हिताचे ॥
वर्धावासी. ॥ ३ ॥

गुरुमेघाच्या ज्ञानजलाने गृही जनांचे हृदय फुलो
सदाचारमय जीवन जगण्या प्रेरण मंगल नित्य मिळो ।
तीर्थभूषणा श्रमणउत्तमा आर्यनंदि मुनिराजाला
मिळो आयुष्य स्वास्थ्य निरामय बल संयम पाळायाला ।
वर्धावासी श्रावक आम्ही हर्षित शुभ आगमनाने
आर्यनंदि गुरुवर आचार्या वंदन मन वच कायेने ॥ ४ ॥

वर्धा, — भद्रदास

नेच्छिता जे स्वतःसाठी नका इच्छू परास्तव ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कल्याणक निमित्ताने
केले प्रस्थान यावया ।
नवागडाहुनी येथे
भव्यांना बोध द्यावया ।। १० ।।

वर्धावासी जनांचे हे
अहोभाग्य प्रभावक ।
बोधामृत रसास्वादे
धन्य होतील श्रावक ।। ११ ।।

वृध्दावस्था असोनीही
कष्टभार न मानता ।
विहार धर्मकार्यार्थ
केवढी धर्मशीलता ! ।। १२ ।।

गुरूपदेश पीयूषे
मिळेल दृष्टि उत्तम ।
श्रावकांना मनःशांती
धर्मज्ञान जिनागम ।। १३ ।।

होवो विहार निर्विघ्न
निराबाध निरापद ।
मंगलोत्तम सानंद
गुरुराजा सुखास्पद ।। १४ ।।

आर्यनंदी महाचार्या
आयू स्वास्थ्य निरामय ।
लाभो शक्ती मनःशांती
होवो विहार निर्भय ।। १५ ।।

व्हावया लाभ सर्वांना
सद्धर्माचा सदुत्तम ।
प्रार्थितो चिंतितो आम्ही
वर्धेचे श्रावकोत्तम ।। १६ ।।

आर्यनंदी जिनाचार्या जिनेश–लघुनंदना ।
वात्सल्यमूर्ति योगीशा वंदितो भद्रदास मी ।। १७ ।।

– भद्रदास

वर्धा,

शुद्धातम शिव तू

ॐ तत् सत् श्री आत्मराज प्रभु शुद्धातम शिव तू ।
अक्षय निर्भय ज्ञानपुंज विभु विश्वप्रकाशक तू ।
अगंध अरूप अस्पर्श अरस नित्य सदा शिव तू
ज्ञाता द्रष्टा ज्ञायक दर्शक ज्ञानरुप विभु तू ।। १ ।।

समय अमेचक चिन्मय भावक निजरसनिर्भर तू
सिद्ध बुद्ध तू सहिष्णु अच्युत प्रशमात्मा प्रभुं तू ।
सत्यपरायण क्षांतिपरायण शांतिनिष्ठ जिन तू
प्रभु क्षेमंकर महागुणाकर योगी ध्यानी तू ।। २ ।।

अनादि अनंत अजर स्वयंभू नित्य अवस्थित तू
निर्मल निष्कल चिन्मय चिद्रस चिदानंद शिव तू ।
नित्य निरंजन अबद्ध चेतन अतिनिश्चिल धृव तू
उदासीन जिन शमसुख पूरित स्वतःसिद्ध प्रभु तू । ३ ।।

★ ★

इच्छिता जे स्वतःसाठी इच्छा तेच परास्तव ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हार्दिक शुभ कामना !

" पंच णमोकार महामंत्र विश्वशांती व प्राणीमात्राच्या कल्याणाचे अधिष्ठान आहे. त्याचे नित्य स्मरण सर्वदा सुखदायी होते."

– महावीर वाणी

ओम ऑईल इंडस्ट्रीज

ओम किराणा भांडार

रामनगर, वर्धा - ४४२ ००१

फोन : २८२०

किशोर अणाजी चवडे

राजकुमार अणाजी चवडे

वार्ड नं. २७, रामनगर, वर्धा.

सद्गुणांच्या विकासात खरा आनंद शाश्वत।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हार्दिक शुभ कामना

" सम्यक्चारित्र जीवनाचा मुकुटमणी आणि मानबिंदू असल्यामुळे तो खरा धर्म होय. धर्म म्हणजे साम्य आणि साम्य म्हणजे मोह आणि क्षोभ यापासून पराङ्मुखता होय. "

महावीर वाणी

कुणाल कन्स्ट्रक्शन

तारा ट्रेडर्स

राज कन्स्ट्रक्शन

' पुष्प निकेतन '
बॅचलर रोड, वर्धा - ४४२ ००१
फोन : ४४१४७

आत्मसुधारणा व्हाया असावी पापभीरुता ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आमच्या हार्दिक शुभेच्छा

" मनुष्य जन्माने मोठा होत नाही, तो मोठा होतो आत्मनिर्भरता, सत्य आणि चारित्र्य यामुळे."

– महावीर वाणी

अपूर्व सार्वजनिक टेलिफोन केंद्र

गोरस भांडारजवळ, रामनगर, वर्धा.

फोन – ४५१४४

प्रशांत रंगनाथजी चवडे
रामनगर, वर्धा

हार्दिक शुभेच्छा !

" प्राणीमात्राविषयी मैत्रीभाव, गुणीजनाविषयी आदरभाव, दुःखी कष्टी जीवाविषयी कृपाभाव आणि विरोधकाविषयी माध्यस्थभाव या गुणांचा परिपोष व्हावा. "

– महावीर वाणी

इंद्रधनु झेरॉक्स

मेन रोड, आर्वी मोटार स्टँड, वर्धा

सन्मतीनगर ले-आऊट

सिंदी (मेघे)

श्री सुरेशचंद्र भैय्यालालजी मांडवगडे
श्री सुनील सुरेशचंद्रजी मांडवगडे

मिथ्याज्ञान असे माता दुःखाची जन्मदायिनी ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हार्दिक शुभेच्छा

" प्रत्येक आत्मा स्वतंत्र आहे. त्याचा उद्धारकर्ता तोच आहे. दुसरा कोणी नाही. शुद्धात्मा हाच परमेश्वर, त्याचीच तू उपासना कर. "

— महावीर वाणी

अमित क्वालिटी फॅब्रिकेटर्स

वार्ड नं. २७, रामनगर, वर्धा - ४४२००१

फोन - २१६९

★ स्टील स्ट्रक्चर्स फेब्रीकेटींग,

★ फर्निचर मॅन्युफॅक्चरींग

★ जनरल इंजिनिअरिंग सर्व्हीसेस

अनिलकुमार महादेवराव फुलंबरकर

रामनगर, वर्धा

असे निवास सौख्याचा सद्गुणात निरंतर ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

माणसाचा विकास म्हणजे आत्मगुणांचा विकास

डॉ. सुभाषचंद्र अक्कोळे
संपादक प्रगति आणि जिनविजय, सांगली

सध्या विज्ञानाने जो विकास साधला आहे त्यामुळे मानवी जीवन बाह्यदृष्टीने खूपच सुखाचे झाले आहे. पण त्यात माणसाचा खऱ्या अर्थाने विकास झाला नाही असे तत्व-चिंतकांना वाटते. काही जुन्या विचारांच्या सनातनी व धर्मभोळया लोकांचे असे मत नेहमीच ऐकायला मिळत असते, पण त्याकडे बुद्धीवादी विचारवंत दुर्लक्ष करतात. कारण सनातनी व धर्मभोळया लोकांचा समावेश तत्वचिंतकांत होत नाही. पण जेव्हा तत्वचिंतक बुद्धीवादी विचारवंतही विज्ञानाने साधलेली प्रगती म्हणजे मानवाची खरी प्रगती नव्हे. मनुष्य अजूनही 'मनुष्य' च झाला नाही असे निःशंकपणे म्हणतात तेव्हा मात्र त्याचा अर्थबोध करून घेणे आवश्यक होऊन बसते.

विज्ञान आणि अध्यात्म यांचा एकमेकात विरोध मानण्याचे काहीच कारण नाही. विज्ञान हे केवळ भौतिक सत्याचा शोध घेते व आध्यात्म हे केवळ आत्मसत्याचा शोध घेते असेही समजण्याचे कारण नाही. एका सत्या-चीच ही विविध रूपे आहेत. मानवी जीवनाच्या विकासात विज्ञाना इतकेच अध्यात्माचे महत्व आहे. किंबहुना अध्यात्माकडे दुर्लक्ष केल्यामुळे वैज्ञानिक प्रगतीला क्रुर असे संहारक स्वरुप येत चालले आहे. भौतिक व आर्थिक विकासा-बरोबर माणसांच्या आत्मगुणांचा विकास झाला नाही तर जीवनात संतुलन राहत नाही.

अल्बर्ड आइन्टाईन यांनी 'ज्ञाता' व 'ज्ञेय' यात फरक करून म्हटलें आहे की, "माणसाने केवळ 'ज्ञेयप्रधान' न होता 'ज्ञाताप्रधान' ही झाले पाहिजे" आजचा माणूस 'स्व' चा विचार करीत नाही. तो बाह्य वस्तूंचाच अधिक विचार करतो त्यांचेंच ज्ञान मिळविण्याचा व त्यातूनच सुख प्राप्त करण्याचा तो आटोकात प्रयत्न करीत असतो. बाह्य वस्तूचे ज्ञान व सुख हंच त्याला सर्वस्व वाटतात. स्वतःला तो पूर्णपणे विसरुन जातो. आत्मा हा ज्ञाताद्रष्टा आहे त्याच्याशिवाय इतर सर्व काही ज्ञेयवस्तू आहे. परंतु सध्याच्या ज्ञानअवस्थंत ज्ञात्याला म्हणजे जाणणाऱ्याला काहीच महत्व नाही. तात्विक भाषेत सांगायचे झाले तर उपादनाचें महत्व राहिले नाही. निमित्ताचें महत्व अतिशय वाढले आहे माणसाची किंमत घसरली असून वस्तूचें भाव तेंजीत आहंत असा त्याचा अर्थ आहे.

आईनस्टाईन त्यांनी विज्ञान क्षेत्रात संशोधक म्हणून अपूर्व यश मिळविले. त्यांना एका प्रश्नकर्त्याने विचारले की, 'आता पुढील कामात जन्मात काय करणार? त्यावर त्यांनी सहजपणे उत्तर दिले की, –

या जन्मात मी ज्ञेयावर (Object) भरपूर काम केले, पुढील जन्मात मी ज्ञात्यावर (Subject) काम करु शकेन.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हार्दिक शुभेच्छा

" प्रत्येक आत्मा स्वतंत्र आहे. त्याचा उद्धारकर्ता तोच आहे. दुसरा कोणी नाही. शुद्धात्मा हाच परमेश्वर, त्याचीच तू उपासना कर. "

– महावीर वाणी

अमित क्वालिटी फॅब्रिकेटर्स

वार्ड नं. २७, रामनगर, वर्धा - ४४२००१

फोन – २१६९

★ स्टील स्ट्रक्चर्स फेब्रीकेटींग,

★ फर्निचर मॅन्युफॅक्चरींग

★ जनरल इंजिनिअरिंग सर्व्हीसेस

अनिलकुमार महादेवराव फुलंबरकर

रामनगर, वर्धा

असे निवास सौख्याचा सद्गुणात निरंतर ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

माणसाचा विकास म्हणजे आत्मगुणांचा विकास

डॉ. सुभाषचंद्र अक्कोळे
संपादक प्रगति आणि जिनविजय, सांगली

सध्या विज्ञानाने जो विकास साधला आहे त्यामुळे मानवी जीवन बाह्यदृष्टीने खूपच सुखाचे झाले आहे. पण त्यात माणसाचा खऱ्या अर्थाने विकास झाला नाही असे तत्वचिंतकांना वाटते. काही जुन्या विचारांच्या सनातनी व धर्मभोळया लोकांचे असे मत नेहमीच ऐकायला मिळत असते, पण त्याकडे बुद्धीवादी विचारवंत दुर्लक्ष करतात. कारण सनातनी व धर्मभोळया लोकांचा समावेश तत्वचिंतकांत होत नाही. पण जेव्हा तत्वचिंतक बुद्धीवादी विचारवंतही विज्ञानाने साधलेली प्रगती म्हणजे मानवाची खरी प्रगती नव्हे. मनुष्य अजूनही 'मनुष्य' च झाला नाही असे निःशंकपणे म्हणतात तेव्हा मात्र त्याचा अर्थबोध करून घेणे आवश्यक होऊन बसते.

विज्ञान आणि अध्यात्म यांचा एकमेकात विरोध मानण्याचे काहीच कारण नाही. विज्ञान हें केवळ भौतिक सत्याचा शोध घेते व आध्यात्म हे केवळ आत्मसत्याचा शोध घेते असेही समजण्याचे कारण नाही. एका सत्याचीच ही विविध रूपे आहेत. मानवी जीवनाच्या विकासात विज्ञाना इतकेच अध्यात्माचे महत्व आहे. किंबहुना अध्यात्माकडे दुर्लक्ष केल्यामुळे वैज्ञानिक प्रगतीला क्रुर असे संहारक स्वरुप येत चालले आहे. भौतिक व आर्थिक विकासाबरोबर माणसांच्या आत्मगुणांचा विकास झाला नाही तर जीवनात संतुलन राहत नाही.

अल्बर्ट आइन्टाईन यांनी 'ज्ञाता' व 'ज्ञेय' यात फरक करून म्हटलें आहे की, "माणसाने केवळ 'ज्ञेयप्रधान' न होता 'ज्ञाताप्रधान' ही झाले पाहिजे" आजचा माणूस 'स्व' चा विचार करीत नाही. तो बाह्य वस्तूंचाच अधिक विचार करतो त्यांचेंच ज्ञान मिळविण्याचा व त्यातूनच सुख प्राप्त करण्याचा तो आटोकात प्रयत्न करीत असतो. बाह्य वस्तूचे ज्ञान व सुख हंच त्याला सर्वस्व वाटतात. स्वतःला तो पूर्णपणे विसरुन जातो. आत्मा हा ज्ञाताद्रष्टा आहे त्याच्याशिवाय इतर सर्व काही ज्ञेयवस्तू आहे. परंतु सध्याच्या ज्ञानअवस्थंत ज्ञात्याला म्हणजे जाणणाऱ्याला काहीच महत्व नाही. तात्विक भाषेत सांगायचे झाले तर उपादनाचें महत्व राहिले नाही. निमित्ताचें महत्व अतिशय वाढले आहे माणसाची किंमत घसरली असून वस्तूचें भाव तेंजीत आहेत असा त्याचा अर्थ आहे.

आईनस्टाईन त्यांनी विज्ञान क्षेत्रात संशोधक म्हणून अपूर्व यश मिळविले. त्यांना एका प्रश्नकर्त्याने विचारले की, 'आता पुढील कामात जन्मात काय करणार? त्यावर त्यांनी सहजपणे उत्तर दिले की, –

या जन्मात मी ज्ञेयावर (Object) भरपूर काम केले, पुढील जन्मात मी ज्ञात्यावर (Subject) काम करु शकेन.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मी काय आहे. माझे स्वरूप कोणते माझे सुखदुःख म्हणजे नेमके काय ? यांची उत्तरे आजचा ज्ञानी माणूस देऊ शकत नाही. स्वतःच्या आत्म्याचा विकास होण्यासाठी तो काहीही प्रयत्न करीत नाही. माणूस म्हणून त्याच्या सद्गुणाचा जो विकास व्हायला पाहिजे त्याचा सध्याचा समाजव्यवस्थेत विचार होत नाही. त्यासाठी आदर्श संस्कार कोठेही लाभू शकत नाहीत. हे सत्य निश्चितपणे आईन्स्टाईन सारख्या ज्ञानी माणसाच्या लक्षात आले होते.

आदर्श 'माणूस' निर्माण करण्याचे प्रयत्न नेहमी होत आले आहेत व पुढे होत राहतीलही. अगदी भ. ऋषभदेवापासून माणसातील पशुत्व घालवून त्याच्यावर योग्य संस्कार करण्याचे प्रयत्न झाले. राम, कृष्ण महावीर, बुद्ध, महात्मा गांधी अशी ही थोर थोर परंपराही आमच्या देशाला लाभली. इतके असूनही आजची आमची अवस्था संस्कारहीन असंस्कृत माणसासारखीच आहे. सर्व जगातही अशीच स्थिती आहे.

त्यामानाने बाह्यवस्तूंचे रूप दिवसे–दिवस बदलत चालले आहे. विज्ञानामुळे ही प्रगती होत आहे. जीवनात समृद्धी दिसते. पण माणसांच्या अंतरंगात उत्तम गुणांची समृद्धी दिसत नाही. शिक्षणातून तो सुधारेल म्हणून शिक्षणाचें शास्त्र विकसित झालें पण अपेक्षित माणूस काही घडेना. सत्य, अहिंसा, मित्र भावना, सहिष्णुता शील, यांनी संपन्न नागरिक तुलनेने किती दिसतात ? या सगळ्या शब्दांचा अगदी चलनी नाण्याप्रमाणे उपयोग मात्र होत असतो. माणसात काही पोलीस, सैन्य, अणुबाँब यांच्या भीतीने तरी सुधारणा झाली काय ? क्रुरता वाढलेली दिसते पण निर्भयता कुठेच दिसत नाही. भित्रेपणा तर सर्वत्र भरला आहे. भ्रष्टाचारालाही तोटा नाही, खरे पाहिले तर सत्ता सेवेसाठी लाभत असते. पण माणूस सत्तेसाठी धडपतो. सारे राजकारण या सत्ते–भोवती घोटाळत आतहे. चारित्र्याची घडण कोणत्या प्रयोगशाळेतून होणार ? आम्हाला तर आत्मज्ञान व त्यातून होणारा माणूसकीचा विकास अपेक्षित आहे. आईन्स्टाईनचा पुनर्जन्म त्यासाठीच हवा आहे ! पुढील जन्मात त्या–साठी प्रयत्न करण्याचें त्यांनी अभिवचन दिलें आहे.

अध्यात्म आणि बाह्य वैभव यांचें संतुलन राखणारी शक्ति जागृत झाली तरच नवा माणूस जन्माला येईल. आज ते संतुलन राहीले नाही. साधू म्हणून घेणाऱ्यांना व्याभि–चाराबद्दल कारावासात घालावे लागते, खुना–बद्दल राष्ट्रप्रमुखाला फाशी द्यावी लागते. माणसाने विश्वास तरी कोठे ठेवावा ? आद–राची सगळीच स्थाने अशी भ्रष्ट झाल्यानंतर माणसाचा विकास कसा संभवतो ? जेथे प्रति–ष्ठाकडूनच अध्यात्माची थट्टा होते. अपरिग्रह व सत्यनिष्ठा यांचा उपहास होतो व अश्ली-लतेंचें समर्थन होऊ लागते तेथे माणुसकीचा विकास होणे शक्य नाही. जगात विज्ञानाची कितीही प्रगती झाली तरी जोपर्यन्त संयमातून माणूस आत्मसुखाकडे वळणार नाही तोपर्यन्त त्याचा विकास अशक्य आहे. आमच्या धर्माने स्पष्टपणें घोषित केले आहे की, क्रोध, मान, माया, आणि लोभ यांच्यावर विजय मिळवून मनोवृत्ती बदल्याशिवाय माणसाच्या आत्म्याचा विकास होत नाही.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असा मी घडलो !

– बापुसाहेब पाटील. ठाणे

(आपल्या साहसाने आणि कठोर परिश्रमाने उद्योगपती झालेले जैन कारखानदार श्री बापुसाहेब पाटील यांची जडणघडण जैन युवकांना मार्गदर्शक ठरेल. – संपादक)

परिश्रमाचे बाळकडू –

माझे बालपणचे शिक्षण कोल्हापूर जिल्हयातील बाहुबलीच्या डोंगरपायथ्याशी असलेल्या श्री बाहुबली ब्रम्हचर्याश्रमात प. पू. गुरुदेवश्री समंतभद्रजी महाराज यांच्या देखरेखीखाली झाले. प्रत्येक वर्गात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणारा मी विद्यार्थी. १९६४ साली एस्. एस्. सी. परीक्षा विद्यालयात प्रथम क्रमांक मिळवून मी उत्तीर्ण झालो. त्या काळी इंजिनिअरिंग शिक्षणाला फार मोठी प्रतिष्ठा असल्यामुळे ते शिक्षण घेण्याची माझी इच्छा होती. कुटुंबामध्ये मोठा मुलगा असल्यामुळे वडिलांचे गणित फार सोपे होते. इंजिनिअरिंगसाठी ५ वर्षे फी भरून शिक्षण घेण्यामध्ये काळाचा व पैशाचा अपव्यय आहे. त्याऐवजी घरची शेती केली तर इंजिनिअरिंग शिक्षणानंतर मिळणारा पैसा हातोहात मिळायला लागेल अशी त्यांची धारणा होती. परंतु माझ्या महत्त्वाकांक्षी मनाला ते पटले नाही. 'धन–कन–कंचन–राजसुख सबही सुलभ कर जान । दुर्लभ है संसार में, एक जथारथ ज्ञान ।' अशी शिकवण मला आश्रमात मिळाली होती. आई शिक्षित व कामसू असल्यामुळे सतत परिश्रम करण्याचे बाळकडू मला मिळाले होते. आजोबा आणि वडील उद्योगी असल्यामुळे मलाही मेहनतीची संवय होती. त्यामुळे स्वावलंबाने शिक्षण घ्यावे म्हणून मी १९६४ साली मुंबईला आलो,

हार्ड नॉक्स विद्यापीठाचा पदवीधर –

मुंबईत नाना प्रकारचे उपद्व्याप करून कामाला सुरूवात केली. आणि शिक्षणाच्या संधीची वाट पाहत राहलो. कोणतेही काम करण्यात मला कमीपणा वाटला नाही. १९६५ च्या सुमारास बर्मा शेलमधील अॅप्रेंटिसशीपसाठी ३००० विद्यार्थ्यातून माझी निवड झाली. 'फिटर' ट्रेडचा माझा तीन वर्षाचा अभ्यासक्रम १ जानेवारी १९६६ पासून सुरू झाला. इंजिनिअरिंग शिक्षणाचे पहिले धडे मी तेथेच गिरविले. कंपनीच्या सर्व विभागामध्ये आम्हाला प्रशिक्षण मिळाले. गुणवत्तेवरच माझी निवड झाली असल्यामुळें माझा आत्मविश्वासही वाढला. तेथे शिक्षण घेत असतांना आलेल्या अनुभवातून माझी जडणघडण होत होती. कंपनीतील ब्रिटीश अधिकाऱ्यांचे चांगले गुण मला जवळून टिपता आले. त्यांच्यातील माणूस आणि माणूसकी या दोहोंचे दर्शन मला जवळून घडले. नकळत मनामध्ये स्पर्धा व जिद्द निर्माण झाली. न्यूनगंड केव्हाच गळून पडला. आश्रमामध्ये लहानपणी शिकलेल्या म्हणी मला प्रकर्षाने आठवतात.

'Nothing teacher teaches better than a careful observation ! तसेच Not failure but low aim is crime.'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्वतःच्या सूक्ष्म निरीक्षणासारखा दुसरा उत्तम शिक्षक नाही आणि अपयशाला घाबरून उच्च-ध्येय न बाळगणें यासारखा दुसरा गुन्हा नाही हे माझ्या मनावर पक्के ठसले.

माझे शिक्षण अव्याहतपणे सुरू आहे आणि राहील. जीवन हेच माझे मोठे विद्यापीठ आणि महाविद्यालय आहे. यासंबंधात एक अनुभव सांगतो. एक अमेरिकन जोडपे माझ्या परदेश प्रवासात मला भेटले. त्यांच्याशी गप्पा मारतांना साहजिकच त्यांनी माझ्या व्यवसाया-ची व शिक्षणाची चौकशी केली. माझी माहिती ऐकल्यांवरं त्या अमेरिकन बाईच्या तोंडून उत्स्फूर्त उद्गार बाहेर पडले, 'Oh ! you graduated from Hard knocks University.' 'परिस्थितीतून तावून सुलाखून टक्के टोणपे खाऊन तयार झालेल्या पदवीधर तू आहेस तर !' यापेक्षा मोठी पदवी ती कोणती ? ज्ञान मिळविण्याची तीव्र इच्छा आणि सतत नवीन काहीतरी कर-ण्याचा हव्यास माझ्यात होता.

परदेशी कंपन्यांना भेटी –

वर्षातून दोन-तीनदा युरोप-अमेरिके-तील औद्योगिक प्रदर्शने, शास्त्रीय संशोधन शाळा, व्यापारी कंपन्या आणि विश्वविख्यात फिल्टर्स उत्पादक कंपन्या याना मी भेटी देत असतो. त्यामुळे विविध क्षेत्रातील तज्ज्ञ लोकांची, त्यांच्या संशोधन कार्याची आणि आधुनिक तंत्रज्ञानाची सखोल माहिती मिळ-ण्यास मोठीच मदत झाली. माझ्या ग्रंथसंग्रहा-मध्ये आधुनिक तंत्रज्ञानावरील पुस्तके, विद्वानांचे प्रबंध आणि परदेशातील बहुराष्ट्रीय कंपन्याची माहितीपत्रके उपलब्ध आहेत. आंपल्या देशाला उपयुक्त असे तंत्रज्ञान निवड-ण्यास त्यांचा चांगला उपयोग होतो. कोणतेही तंत्रज्ञान जसेच्या तसे वापरणे धोक्याचे असते. आपल्याकडील भौगोलिक परिस्थिती, कच्चा माल, उपलब्ध तंत्रज्ञान व यंत्रे यांचा उपयोग करून स्वदेशातील कारखान्यांना ते तंत्रज्ञान वाजवी किंमतीला उपलब्ध करून देण्यासाठी या माहितीचा उपयोग होतो.

जल शुद्धीकरणाचे नवीन तंत्रज्ञान

सध्या मी 'पाणी शुद्धीकरणा'च्या नवीन तंत्रज्ञानावर माझे लक्ष केंद्रित केले आहे. महाराष्ट्राला अवर्षणामुळे दुष्काळ आणि तीव्र पाणी टंचाई भेडसावीत आहे. मी खेडे-गावचा असल्यामुळे पाणी टंचाईचा व माझा लहानपणापासूनचा संबंध आहे. पाण्याला 'जीवन' म्हणतात. त्या जीवनाच्या शोधात आपण सर्वजण आहोत. मी ही त्यातीलच एक वारकरी· 'Reverse Osmosis' या तंत्राचा पाश्चात्या देशामध्ये गेल्या २५ वर्षात बराच विकास झाला आहे· या तंत्राने समुद्राचे पाणी औष्णिक शक्ती न वापरता शुद्ध करून पिण्यायोग्य बनविण्यात येते पारंपारिक बाष्पीभवन तंत्राप्रमाणे औष्णिक शक्ती वापरून समुद्रजलाचे बाष्पीकरण करून ते शुद्ध करण्याचा प्रयोग खूप खर्चाचा झाला आहे. त्यामुळे पर्यायी तंत्रज्ञानाच्या शोधातून हे तंत्र विकसित झाले· गेल्या २० वर्षापासून व्यापारी तत्त्वावर ही पद्धती वापरून पाणी शुद्ध केले जाते वाया जाणारे पाणीही या तंत्राने शुद्ध करून पिण्यायोग्य बनविता येते. रुग्णालये इलेक्ट्रॉनिक उद्योग यांना लागणारे जंतु विरहित पाणी या तंत्राने करता येते. ही पद्धती अतिशय गहन असल्याने सामान्य माणसाला ती सहसासहजी समजणे कठीण

Ganesh Varni Digambar Jain Institute, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहे. या पद्धतीमध्ये अतिसंवेदनक्षम पातळ पडद्याचा वापर करून त्यावर एका बाजूने समुद्राचे पाणी उच्च दाबाने सोडण्यात येते. पडद्यावरून ते वाहत जातांना शुद्ध पाणी त्या मधून पलीकडे जाते आणि त्यातील क्षाराणू पडद्याच्या त्याच बाजूला राहतात. अशा रीतीने एका बाजूला शुद्ध पाणी व दुसऱ्या बाजूला अतिखारट पाणी मिळते. जागतिक आरोग्य संघटनेच्या प्रमाणानुसार पिण्याच्या पाण्यामध्ये ५०० क्षाराणू असले तरी चालतात. या पद्धतीने मिळालेले पाणी ५० ते १०० क्षाराणू असलेल्या पाण्याइतके स्वच्छ होते. आधुनिक विज्ञानाला माहीत असलेले पाणी शुद्ध करण्याचे हे उत्तम तंत्रज्ञान आहें. आपल्या देशात भाभा अनुसंधान केंद्र, भावनगर येथील सी. अेस्. एम्. सी. आर. आय्. आणि आय्. आय्. टी. मुंबई इत्यादि संस्था या तंत्रावर संशोधन करीत आहेत.

भारतीय नौसेनेची त्याचप्रमाणे अन्य व्यापारी जहाजे 'बॉम्बे हाय' मधील तेल आणि नैसर्गिक वायू मंडळाच्या रिंग्ज, संरक्षण दलाचे वाळवंटातील पायदळ वगैरे ठिकाणी या तेलाचा वापर केला जात आहे. काही नवीन कारखान्यामध्ये आणि दवाखान्यात सुद्धा त्याचा वापर होत आहे. परंतु आज तरी आपल्याला याबाबतीत आयातीवरच अवलंबून राहावे लागते. त्यामुळे या तंत्राचा तितकासा फायदा झाला नाही. हल्लीच्या औद्योगिक परिस्थितीकडे पाहता तंत्रज्ञान आत्मसात् करण्याची जिद्द व चिकाटी यांचा अभाव आढळतो. हे तंत्रज्ञान आत्मसात् करण्यासाठी त्याचा पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय स्तरावर गौरव –

मला १९८६ मध्ये राष्ट्रीय पातळीवर 'कै. आ. रा. भट राष्ट्रीय उद्योजकता पारितोषिक' आणि १९८७ मध्ये 'उद्योगपत्र' हे पारितोषिक मिळालें. कै. आ. रा. भट उद्योजकता पारितोषिक हे भारतीय लघुउद्योग संघटनांच्या महासंघाकडून देण्यात येणारे राष्ट्रीय स्तरावरील पारितोषिक आहे. लघु उद्योजकांना उत्पादनक्षमता, रोजगार निर्मिती, परदेशी मालाऐवजी तितक्याच गुणवत्तेचे भारतीय उत्पादन, नवीन संशोधन इत्यादि विवध क्षेत्रातील प्राविण्याबद्दल ते देण्यात येते. आमच्या लघुउद्योगाला १९८५ सालासाठी हे पारितोषिक मिळाले आहे. 'उद्योगपत्र' हे पारितोषिक विशेष कर्तृत्व दाखविणाऱ्या लघुउद्योजकांना 'औद्योगिक व्यापार आणि विकास महामंडळ, नवी दिल्ली' यांच्याकडून दिले जाते. या संस्थेच्या सल्लागार मंडळावर आणि निवड समितीवर प्रथितयश ज्येष्ठ कारखानदार व खासदार आहेत. हे पारितोषिक पूर्व विजेत्याकडून नाव सुचविले गेल्याशिवाय मिळत नाही. याचे खास वैशिष्टय म्हणजे पूर्वानुभव नसलेल्या उद्योजकाला त्याच्या स्वकर्तृत्वावरच मिळते. औद्योगिक पार्श्वभूमी असलेल्या किंवा व्यापारी घराण्यातील व्यक्तीला ते मिळत नाही. पहिले पारितोषिक तत्कालीन केंद्रीय उद्योगमंत्री मा. नारायणदत्त तिवारी यांच्या हस्ते मला देण्यात आले. या समारंभाचे उद्घाटन तत्कालीन पंतप्रधान मा. राजीवजी गांधी यांनी केले होते. दुसरे पारितोषिक तत्कालीन राष्ट्रपती श्री ग्यानी झैलसिंग यांच्या शुभहस्ते मला १९८७ मध्ये देण्यात आले.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बास्प उद्योग समूह
(BASP Industries)

आमच्या BASP Industries या कारखान्यात आम्ही रासायनिक औषधी, पेट्रोकेमिकल्स इत्यादी प्रक्रिया करणाऱ्या कारखान्यांना लागणाऱ्या घनरूप, द्रवरूप आणि वायुरूप पदार्थांचे शुद्धीकरण आणि पृथक्ककरण करण्यासाठी लागणाऱ्या उपकरणांचे म्हणजेच 'फिल्टर्स' चे उत्पादन करतो. प्रत्येक उद्योगाच्या गरजेनुसार आम्ही वेगवेगळे फिल्टर्स बनबतो. उदाहरणार्थ, आमचा 'स्पायलर फिल्टर' हा अतिशय साधा असून द्रवरूप पदार्थातील कचरा काढण्यासाठी त्याचा उपयोग होतो. स्विस रचनेबरहुकूम हा फिल्टर आम्ही १९७२ साली प्रथम बनविला. त्यानंतर सुधारित असे अनेक फिल्टर्स आम्ही तयार केले. 'रोटरी लीफ फिल्टर्स' धन आणि द्रव पदार्थातील शुद्धीकरणासाठी वापरण्यात येतो. १९८२ पासून भारतामध्ये आम्ही त्याचे एकमेव उत्पादक आहोत. जगभरच्या अनेक रचनांचा अभ्यास करून आम्ही हा फिल्टर तयार केला आहे. तो संपूर्णपणे देशी बनावटीचा आहे. पेट्रोल व तज्जन्य पदार्थातून कचरा व पाणी काढून टाकण्यासाठी उपयोगी असा 'वॉटर फिल्टर' (सेपरेटर) आम्ही बनवितो. जगातील तीन कंपन्यांनी हे तंत्र विकसित केले असून अमेरिकन कंपन्यांच्या तांत्रिक सहकार्याने हे फिल्टर्स आम्ही बनवितो. त्यामध्ये ८० टक्के भाग देशी बनावटीचा असून २० टक्के भाग आयात करतो. मुंबई – पुणे पेट्रोल पाईप लाईनसाठी आम्ही हे फिल्टर्स पहिल्यांदा भारतात तयार केले. विमान इंधनाच्या शुद्धीकरणासाठीही आम्ही पेट्रोलियम कंपन्यांना ते बनवून देतो. या फिल्टर्सचा योग्य वापर केला तर सूक्ष्म कचरा व पाण्याचे कण निघू शकतात. त्यामुळे प्रचंड गतीच्या इंजिनांचे रक्षण होऊन त्यांचे आयुष्य वाढते. 'अॅक्वाकॉन फिल्टर्स' हे तेलामधील पाण्याचा २ दशलक्षांश भाग (२ पी. पी एम.) शोषून घेतात आणि कुठल्याही परिस्थितीत इंजिनात पाणी जाऊ देत नाहीत, म्हणून त्यांना 'रक्षक फिल्टर्स' असे म्हटले जाते. द्रवरुप पदार्थातील कचरा काढण्यासाठी पूर्णतः देशी बनावटीचा 'स्टार फिल्टर' आम्ही बनवितो. या फिल्टरचे खास वैशिष्ट्य म्हणजे उच्च तपमान आणि उच्च दाब यासाठी ते अतिशय चांगले चालतात आणि त्याची साफसफाई फिल्टर न उघडताच करता येते. या फिल्टरची पूर्ण रचना आमच्या कारखान्यात केली आहे. आमच्या कारखान्यात १९७४ ते १९८७ या कालावधीत निरनिराळ्या फिल्टर्सचे उत्पादन दोन ते अडीच कोटी रुपयाचे झाले. म्हणजेच आम्ही ५ कोटी रुपयांचे परकीय चलन वाचविले. आयात मालाच्या तुलनेत आमच्या उत्पादनाची किंमत जवळ जवळ एकपंचमांश असते.

आमची सामुग्री ग्राहकांच्या गरजेनुसारच बनविली जाते. त्यांची संरचना आन्तरराष्ट्रीय मानक संस्थेच्या नियमानुसार करावी लागते. त्याचबरोबर यंत्रनिर्मितीच्या प्रत्येक टप्प्यावर दर्जात्मक चाचणी घ्यावी लागते व त्याची प्रमाणित नोंद ठेवावी लागते. अनेकदा आन्तरराष्ट्रीय इन्स्पेक्शन एजन्सीज या चाचण्या प्रत्यक्ष तपासून तसे प्रमाणपत्र देतात. गुणवत्ता निरीक्षक अधिकाऱ्याने मालाच्या नामफलकावर व यंत्राच्या माहिती पुस्तकावर विशिष्ट कोड – स्टॅम्प मारून शिक्का मोर्तब केल्याशिवाय कोणताही माल कारखान्याबाहेर जात नाही. सामन्यतः एपीआय,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

एएसएमई (अमेरिकन), बीअेम (ब्रिटीश) डी. आय. एन (जपानी) या सारख्या आंतरराष्ट्रीय मानकाबरहुकूम आम्ही माल तयार करतो.

उठा ! जागे व्हा ! !

महाराष्ट्रातून सध्या अस्तित्वात असलेल्या कारखान्याचे इतर राज्यामध्यं स्थलांतर होत होत आहे आणि नवीनं कारखाने निघत नाहीत असे सकृद्दर्शनी वाटते. परंतु महाराष्ट्राचा विचार करता ते तितकेसे खरे नाही. देशातील उत्पादकता गुंतविलेल्या दर रुपयागणिक रू. १३८ आहे तर महाराष्ट्रात ती दर रुपयागणिक रु. २.०३ इतकी आहे महाराष्ट्र शासनाच्या आणि देशाच्या औद्योगिक धोरणामुळे लघुउद्योगांची वाढ झाली असून मध्यम वर्गातील तरूण इंजिनिअर व कुशल कारागीर यांना स्वतःच्या कारखान्याचें स्वप्न प्रत्यक्षात साकार करता येत आहें. कारखानदार म्हणून मुठभर लोकांची असणारी मक्तेदारी संपुष्टात येऊ लागली आहे. स्वयंरोजगार योजना, तंत्रज्ञ साहाय्य योजना अशा अशा अनेक योजनामुळे औद्योगिकरणाला निंश्चितपणे चालना मिळाली आहें.

सद्यःस्थितीचा विंचार केला तर लक्षात यईल की आजचा कामगार युवक, पांढरपेक्षा वर्ग सामाजिक घटकांना आपल्या हक्काची योग्य जाणिव झाली आहें. पण तेवढया प्रमाणात त्यांना आपल्या कर्तव्याची जाणीव झालेली नाही. नागरिकशास्त्रात एक समर्पक उक्ती आहे की, Rights without duties are like men withont shadows' अर्थात कर्तव्याविना हक्क म्हणजे पडछायेविना व्यक्ती हक्क व कर्तव्य यांचा अन्योन्य संवंध आहे. आपण अत्याचार, अनाचार, भ्रष्टाचार अनागोंदी कारभार अशा भयंकर परिस्थितीतून जात आहोत. किंबहुना हे सर्व आपल्या अंगवळणी पडलेले आहे. कधी असहाय्यपणे तर कधी सोयीस्करपणे याकडे दुर्लक्ष करायला आपण शिकलो आहोत. हे असेच चालायचें म्हणून पुढील पिढीवर संस्कार करीत आहोत. हे सर्व विनाविलंब थांबविले. पाहिजे. आपल्या राष्ट्राची उत्पादकता ही एकमेव बाब आपणास तारील किंवा मारील. जपान सारख्या चिमुकल्या राष्ट्रानेही उत्पादकतेच्या जोरावर अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राला नमविलेले आपण वाचतो आणि पाहतो. म्हणून आपण प्रतिज्ञा करु या की प्रत्येकाने जमेल त्या मार्गाने उत्पादकता वाढयिण्यासाठी .प्रयत्न खारीचा वाटा उचलून संपत्तीचा व समृद्धीचा डोंगर उभा करु या.

'उत्तिष्ठत. जाग्रत. प्राप्य वरान् निबोधत ।'

म्हणजे उठा, जागे व्हा. ध्येयसिद्धीप्रत जागृत रहा पूर्वसूरींचा संदेश आचरणात आणून –
मुकी बिचारी कुणी हका, अशी मेंढरे बनू नका
गेल्या गोष्टी स्मरु नका, अन् गतकाळाची शोक फुका ।।
जाते घडी ही आपुली साधा, करी काय ते अता करा ।
आजचें उद्यावर लोटू नका, करा काय तें अतां करा ।।

श्री बापुसाहेब पाटील
बास्प इंडस्ट्रीज,
जी. पी. इंडस्ट्रीज कम्पाऊंड,
९६ पंच परवाडी लेविसवाडी,
ठाणे – ४०००६४

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पंच कल्याणिक पूजा उत्सव

ज्ञान-मूलक दृष्टिकोणातून बघा.

– प्रा. भालचंद्र नेटके, वर्धा

तीर्थंकर भगवान् गर्भात आल्यापासून मोक्षास जाईपर्यंत गर्भ, जन्म, तप, केवलज्ञान व मोक्ष या पांच प्रसंगास स्वर्गातील इंद्र, देव–देवता आदि येऊन जो पूजा–उत्सव करतात त्याला "पंच कल्याणिक" असे म्हणतात, असे वर्णन पारंपारिक ग्रंथातून केलेले आहे.

आजच्या युगांत आपण जो पंच-कल्याणिक पूजा–उत्सव साजरा करतो, ते एक नाटक आहे. या नाटकांत श्रीमंत लोक इंद्र, कुबेर, देव–देवतांची भूमिका करतात. या नाटकामध्ये जीव जन्मल्यापासून तो "मोक्ष" प्राप्त करेपर्यंत, तो कसे कसे पुरुषार्थ करतो व स्वत.चें उत्तरोत्तर "कल्याण" करीत जातो हे पांच अंकामध्ये दाखविले जाते.

आपणासही आपलें "कल्याण" करुन घेण्याची प्रेरणा मिळावी असा या नाटकाचा मुख्य उद्देश आहे. आपण जर या नाटकाकडे ज्ञानमूलक दृष्टिकोणांतून बघितले तर आपणासही मनोरंजनातून ज्ञान व आत्म-कल्याणाची प्रेरणा प्राप्त होईल.

१. गर्भ कल्याणिक– ज्या मातापित्यांना वाटते कीं त्यांचे घरी जन्मास येणारे मुल ज्ञानी, चारित्रसंपन्न असावे, त्यांना मूल गर्भांत येण्यापासूनच विचार करावा लागतो. केवळ विषय–वासनेतच जर जास्तीत जास्त काळ घालविला तर त्यांचें रक्त-रज-वीर्य ही तसेच विकारी तयार होते व त्यापासून निर्माण होणारे मूलही विकारी / दुष्ट प्रवृत्तीचे तयार होते. शुद्ध व पवित्र आचार-विचारांत व्यस्त राहणाऱ्या व्यक्तीच्या रज–वीर्यातून निर्माण होणारे मुलं निश्चितच ज्ञानी व चारित्र-संपन्न होतें. गर्भ धारण करणारी स्त्री शरीराने सुदृढ व मनाने प्रसन्न राहण्यासाठी तिला घरांत अनुकूल वातावरण उपलब्ध करून दिले पाहिजे. हेच काम नाटकांत "कुबेर" येऊन करतात. त्या स्त्रीवर कोणत्याही तऱ्हेचा शारीरिक व मानसिक अत्याचार होणार नाही यांची काळजी घरांतील लोकांनी घेतली पाहिजे. तिने स्वतः ज्ञान संपादनांत, दया, दान, आदि धर्म कार्यात रत राहिलें पाहिजे. तिचे जसे शुद्ध व पवित्र विचार असतील, तसेच तिची स्वप्ने राहतील. हेच प्रथम अंकापासून शिकण्यासारखे आहे.

२. जन्मकल्याणिक – बाळाचा जन्म झाल्यानंतर ज्याप्रमाणे श्रीमंतलोक बाळाचा जन्मोत्सव मोठ्या थाटामाटाने करतात, तसाच या नाटकांतही करतात. मुलाचा जन्म झाल्या-वर, लहानवयातच ते संस्कारक्षम असते. या वयांतच त्याला योग्य ते संस्कार दिल्यास ते उत्तम संस्कारित होऊन चारित्रसंपन्न होते. त्यासाठी त्याचें माता-पिता, मित्र-मैत्रिणी, शिक्षक-शिक्षिका व समाज कारणीभूत आहेत. माता-पित्यास मुलगा अगदी जवळून बघत असतो. त्यांची जशी वागणूक-व्यवहार असेल, त्याप्रमाणें तोही वागायला शिकतो. माता-पिता संयमी असतील तर मुलगा ही संयमी होईल. माता-पिताच जर विलासी, तामसी असतील तर त्याचेवर होणारा संस्कारही तसाच होईल. तोही विलासीच होईल. उशीरा रात्री असणारे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विषय-वासनेची चलचित्रे टी. व्ही. वर तोही पाहील. माता-पित्याने मनाला मुरड घालून संयमी जीवन जगण्याचा संस्कार, त्याला सद्गुणी व्हावयासाठी वारंवार प्रोत्साहित करण्याच्या संस्काराचा बोध या अंकापासून घेता घेईल.

३. दीक्षा-कल्याणिक – गर्भावस्थेतील संस्कार, तसेच बालवयांतील संस्कार मुख्यत्वाने माता-पित्यास करावयाचे असतात. आता मूल मोठे झालेले असते. तो समजदार झालेला असतो. ज्याला स्वतःचे "कल्याण" करून घ्यावयाचे असते. त्याने आपल्या जीवनांत, आपल्या कर्तव्याप्रति "दक्ष" राहायला पाहिजे. आत्म कल्याणासाठी, खऱ्या चिरंतन सुखासाठी जो सतत सतर्क असतो, तोच खरा दीक्षित होय. यासाठी तो अहिंसा, सत्य, आदि व्रतांचे तसेच क्षमादि धर्माचे पालन करून आपली प्रगतीची पुढील पायरी गाठतो. हेच या अंकात दाखविले आहे. तो आपली सर्व कामे निरासक्त भावनेने, फलाची आशा न ठेवता, कुठेही इच्छा अपेक्षा न बाळगता, व्याकुळ न होता, शांततेने पार पाडीत असतो. या आराधनेने त्याच्या मनाचे शुद्धीकरण होते व त्याच्या कल्याणाचा पुढील मार्ग सुलभ होतो. या दृष्टीने सामान्य लोकांना हा अंक अतिशय बोधप्रद ठरतो.

४. केवल-ज्ञान-कल्याणिक – आता तो जीव आत्मकल्याणाचा शेवटचा टप्पा गाठतो. क्षमा आदि व्यवहार धर्माचे आचरणांत आंजपर्यंत त्याने काळ घालविला, त्यामध्ये उत्तरोत्तर प्रगती करीत करीत, तो आता चिरंतन आत्मतत्वाच्या जवळ येऊन पोहोचला, तपस्वी झाला. त्याच्या प्रत्येक क्रियेत तो "स्वावलंबी" बनला. परक्यांची मदत न घेता प्रत्येक कार्य "स्वतंत्र" रित्या करण्याचा पुरूषार्थ तो करू लागला. तो नित्य ज्ञानमूलक जीवन जगू लागला. प्रत्येक वस्तूमात्रांची अस्तित्व-सत्ता त्याला कळू लागली. जीवनांतील मिथ्यात्वाला त्याने संपूर्णपणे दूर सारून आपल्या कल्याणाच्या अंतिम चरणांत त्याने प्रवेश केला. जीव निराकुल, निःशंक जीवनाचा आस्वाद घेतांना पाहून आपणासही अत्यंत आनंद होतो व आत्मकल्याणाची प्रेरणा मिळते.

५. निर्वाण-कल्याणिक – ज्ञानमूलक जीवन जगत जीवाने आता जीवनाचा अंतिम टपा गाठला. आता त्याला कसलीही इच्छा–अपेक्षा नाही. कसलीही खंत नाही, दुःख नाही. कोणताही परिग्रह नाही, फक्त आहे ते केवल सम्यग्ज्ञान व सम्यक्चारित्र. यातूनच सहजभावाने प्रकट होतो, इतर जीवाचे प्रति प्रेमाचा निरोप, कोठलाही कुणालाही आरोप न ठेवता, सर्वांचे कल्याणाची निकोप भावना, ममत्वाचा यांकिंचित ही लवलेंश न राहता, संपूर्णपणे क्षय झालेंला जीव खऱ्या अर्थाने "मोक्ष" प्राप्त करुन घेतो.

नाटकाचा हा अंक हृदय हेलावून सोडणारा असा आहे. त्या जीवाने स्वतः "मोक्ष" प्राप्त करून घेतला. स्वतःच्या कल्याणाबरोबर इतर जीवांचेही कल्याण व्हावे असा उदात्त विचार देऊन आमच्या मधून तो निघून जातो. आता स्थूल दृष्टीने जीव दिसत नाही. परंतु सुक्ष्म दृष्टीने त्याचा विचार, त्याने दिलेंला संस्कार, त्याने उपदेशिलेला बोध मात्र आमच्यावर कायमचा ठसा उमटवून जातो. नाटक संपल्यावर या आदर्श आत्मकल्याणाच्या संस्काराने आम्हीही भारावून जातो.

प्रा. भालचंद्र नेटके,
अनेकान्त स्वाध्याय मंदिर,
भ.महावीर मार्ग, रामनगर, वर्धा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आर्वी दर्शन

डॉ. विद्याधर जोहरापूरकर
नागपूर

वर्धा में होने जाने जा रहे पंचकल्याणिक के निमित्त से वर्धा जिले के पुराने मंदिरों के दर्शन का विचार उत्पन्न हुआ तथा श्री विद्याधर उमाठे तथा श्री मुलचंद बडजात्या के सहयोग से आर्वी के मंदिरों के दर्शन का योग संभव हुआ। आर्वी नगर वर्धा जिले के पश्चिम छोर पर हैं। यहां दिगंबर जैन समाज के लगभग अस्सी परिवार रहते हैं। जिन मे सैतवाल, परवार तथा खंडेलवाल इन तीन जातियों का समावेश हैं। सैतवाल समाज के प्रबंध में जो जिनमंदिर है उस में श्री आदिनाथ की मूल-नायक प्रतिमा हैं तथा दुसरे मंदिर की मूल-नायक प्रतिमा श्री पार्श्वनाथ की है। ये दोनो प्रतिमाएं लगभग दो सौ वर्ष पूर्व एक प्रवासी व्यापारी से खरीदी गई थी ऐसा कहा जाता है। लगभग सौ वर्ष पूर्व पार्श्वनाथ मंदिर में तीन वेदियों की वृद्धी हुई जिन्हें हंसराजजी का मंदिर, मांजी का मंदिर तथा बेटी बाई का मंदिर कहा जाता हैं। ये मंदिर बहुरंगी काच की नक्काशी से सुशोभित हैं। दोनो मंदिरों में अधिकांश पुराने मंदिरों की तरह सं. १५४८ में भट्टारक जिनचंद्र द्वारा प्रतिष्ठापित कुछ मूर्तियां हैं जिन के प्रतिष्ठापक राजस्थान के मुडासा शहर के सेठ जीवराज पापडीवाल थे। अन्य अनेक मूर्तियां विभिन्न समयों की है।

सैतवाल मंदिर मे एक धातूनिर्मित जिनमूर्ति दर्शनीय है जिस की शिल्पशैली सिंहासन, छत्र, यक्ष आदि के सुशोभित परि-कर के कारण लगभग आठसौ वर्ष पूर्व कीभ प्रतीत होती है। इसी मंदिर में शक १८५९ (सन १९३७) में स्थापित चरण पादुका श्री नेमसागर की है। कहते है कि इन्हें ऋद्धि प्राप्त थी जिस से मंदिर निर्माण मे द्रव्य की कमी नही होती थी। पार्श्वनाथ मंदिर में लगभग एकसौ हस्त लिखित ग्रंथो का संग्रह है इन में अधिकांश ग्रंथ जयपूर क्षेत्र में लगभग डेढसौ वर्ष पूर्व तैयार हुये थे। इनमें आदिपुराण, पद्मपुराण, हरिवंशपुराण, पुण्या-स्त्रव. रत्नकरंड आदि के हिंदी रूपांतर है ये आधुनिक समय मे मुद्रित हो चुके है अतः अब इन हस्तलिखित ग्रंथो का उपयोग होना मुश्कील हीं है। इन मे से एक पोथी के अंतमे पोथी लेखक का नाम आर्वी के सिंघई भोले इस रुप में अंकींत है तथा लेखन समय स. १८१८ (सन १८४२) मिलता है।

इस पोथी में दशलक्षण, सोलहकारण, नंदिश्वर, पंचमेरू आदि व्रतों की पुजाओं के पाठ संग्रहीत है। सं. १९०३ (सन १८४७) में लिखित एक अन्य पोथी में भी आर्वी नगर का नाम अंकित है। यह पोथी पंडित जिनदास कृत हिंदी जंबस्वामी कथा की है। अभिषेक पाठ की एक अन्य पोथी में नांदगांव के पद्मप्रभचैत्यालय का नाम अंकीत है तथा कारंजा के भट्टारकों कि निम्मलिखित परंपरा दी है – अमरकीर्ती –विशालकीर्ति- देवेंद्रकीर्ती धर्मचंद्र – धर्मभूषण – देवेंद्रकीर्ति – कुमुदचंद्र – धर्मभूषण – विशालकीर्ती – धर्मचंद्र – देवेंद्रकीर्ति। पैंतीस वर्ष पूर्व हम ने ड्डारक संप्रदायने ग्रंथ में कारंजा के इन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गुरूओं का इतिहास संकलित किया था। उस में उक्त पोथी के अंतिम गुरू देवेंद्रकीर्ति के सन १७०० से १७३० तक के विभिन्न स्थानों के लेख दिये है। नांदगाव की यह पोथी भी इसी समय के आसपास की होनी चाहिए। पार्श्वनाथ मंदिर के ग्रंथो, मुर्तियों तथा अन्य सामुग्री का विवरण लगभग चालीस वर्ष पहले एक रजिस्टर में दर्ज किया गया था। श्री विमलकुमार पाटनी ने कृपापूर्वक उक्त रजिस्टर तथा पोथियों का अवलोकन कराया। श्री पाटनीजी के आग्रह से आर्वी से दस किलो-मीटर दूर वर्धा नदी के तट पर स्थित क्षेत्र कौंडण्यपूर का दर्शन भी संभव हुआ। श्रीकृष्ण की पटरानी रक्मिणी के जन्म स्थान के रूप में यह स्थान प्रसिद्ध है। यहां के विठ्ठल विठ्ठल रूक्मिणी देवस्थान के बाजू में ही एक जीर्ण जिनमंदिर था। दो वर्ष पूर्व मुनिश्री देवनंदिजी ने यहां की श्री सुपार्श्वनाथ की प्रतिमा का दर्शन करने पर इस मंदिर के जीर्णोद्धार की प्रेरणा दी तथा श्री पाटनीजी के परिश्रम तथा समाज के सहयोग से जीर्णोद्धार का दो तिहाई कार्य पूर्ण हो चुका है। शेष कार्य समाज के सहयोग से शीघ्र ही पूरा हो कर वेदिप्रतिष्ठा संपन्न हो सकेगी ऐसी आशा है।

डॉ. विद्याधर जोहरापूरकर
M.A; Ph. D.
प्रिम पेपर, लाडपुरा, इतवारी,
नागपूर - २

हार्दिक शुभेंच्छा

इच्छिता जे स्वतःसाठी इच्छा तेच परास्तव।
नेच्छिता जे स्वतःसाठी नका इच्छू परास्तव॥

श्रावणे एम्पोरियम
नागपूर रोड, वर्धा

★ रेडीमेड
★ होजियरी
★ स्कूल युनिफार्म

फोन – दुकान – ३४३० निवास - ३४८७

राग अवनी सदा जाळी अतःप्राथी समामृत।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्वस्थ समाज की रचना कैसे हो

– आचार्य महाप्रज्ञ

इतिहास के आदिकाल से मनुष्य विकास की कल्पना करता रहा है। उसमें आगे बढने की मनोवृत्ति रही है। वह जैसा है, उसमें संतोष नहीं है किन्तु कुछ बदलने और नया करने की भावना है। एक मौलिक मनोवृत्ति है। अकडं करिस्सामि–जो किसी ने नहीं किया है वह मै करूंगा। इसी मनोवृत्ति ने व्यक्ति को समाज के स्तर पर आगे बढने की प्रेरणा दी है। व्यक्ति आगे बढना चाहता है और समाज का भी नवनिर्माण चाहता है। वह स्वस्थ समाज की रचना करना चाहता है, शोषण मुक्त या अहिंसक समाज की रचना चाहता है।

रुग्ण समाज : स्वस्थ समाज

समाज की दो स्थितियां है – रुग्ण समाज और स्वस्थ समाज। जिस समाज में सामाजिकता और परस्परता नहीं होती, संवेदनशीलता और आश्वासन नहीं होता, वह रुग्ण समाज होता है। जिस समाज में आश्वासन, परस्परता, सामाजिकता और संवेदनशीलता होती है, वह होता है स्वस्थ समाज। कल्पना की गई–स्वस्थ समाज का निर्माण करें। इसके निर्माण के लिए ध्यान गया अर्थव्यवस्था पर। अगर व्यवस्था समीचीन नहीं है तो समाज स्वस्थ नहीं बनेगा। अर्थव्यवस्था के दो पक्ष है। एक है राज्य नियंत्रित अर्थव्यवस्था, दूसरी है खुली अर्थव्यवस्था। राज्य के नियंत्रण से मुक्त अर्थव्यवस्था। दोनों प्रकार के प्रयोग किये गये लोकतंत्र में खुली अर्थव्यवस्था रही और साम्यवादी प्रणाली में अर्थव्यवस्था पर राज्य का नियंत्रण किया गया। नियंत्रित अर्थव्यवस्था का कारण था अमीर लोग गरीबों का शोषण न कर सकें।

स्वस्थ समाज रचना के प्रयत्न

वास्तविकता यह है कि दोनों ही प्रणालियों ने स्वस्थ समाज की रचना कर पाने में सफलता प्राप्त नहीं की। जहां राज्य का नियंत्रण है, वहां व्यक्ति में एक अकर्मण्यता का भाव आया। आगे बढने की जो मनोवृत्ति थी, उस पर प्रभाव पडा। जहां खुली अर्थव्यवस्था थी, वहां दूसरी स्थिति बनी। आज दुनिया की जनसंख्या पांच अरब से ज्यादा है, किन्तु इस सच्चाई को अस्वीकार न करें। दुनिया में जितनी संपदा है, उसके पचास प्रतिशत भाग पर थोडे से लोगों का आधिपत्य है। यह खुली अर्थव्यवस्था का प्रयोग भी स्वस्थ समाज की रचना में सहयोगी नहीं बना और राज्य नियंत्रण अर्थव्यवस्था भी सहयोगी नहीं बनी।

समाजवादी प्रणाली – नई समस्या

समाजवादी प्रणाली में सबसे ज्यादा इस बात पर ध्यान दिया गया – गरीबों का शोषण न हो। अमीर और गरीब ये दोनों वर्ग मिटें। यह कल्पना चली तब शासक और शासित – ये दोनों नये वर्ग बन गए। शासक के लिए बहुत–सी सुविधाएं और प्रजा के लिए कोई सुविधा नहीं। नई समस्या पैदा हो गई। समाजवादी राष्ट्रों के शासकों का जो चरित्र सामने आया है, उससे लगता है सत्ता

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

केन्द्रित होते की मनुष्य की सुविधावादी मनोवृत्ति प्रबल और निरंकुश हो जाती है। वह सिद्धान्त को समाप्त कर देती है। साम्यवाद की जो कल्पना की गई वह कहीं की कहीं रह गई और शासक स्वयं शोषक बन गया। खुली अर्थव्यवस्था की प्रणाली में शोषण चलता ही रहा। कुछेक व्यक्तियों के पास ही धन केन्द्रित होता गया। शेष व्यक्ति अभावग्रस्त होते चले गए। उस अभाव ने समाज को स्वस्थ और शोषणमुक्त नहीं बनने दिया। हमारे सामने विकल्प क्या है? जिस अर्थ–व्यवस्था पर अधिक ध्यान केन्द्रित किया गया उसने भी प्रवंचना कर दी।

कारण क्या हैं

हमारा जीवन दो धाराओं में प्रवाहित है–वस्तु जगत और भाव जगत। मुझे लगता है परिवर्तन के जितने प्रयोग हुए है, सब वस्तु जगत को बदलने के लिए हुए है। भाव जगत पर ध्यान ही नहीं दिया गया। केवल यही मान लिया गया कि अर्थव्यवस्था सुधरी, राजनैतिक प्रणाली बदली और समाज व्यवस्था बदल जायेगी। इस सच्चाई को समझने में हमारी बहुत बडी भूल हुई है। सबसे पहले हम निदान करें कि समाज बीमार और शोषण से घिरा हुआ क्यों है? कारण क्या है? सही निदान तब होगा, जब हम वस्तु–जगत में प्रवेश करेंगे।

अहं की समस्या

निदान का पहला निष्कर्ष होगा अहं की समस्या ने समाज को रुग्ण बनाने में बहुत बडी भूमिका निभायी है। जितना भी प्रदर्शन चलता है वह अहं के लिए चलता है। व्यक्ति अपने बडप्पन को दिखाने के लिए प्रदर्शन करता है। जिस मकान में १०० आदमी रह सकें उतना बडा भव्य मकान बनाएंगे लेकिन उसमें रहने वाले होंगे दो–चार आदमी। उस विशाल मकान के पीछे अहं प्रदर्शने की भावना काम कर रही है। एक व्यक्ति ने एक करोड रु. की पोशाक पहनी, एक व्यक्ति नें आठ करोड रु. की पोशाक पहनी। वह पोशाक अहं का प्रतिबिम्ब है। समाचार पत्र में पढा एक संन्यास लेनें वाले व्यक्ति की पोशाक छियासठ लाख की थी। ये सब किसलिए? सारा कार्य अहं प्रेरित हो रहा है। यह एक ऐसी दौड है जिसनें आवश्यकता के पक्ष को गौण कर दिया, अनुपयोगिता एवं प्रदर्शन के पक्ष को उभार दिया। जीवन की सामान्य आवश्यता कम आय वाले व्यक्ति भी पूरी कर लेते है, एक लखपति भी पूरी कर सकता है, एक करोडपति भी कर सकता है। प्रत्येक आदमी रोटी खाता है, सोना–चांदी नहीं खाता। इतनी आवश्यकता की पूर्ति व्यक्ति कर सकता है किन्तु अहं की चेतना से प्रभावित सोचता है। दुनिया के धनपतियों में प्रथम नाम मेरा ही आये – यह स्पर्धा है। इस अहं की समस्या नें जगत की समस्या पर पर्दा डाल दिया और उसे ज्यादा उलझा दिया।

व्यक्तिवादी दृष्टिकोण

दूसरी समस्या है। व्यक्तिवादी दृष्टिकोण, व्यक्ति केवल अपनें और अपनों के लिए सोचता है।

एक सीमा बन गई है, मेरे लिए तथा मेरे अपनों के लिए सारी सुविधाएं प्राप्त करनी हैं। यह गलत दृष्टिकोण बन गया हैं। दुकानदार मिलावट करके माल बेचता है

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पर अपने लिए शुद्ध माल लायेगा। कारण क्या है अपने लिये और अपनों के लिए सुविधा जुटानें का दृष्टिकोण काम करता हैं। दो प्रकार के दृष्टिकोण है अपने लिए अलग और दूसरों के लिए अलग। इस विभक्त दृष्टिकोण ने समाज को बहुत रुग्ण बनाया है, समस्याग्रस्त बनाया है।

भोगवादी दृष्टिकोण

तीसरी समस्या है भोगवादी दृष्टिकोण। आदमी प्रत्येक पदार्थ का भोग चाहता हैं। वर्तमान की आर्थिक व्यवस्था और अवधारणा नें व्यक्ति को भोगवादी बनाया हैं। खूब कमाओ और खूब भोगो। उत्पादन अधिक, अर्जन अधिक और भोग अधिक, ये जीवन के तीन सूत्र मान लिए गए हैं। इस दृष्टिकोण नें कुछ लोगों को भोगी बना दिया। कुछ लोगों को अभावग्रस्त और दीन-हीन बना दिया, भोगवादी दृष्टिकोण सचमुच एक समस्या बन गया।

वस्तु जगत से भी ज्यादा मूल्यवान हैं भाव जगत। अगर भाव जगत स्वस्थ है तो वस्तु जगत का परिष्कार करणे में काफी सुविधा हो जायेगी। जटिलता हो रही है भाव जगत में और उसका प्रतिबिम्ब पड रहा है वस्तु जगत पर।अहिंसा का प्रशिक्षण भाव जगत का प्रशिक्षण है। इसका संबंध समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था और राज्यव्यवस्था के साथ है पर सबसे घनिष्ट संबंध है भाव जगत के साथ।

अधिकार की मनोवृत्ति

चौथी समस्या हैं अधिकार की मनोवृत्ति, छोटे से छोटे प्राणी में, पेड-पौधे में भी अधिकार की मनोवृत्ति होती है। यह मौलिक मनोवृत्ति हैं। सारी समस्याओं का मूल हैं अधिकार की मनोवृत्ति। इसमें सबका समावेश हो जाता हैं। इसे संग्रह या परिग्रह की मनोवृत्ति भी कहा जा सकता हैं। व्यक्ति सबको अपनें अधिकार में रखना चाहता हैं। व्यक्ति की इस मनोवृत्ति से अनेंक समस्याएं उलझती हैं।

अहिंसा के प्रशिक्षण का अर्थ

हम केवल अर्थव्यवस्था को बदलनें पर ध्यान केन्द्रित करें, नई प्रणालियों को विकसित करनें की बात सोचें और भावजगत की बिल्कुल उपेक्षा कर दें तो समस्या का समाधान कभी नहीं होगा। समाधान के लिए दोनों पर ध्यान देना होगा। वस्तु जगत भी एक सच्चाई है। और भावजगत भी एक सच्चाई हैं। हम एक सत्य को मानकर चलें और दूसरे को नकार दें तो एकान्तिक आग्रह बन जाएगा और समस्या का समाधान नहीं होगा। समाधान तब होगा जब दोनों सच्चाईयों को साथ लेकर चलें दूसरी ओर भाव-जगत में भी परिवर्तन लानें के प्रयत्न करें। अहिंसा के प्रशिक्षण का अर्थ भी इन दोनों सच्चाइयों से जुडा हुआ है। वस्तु जगत में परिवर्तन नहीं होता है तो हिंसा बढेगी। भाव जगत में परि-नहीं होता है तो हिंसा को अधिक पनपनें का मौका नहीं मिलेंगा।

मूल्यवान हैं भाव-जगत

हम अनेंकान्त का प्रयोग करें, दोनों सच्चाइयों को एक साथ समझे, सही निर्णय लें,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बीमारी का सही निदान होगा, केवल वस्तु जगत ही सब कुछ नही है उसके साथ भाव जगत का भी बहुत मूल्य है। यदि हमारा भाव जगत भी सुलझा हुआ है तो वस्तु जगत भी सुलझा हुआ, साफ-सुथरा नजर आएगा।

वस्तु जगत से भी ज्यादा मूल्यवान है भाव जगत। अगर भाव जगत स्वस्थ है तो वस्तु जगत का परिष्कार करने में काफी सुविधा हो जाएगी। जटिलता हो रही है भाव जगत में और उसका प्रतिबिम्ब पड रहा है वस्तु जगत पर। अहिंसा का प्रशिक्षण, भाव जगत का प्रशिक्षण, इसका संबंध समाज व्यवस्था, अर्थव्यवस्था के साथ हैं। पर सबसे घनिष्ठ संबंध है। भाव जगत के साथ।

अहं का परिष्कार

अहिंसा के प्रशिक्षण का सबसे पहला बिन्दु होगा अहं का विसर्जन, अहं के परिष्कार का प्रशिक्षण। इसका फलित होगा, समानता की वृत्ति का जागरण विषमता कौन पैदा करता है ? विषमता का कारण है अहंकार।

एक आदमी दूसरे के बिना जी नही सकता, एक व्यक्ति दूसरे का आलम्बन लिए बिना जी नहीं सकता इस सच्चाई को अस्वीकार करने के कारण ही समाज बीमार बना है। एक पैर चले, दुसरे को आग न बढाएं तो क्या होगा ? गति अवरूद्ध हो जाएगी। सापेक्षता और परस्परता का होना जरूरी है। आचार्य उमास्वाति का यह कथन-' परस्परोप-ग्रहो जीवनाम् ' इसी सचाई का निर्देश सूत्र है।

आधुनिक विज्ञान की खोजों का निष्कर्ष है उत्तेजना, जल्दवाजो, शीघ्रता, आगे पढने की चेष्टाएं. ये हृदय रोग को जन्म देती है। अहंकार के विलय का प्रशिक्षण दे तथा उसके अनुरूप ही अर्थव्यवस्था की बात सोचे समानता की दृष्टि जागती चली जाएगी। जब समानता की दृष्टि बढेगी तो विषमता की बात कम होती चली जाएगी। अहिंसक समाज रचना की दिशा मे एक नया विकल्प हमारे सामने आएगा।

परस्परता का दृष्टिकोण

दूसरी समस्या है व्यक्तिवादी दृष्टिकोण उसके परिष्कार का सूत्र हैं परस्परोपग्रह-परस्परता का दृष्टिकोण जागृत करणा। एक आदमी दूसरे के बिना जी नहीं सकता, एक व्यक्ति दूसरे का आलम्बन लिए बिना जी नहीं सकता। इस सचाई को अस्वीकार करने के कारण ही समाज बीमार बना है एक पैर चले, दुसरे को आगे न बढाएं तो क्या होगा ? गति अवरूद्ध हो जायेगी। सापेक्षता और परस्परता का होना जरूरी हैं आचार्च उमास्वाति का यह कथन परस्परोग्रहो जीवानाम् – इसी सच्चाई का निर्देश सूत्र हैं।

त्यागी की चेतना का प्रशिक्षण

तीसरा तत्त्व है त्याग की चेतना का प्रशिक्षण। आज भोगवादी दृष्टिकोण को प्रबल होने का बहुत मौका मिलता हैं। यह धारणा बन गई – जीवन का सार है पदार्थ। इस मिथ्या धारणा को तोडना होगा। भोग जीवन की अनिवार्यता है। तो उसका अलंकरण है। पॉजिटिव और नेगेटिव. दोनो का

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

योग होता है तो बिजली जलती है। भोग के साध–साथ त्याग होना भी जरुरी है।

विसर्जन

चौथा तत्व है विसर्जन। अभ्यास के द्वारा इस वृत्ती को जगाया जाए। धन का अर्जन भी करो तो उसके कुछ अंश का विसर्जन भी करो। अगर एक रुपया कमाया है ढो एक पैसे का जरुर विसर्जन करो। खाते चले जाएं ओर उत्सर्ग न करे तो क्या होगा। अर्जन और विसर्जन दोनों आवश्यक है।

पत्थर ने फूल से कहा

पत्थर ने फुल से कहा – 'मैं तुझे कुचल डालूंगा। फूल ने जवाब दिंया – ' तो मेरी सुगन्ध को दुनियां में फैलाने का मौका देकर तुम मुझ पर अनन्त उपकार करोगे।' पत्थर का घमण्ड चूर–चूरकर हो गया। नम्रता और दृढता के साथ फूल ने दोनों तरह से जीत प्राप्त कर ली। कुशलता जाता तो उसकी जीत थी ही। बच गया तो उसने किंसी को दुखाये बिना अपने शील की रक्षा की।

अहिंसा का यह कितना सरल, सुन्दर तथा गहरा विश्लेषण है। भारतीय संस्कृति ही नहीं, मानव संस्कृति की प्रतिष्ठा भी अहिंसा पर ही अवलम्बित है। इस विषय मे तथागत बुद्ध का वह वाक्य सदा स्मृति–पटल पर रहना चाहिए – 'क्रोध को अक्रोध से जीतें। भलाई से बुराई को जीतें।' और साथ ही यह भी ध्यान मे रहे कि – ' जो उत्पन्न क्रोध को चलते रथ की तरह रोक लेता है, उसी का मैं सारथी हूं।'

शुभेच्छा !

" सब प्रकारके ज्ञान को निर्मल करनेसे, अज्ञान और मोह के त्यागनेसे, तथा राग और द्वेश का क्षय करने से एकान्त सुखस्वरूप मोक्ष प्राप्त होता है। "

महावीर वाणी

स्वच्छ एवं आकर्षक झेरॉक्स के लिए

कुशल झेरॉक्स सेंटर

मेन रोड, वर्धा - ४४२००१

फोन - ३३१८ कुंदनमल लुणावत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥

– श्रीमद्भगवद्गीता २.४७

WITH BEST COMPLIMENTS FROM

A R C O M

Manufacturers of Teleprinter, Computer Paper Rolls And Tapes

WORKS : C-23, MIDC, WARDHA-442 006

PHONE : Fact. 3292
Resi. 2887

REGD. OFFICE :
311, Vidyanagari,
Bombay – 400 098

PHONE : 6120485, 6115497
FAX NO. 022–6113976
TELEX No. 011–78466 AKE–IN

कलहाचे असे मूळ जगती स्वार्थभावना।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पंच कल्याणक प्रतिष्ठा महोत्सवप्रसंगी
आमच्या शुभ कामना

" मुले ही समाजाची व राष्ट्राची खरी संपत्ती होय. तिचे जितके चांगले संगोपन, संवर्धन होईल तितके समाजाचे व देशाचे आपण अधिक हित केल्यासारखे आहे. त्यांच्या गुणविकासावर समाजाचा व देशाचा विकास अवलंबून असतो म्हणून तो जितका अधि क करता येईल तितकेचांगले."

दिनांक ११/८/१९३५ — गुरुदेव समंतभद्र

BASP
Basp Industries
BAPU PATIL

H & T Industrial Complex
Lewis Wadi, P. O. Wagle Estate
THANE - 400 604

Phone : (91) (022) 505425, 594775

FAX : 91-22-2040395

TELEX : 011-85962 MBS IN Cablie : BASPFILTER THANE

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हार्दिक शुभ कामनाए

" क्रोध से मनुष्य नीचे गिरता है,
अभिमान से अधम गति को पहूँचता है,
माया से सद्‌गति का नाश होता है
और लोभ से इहपरलोक में महान भय है।"

– महावीर वाणी

हितेन्द्र ब्रदर्स

रामनगर, वर्धा - ४४२००१

* हितेन्द्र ऑइल इंडस्ट्रीज, रामनगर, वर्धा
* जैन ट्रेडिंग कंपनी, भामटीपुरा, वर्धा
* जैन प्रोव्हिजन्स, शास्त्री चौक, वर्धा
* जैन ट्रान्सपोर्ट, रामनगर, वर्धा

श्री नरेंद्रकुमार धूलिया जैन
रामनगर, वर्धा – ४४२००१

स्मरावा मंत्र सोऽहं हा व्यवहारात सर्वदा।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हमारी हार्दिक शुभ कामनाएँ !

सुखी रहें सब जीव जगतके, कोई कभी न घबरावे ।
वैर, पाप, अभिमान छोड, जग नित्य नये मंगल गावें ॥
घर-घर-चर्चा रहे धर्म की, दुष्कृत दुष्कर हो जावे ।
ज्ञान-चरित उन्नत कर अपना, मनुज जन्म फल सब पावे ॥

– मेरी भावना

मूलचंद
गुलाबचंद
जैन
(बडजाते)

हार्डवेअर मर्चंट

तिलक चौक, वर्धा–४४२ ००१

फोन : ३४५२

प्रेषक :–

प्रा. महावीर पाटणी
श्री अजितकुमार ठोले

असावी वचना जोड आचाराची निरंतर ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

क्रोधावर विजय मिळविणाऱ्या भटासुंदरीची कथा

तुकारी

प्रा. सौ. हेमलता जोहरापूरकर
काटोल

जिनदत्त नावाचा धर्मपरायण श्रावक होता एकदा 'जखमी झालेल्या' मणिमाली नावाच्या मुनींना त्याने आपल्या घरी आणले. त्याची शुश्रुषा केली. त्यांच्या अंगाचा दाह कमी होण्यासाठी वैद्याने त्यांना लक्षमूल तेल लावण्यास सांगितले. ते तेल कुठे मिळेल असे विचारताच वैद्य म्हणाले,

' सोमनाथ भटाची बायको तुकारी हिच्याकडे ते तेल मिळेल. '

जिनदत्त श्रेष्ठी तुकारीच्या घरी गेला.

' बाई, तुमच्याकडे माझे एक काम आहे तुमच्याजवळ लक्षमूळ तेल आहे असे वैद्याने सांगितले. ते तेल तुम्ही मला द्या. तुम्ही मागाल तो मोबदला मी देईन. '

' श्रेष्ठी, तुम्हाला ते तेल कशासाठी पाहिजे ? '

' बाई. मणिमाली मुनी वनात ध्यान करीत असता कुणी दुर्जनाने उपसर्ग केला. त्यांचे डोके जळाले· त्याला लावण्यासाठी तेल पाहिजे. '

' तुम्हाला मुनींसाठी तेल पाहिजे. एका धर्मवंतासाठी तेल देण्याने मलाही पुण्यलाभ होईल. तेल तसेच घेऊन जा. मला तेलाचे पैसे नकोत. '

तुकारीने तेलाची कुपी दिली. जिनदत्त श्रेष्ठींनी ती हात घेतली. उठतांना त्यांच्या हातून कुपी खाली पडली. कुपी फुटली. व तेल जमिनीवर सांडले.

तुकारी म्हणाली, जाऊ द्या, श्रेष्ठी. मी तुम्हाला दुसरी कुपी आणून देते. '

जिनदत्त म्हणाला, ' बाई , या शिशीचे पैसे तुम्हाला घ्यावेच लागतील.

' छे ! छे ! याचे पैसे घेऊ ? अहो, मला पुण्यलाभ होतोय हीच तर भाग्याची गोष्ट आहे. '

तुकारीने लक्षमूळ तेलाची शिशी आणून श्रेष्ठीजवळ दिली. श्रेष्ठी शिशी घेऊन घराकडे निघाला. रस्त्यात तो अडखळून पडला. हातातील तेलाची शिशी फुटून तेल सांडले. श्रेष्ठी घाबरला. दोनदा तुकारीने ते मौल्यवान तेल मोफत देऊनही घरापर्यंत नेऊ शकला नाही. आता ती आपल्यावर रागावेल या भीतीने श्रेष्ठी घाबरत घाबरत तुकारीच्या घरी आला. तुकारीने त्याचे हसून स्वागत केले –

' या , श्रेष्ठी· '

' बाई, मी पापी आहे. दुसऱ्यांदा तुम्ही तेल दिलं पण आताही माझ्या हातातून शिशी फुटली. तुम्ही रागावू नका – – – '

' त्यात रागावण्यासारखं काय श्रेष्ठी ? तुम्ही मुद्दाम थोडीच फोडली ? तिसरी शिशी घेऊन जा. '

' बाई, आता याचे पैसें घ्या – – '

' छे ! छे ! भाऊ, पैसे कशाचे ? तशीच घेऊन जा. '

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तुकारीच्या सहनशीलतेचे व शांत-वृत्तीचे आश्चर्य करीत जिनदत्त घराकडे गेला. लक्षमूळ तेलाने मुनी व्याधीमुक्त झाले. तुकारीला धन्यवाद देण्यासाठी जिनदत्त श्रेष्ठी तुकारीच्या घरी गेला.

'बाई, तुमच्या तेलाने मुनी व्याधीमुक्त झाले. औषधदान करून तुम्ही पुण्यवंत झालात पण एक विचारू का ? ... '

' विचारा की. '

' बाई, सोन्यासारखे मौल्यवान असे लक्षमूळ तेल माझ्या हातून दोनदा सांडले. तुम्ही त्याचे पैसे घेतले नाहीत. तिसऱ्यांदा मला मोफत तेल दिलेत, तेही रागाचा एक शब्द न उच्चारता. तुम्हाला राग कसा आला नाही ?'

' भाऊ, क्रोध कसा असतो ते मला माहीत आहे. मी त्या क्रोधाची कटु फळे भोगली आहेत. म्हणूनच क्रोध न येऊ देण्याचे व न रागावण्याचे मी ठरविले आहे. '

तुकारीच्या डोळ्यांसमोर तिचे पूर्वजीवन तरळू लागले. .... शिवशर्मा ब्राह्मण व कमलश्री यांची आठ मुलांच्या पाठीवर जन्माला आलेली मुलगी म्हणजे तुकारी. आई बापांनी तिचे नांव भटासुंदरी असे ठेवले होते. भटासुंदरी लाडाकोडात वाढू लागली. सगळ्या भावजया तिला आदराने तुम्हीआम्ही म्हणत. नोकरचाकर तिला मान देत. या आदरार्थी वचनांची तिला इतकी सवय झाली की तिला अगंतुगं म्हटलेले आवडत नसे. तिला कुणी तू म्हटले की ती त्याच्याशी भांडत असे.

तिचे तुकारी नाव पडले तेही एका मजेदार प्रसंगामुळे. एक दिवस भटासुंदरी आपल्या बापाबरोबर राजवाड्यात गेली. राजाने तिला, ' तुझे नाव काय ?' असे विचारले. तू हा शब्द ऐकताच भटासुंदरीला राग आला. ती राजाशी भांडू लागली. शिवशर्माने तिला शांत केले. तो राजाला म्हणाला,

' महाराज, क्षमा करा. माझी मुलगी लाडात वाढल्यामुळे कुणाचा तुकार शब्द ऐकण्याची तिला सवय नाही. तिचे नाव भटासुंदरी आहे.'

राजा बोलला, 'मी हिचे दुसरे नाव ठेवतो. हिला तुकार आवडत नाही ना. मग हिचे नाव तुकारी असे ठेवायचे. सगळ्यांनी हिला याच नावाने हाक मारायची.'

राजाज्ञेपुढे भटासुंदरीचे काहीच चालले नाही. दवंडी पिटवून सगळ्यांनी भटासुंदरीला तुकारी म्हणावे असे जाहीर केले.

भटासुंदरी धार्मिक होती. देवदर्शन, गुरूपदेशश्रवणाची तिला आवड होती. दयामयी अहिंसाधर्माचे ती पालन करी. फक्त तिच्या क्रोधी स्वभावावर तिचा निरुपाय होता. तिला क्रोध आला की आवरत नसे. ती मोठी झाली. रूपसौंदर्याची पुतळी दिसू लागली. तिला अनेक ठिकाणांहून मागण्या येऊ लागल्या. शिवशर्मा सत्यव्रती होता. तो तिच्या रूप-गुणांची प्रशंसा वरपक्षाकडे करीत असे. तिच्या क्रोधी, संतापी स्वभावाची माहिती तो देई. ही क्रोधी, कोपिष्ट मुलगी स्वीकारणे म्हणजे जळता निखारा पदरात घेणे असे समजून वर-पिते माघारी जात. आपली रूपसुंदर कन्या विवाहशिवाय तशीच राहील की काय ही चिंता शिवशर्माला ग्रासू लागली.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्याच शहरात सोमशर्मा नावाचा - एक तरूण जुगारी होता.तो एकदा जुगारात हरला. बाकीच्या जुगाऱ्यांनी त्याला पैशासाठी झाडाला बांधून ठेवले. शिवशर्मांने त्याला पाहिले. त्याने जुगाऱ्यांना विचारले, 'याला तुम्ही का बांधून ठेवले ?'

'हा सोमशर्मा जुगारात हरला. याने आमचे पैसे दिल्याशिवाय आम्ही याला सोडणार नाही.'

गोऱ्यागोमटया सोमशर्माला पाहून शिवशर्माच्या मनात एक विचार आला. तो जुगाऱ्यांना म्हणाला, 'मी याचे कर्ज फेडीन. पण एका अटीवर. याने माझ्या मुलीशी लग्न केले पाहिजे.'

'सोमशर्मा करेल तुमच्या मुलीशी लग्न-पण तुमची मुलगी चांगली आहे ना ?'

'माझी मुलगी रूपगुणांनी उत्तम आहे. फक्त तिच्यात एक दोष आहे. ती संतापी आहे. ती कुणाचा तुकार ऐकून घेत नाही.'

सोमशर्मा उद्‌गारला, 'नाही रे बाप्पा. अशा त्राटिकेशी कोण लग्न करेल ? मी या लग्नाला तयार नाही.'

सोमशर्माचे हे उद्‌गार ऐकून बाकीचे जुगारी चिडले

'हु: म्हणे मी लग्नाला तयार नाही. मग आमचे पैसे कोण देईल ? तुझा बाप ? तू या मुलीशी लग्न केलेच पाहिजे.'

जुगाऱ्यांनी सोमशर्माला जबरदस्तीने लग्नाला तयार केले. सोमशर्माचे तुकारीशी लग्न झाले. शिवशर्मांने तुकारीला धन-धान्य-वस्त्र देऊन राहावयास एक घरही दिले. तुकारीचा संसार सुरू झाला. सोमशर्मा तिला अगंतुगं न म्हणता अहो-जाहो म्हणू लागला. तुकारीचा अहं सुखावला.

सोमशर्माला एके रात्री घरी येण्यास उशीर झाला. 'मूळ स्वभाव जाईना' या उक्ति प्रमाणे तुकारीचा संतापी स्वभाव उफाळून वर आला. तिने दाराला कडी लावली. दार उघडण्यासाठी सोमशर्मा आवाज देऊ लागला. पण तिने दार उघडले नाही. शेवटी चिडून तिला शिव्याशाप देत सोमशर्मा एकेरी वचनांवर आला. त्याचा तुकार ऐकल्यावर तुकारीचा संताप अनावर झाला. त्याला सोडून आपल्या बापाच्या घरी जाण्याचे तिनें ठरविले. ती मध्यरात्री एकटीच निघाली. रस्त्यांत तिला चोरांनी गाठले. तिच्या अंगावरील सुवर्णालंकार काढून घेऊन तिला भिल्लवाड्यात नेऊन भिल्लराजाजवळ दिले. तुकारीचे सौंदर्य पाहून भिल्लराजा तिच्यावर मोहित झाला. 'मी तुला माझी पट्टराणी करीन. दागदागिन्यांनी मढवून टाकीन.' असे सांगून तो तुकारीचा अनुनय करू लागला.

'भिल्ल दादा, मी पतिव्रता नारी आहे. माझे शीलभंग करू नका.' असे विनवूनही भिल्लराजा तुकारीला त्रास देऊ लागला. तेव्हा तुकारी णमोकार मंत्राचा जप करू लागली. मंत्रप्रभावाने अंबिका देवी धावून आली. अदृश्यपणे भिल्लावर प्रहार करून तिने त्याला जेरीस आणले. भिल्लराजा तिला शरण गेला त्याने तुकारीची क्षमा मागितली.

भिल्लाने तुकारीला व्यापाऱ्याला विकलें त्याने तुकारीचे शीलभंग करण्याचा प्रयत्न केला. तुकारीने जिनेंद्राचें स्मरण केले. देवतेने येऊन तिची सुटका केली.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्या व्यापाऱ्याने तुकारीला एका कृमिकारास विकलें. हा कृमिकार माणसाच्या रक्ताने कांबळे रंगवून ते विकत असे. तुकारीच्या अंगात सूया टोचून तो रक्त काढीत असे तिच्याकडून घरची सगळी कामे करून घेई. काम चुकले तर तिला तो अद्वातद्वा बोलत असे. पतीचा तुकार न ऐकणाऱ्या तुकारीला अनेक संकटांना – कष्टांना तोंड द्यावे लागले. एकमागोमाग एक कोसळणाऱ्या दुःखराशीने तुकारी अंतर्मूख झाली. आपल्या संतापी स्वभावामुळे ओढवलेले अनर्थ पाहून तिने पुन्हा कधीही संताप करावया नाही असे ठरविले. सद्‌विचाराच्या या संकल्पामुळे तिला बरे वाटले.

एक दिवस तुकारीचा भाऊ देवपाल याने तिला पाहिलें- त्याने कृमिकाराला पैसे देवून तुकारीला सोडवून नेले. बापाच्या घरी गेलेली तुकारी पूर्ण बदललेली होती. ती शुचिर्भूत होऊन जिनमंदिरात गेली. तिने गुरूजवळ जाऊन कधीही क्रोध करणार नाही असा नियम घेतला. पापाची जननी असलेल्या क्रोधकषायाचा त्याग करण्याचा नियम घेतल्यावर तुकारीला कसे शांत शांत वाटले.

हार्दिक शुभेच्छा

जयश्री वॉच सेंटर

मेन रोड, वर्धा

स्टॉकिस्ट – टायटन, टाईमेक्स, रोचीस, जायको, रिकी एच. एम. टी, अजंता क्लॉक विक्री व दुरुस्ती बेनटेक्स ज्वेलरीचे विक्रेता

हार्दिक शुभ कामना !

अविनाश असोसिएट्स

रामनगर, वर्धा

अविनाश बबनराव कहाते
रामनगर, वर्धा –, ४४२ ००१

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हार्दिक शुभेच्छा

वर्धा नागरी सहकारी अधिकोष [बँक]

मर्या. वर्धा

मुख्यालय – जी. डी. देशपांडे निवास, कुमारप्पा मार्ग, धंतोली चौक, वर्धा-४४२ ००१

रौप्य महोत्सवी वर्ष

शाखा – ८

मुख्यशाखा - वर्धा. कुमारप्पा मार्ग. शाखा - वर्धा हिंगणघाट शाखा. आर्वी शाखा. पुलगांव शाखा. सिंदी (रेल्वे) शाखा. देवळी व शिवाजी चौक, वर्धा शाखा

आमची वैशिष्टये -

ठेवीवर १/२ टक्का जास्त व्याज
ठेवीच्या विविध आकर्षक योजना,
विमा योजने अंतर्गत सर्व ठेवी सूरक्षित,
मध्यम वर्गियांना अडचणीचे वेळी दिलासा,
शिवाय लॉकर्सची उत्तम व्यवस्था.

" आपल्या ठेवी आमच्या बँकेत ठेवून निर्धास्त व्हा "
अधिक माहितीसाठी आमच्या कोणत्याही जवळच्या शाखेला प्रत्यक्ष भेट द्यावी.

श्री सतीश बावसे	**ॲड. प्र. नि. पांडे**	**केशव दांडेकर**
व्यवस्थापक	उपाध्यक्ष	अध्यक्ष

संचालक वृंद – सर्वश्री भा. दे. पत्की, प्रा. कु. आ. बोरीकर, डॉ. सु. गो. भालेराव, श्री. वि. भावे, र. गं. धारकर, वि. अ. मुडे, एम. बी. बत्रा, वि. डो. बोरकर (दुर्बलघटक प्रतिनिधी), श. बा. भारद्वाज (मागसवर्गीय प्रतिनिधी), ज. रा. कुरुमभटे, द. गो. करमरकर (स्विकृत), अ. ना. जोशी (स्विकृत), श्रीमत्ती सुधाताई अनंत गंधे व डॉ. सौ. सुनंदा श्रीकृष्ण लोहकरे

आकुलता असे नित्य परिग्रहास कारण।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कहाते बंधूंच्या हार्दिक शुभ कामना

" पर द्रव्यापासून भिन्न असलेल्या आत्म्याची प्रतीती, स्वपरविवेकाच्या पायावर आधारभूत असलेली तत्वांची जाण व तदनुकूल पुरुषार्थ हाच आत्म-स्वातंत्र्य प्राप्तीचा रत्नत्रय धर्म होय."

– महावीर वाणी

महेन्द्र अॅन्ड सन्स टेलर्स

सूट स्पेशालिस्ट

महेन्द्र कलेक्शन

सुटिंग आणि शर्टिंग

बॉनी टेलर्स

जिन्स स्पेशालिस्ट

इंदिरा मार्केट रोड, वर्धा – ४४२ ००१

• राजेंद्र कहाते • संजय कहाते

• जितेंद्र कहाते • रवींद्र कहाते

सम्यग्ज्ञान असे माता सौख्याची जन्मदायिनी ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

With Best Compliments From

MODERN SCIENTIFIC CO.

Sadar, Nagpur - 440 001

Dealers In:

Laboratory Equipment,
Chemicals & Biological Goods

Stockists For

Cemco Fine Chemicals Extrapure
& A. R. and Photophone 16 m. m.
Sound Projectors & Overhead Projectors

Phone

Off : 532977

Res : 523915

विचार भाषण उच्चार असावीं यात संगती ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आमच्या हार्दिक शुभ कामना

पसरो जगती प्रेम परस्पर मोह निरंतर दूर असो।
अप्रिय कटुक कठोर शब्द नच कुणाच्या मुखी कधी असो ॥

स्वप्नाली कन्स्ट्रक्शन्स

२, एलन, 'डिसोझा हाऊस,'

कांजूर पोलीस चौकीच्या मागे, कांजूर मार्ग, मुंबई–४०० ०४२

– आनंदकुमार आ. सनये

आमच्या शुभ कामना

भाव मित्रता जगती माझा सर्व जिवासी नित्य असो।
दीन दुखी जीवास्तव माझ्या हृदयी करुणास्रोत असो ॥

पुष्पांजली कलेक्शन

'मनीषा भवन' सोशॅलिस्ट चौक, वर्धा–४४२००१

एक ही दाम डिस्काऊंट से भी कम दाम

फोन – ३६१०

इंद्रियांना कषायांना भेदविज्ञान जिंकते।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मोक्षाची जैनसंस्कृतीतील संकल्पना

ल. अं. मानेकर
निवृत्त मुख्याध्यापक, वाशीम

जैन धर्म हा वैज्ञानिक (Scientific) धर्म आहे. त्यात प्रत्येक गोष्टीचा शास्त्रोक्त पद्धतीने विचार केला आहे. त्यामुळे जैन हा मृत्यूला घाबरत नाही. भीत नाही. प्रत्येक जो जन्मतो तो मरतो. प्रत्येक जीवाला हे लागू आहे. माणूस मर्त्य (Mortal) आहे. या विश्वात काय निश्चित आहे ? तर मृत्यू निश्चित आहे. इतकी निश्चित बाब दुसरी कोणतीच नाही. Death is certain.

मोक्षासंबंधी अन्य संकल्पना

कोणत्याही अन्य धर्मात जैनांप्रमाणे मोक्षाचा विचार झालेला नाही. कैलासवासी स्वर्गवासी, वैकुंठवासी, इ. संबोधनात्मक विशेषणे मृत्युसंबंधी वैदिक धर्मात वापरतात. मृत्यु झाला म्हणजे तो जीव मोक्षाला गेला असे होत नाही. 'बुद्धवासी' होणे म्हणजे मोक्षास जाणे नव्हे जीव शरीर सोडून जातो व अ–जीव (जीव विरहित शरीर) पुरतात किंवा अग्निदहन देतात. पारशी लोकात जीव गेलेल्या शरीराला (प्रेताला) एका विहिरीत टाकतात ख्रिश्चन लोकात व मुसलमानात प्रेत जमिनीत पुरतात.जैनात व हिंदूत प्रेत जाळतात. मुसलमानात एखाद्याचा मृत्यू झाला हे "तो पैगंबरवासी झाला." असे म्हणतात.मुस्लीम धर्मात व ख्रिश्चन धर्मात 'मोक्षाचा स्वतंत्र असा विचार केला नाही. मृत्यूमुळे शरीर व आत्मा वेगळे होतात. आत्म्याचे ठायी चैतन्य, ज्ञान, सुख, वीर्य, भोग, उपभोग इ. अनंत शक्ती आहेत.

कर्मावरणाचा परिणाम

पण आत्म्याच्या ह्या अनंतशक्तींना कर्माचे आवरण पडलेले आहे. सूर्याच्या आड मेघ आकाशात आलेत तर सूर्याचा प्रकाश, त्याच्या किरणांची प्रखरता प्रगट होत नाही. निरभ्र आकाशात सूर्यकिरणे मूळरूपात प्रगट होतात. तसेच आत्मशक्तीचे आहे. कर्मांमुळे आत्मशक्ती पूर्णतः प्रगट होत नाही. अनादि काळापासून आत्मा व कर्म यांचा संयोग होऊन 'आत्मानुभव' पूर्णतः होत नाही. जीवाचे त्यामुळे परावलंबन वाढले आहे.

आत्म्याच्या गुलामीचे कारण

हा आत्मा कर्मामुळे पूर्णतः परावलंबी झाला. 'अनंते ठेविले, तैसेची राहावे.' असे म्हटल्या जाते. यात या जीवाचे नियंत्रण दुसरा कोणी करतो असा भाव आहे. तो नियंत्रण कर्ता म्हणजे जसा ठेवील तसे राहावे असा बोध घेऊन चित्ती असू द्यावे समाधान. समाधान उरीं बाळगून अन्य चिंता करु नये. कर्म जसे ठेवील तसे राहावे. अनेक भवा–भवांत या जीवाने जी कर्मे केलीत त्याचाच वर्तमानकाळी परिणाम भोगावा लागतो. म्हणून जीवनात वैचित्र्य आढळते. ज्या युक्तीने, उपायाने एकाला यश मिळतं त्याच युक्तीचा, उपायाचा अवलंब करून दुसऱ्याला काहीच फायदा होत नाही. एकाच आईची मुलं कोणी काळा-कोणी गोरा, कोणी बुद्धिमान तर कोणी मद्दं आढळतात. समाजात गरीब–श्रीमंत, अशक्त-बलवान

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

यशस्वी–अपयशी, रोगी–निरोगी, गुंड-सज्जन दुष्ट–सुष्ट इत्यादी वैचित्र्य पाहावयास मिळते. प्रत्येकाचे कर्म भिन्न–भिन्न असते. जन्माबरोबरच तो आपले कर्म घेऊन आला असे म्हटल्या जाते. याच्या सत्तेचाच प्रत्यय प्रत्येकास येतो. एकाच वर्गातील सारखे वातावरण असलेल्या शाळेतील मुलांना एकच शिक्षक गणित, भाषा इ. विषय शिकवितो. परंतु त्या मुलांचें परीक्षा फल मात्र भिन्न असते. याचे कारण प्रत्येकाचे 'ज्ञानावरण' कर्म भिन्न – भिन्न शक्तीचे असते- कोणाचा मृत्यू जन्माबरोबर होईल तर कोणी जीवनाची ९० वर्ष पूर्ण करील. प्रत्येकाचे आयुकर्म जसे असेल तसे होईल" आम्ही कर्मांची स्थिती, अनुभाग, बंध कमी करण्याचा प्रयत्न करूं शकतो. कोणतेही कर्म केंवळ इच्छेने आपण टाळू शकत नाही कर्म उदयाला यंणार पण त्या कर्मांच्या उदयाबरोबर जे परिणाम आपल्या जीवनात उमटतात त्यात रस न घेता केंवळ ज्ञाता - दृष्टा राहून आत्म्याच्या शुद्ध स्वरूपात रममाण होण्याचा पुरुषार्थ (उत्कट प्रयत्न) केल्यास नवीन कर्म बंध होत नाही. जुन्या कर्मांच्या स्थितीतही बदल घडतो. पराला स्व समजणे व कर्मांच्या परिणामात रस घेणे ही केंवळ बाह्यदृष्टी होय. आत्म्याच्या तीन अवस्था लाहेत

१) बहिरात्मा २) अंतरात्मा ३) शुद्धात्मा

१) बहिरात्मा हा केंवळ कर्म भोगतो शरीर व आत्मा यांचा संबंध लक्षात घेत नाही. कर्म व आत्मा यांचे भिन्नत्व लक्षात न घेता शरीरालाच कर्मालाच सर्व काही समजतो व त्यातच रस घेतो. शरीर नश्वर तर आत्मा अमर आहे. रोग शरीराला होतो आत्म्याला नाही. पण याची दृष्टीच आत्मस्वरूपाकडे नसते.

२) अंतरात्म्यात याचें चिंतन होते. आत्मा व कर्म शरीर इतर सर्व भिन्न आहेत. आत्म्याला सुख – दुःख नाही. आत्मा सर्व शक्तिमान असून तो अनंत गुणांनी युक्त आहे. अशीं इष्ट श्रद्धा त्याची असते. पुरुषार्थाचा जन्म अंतरात्म्यात होतो. समता भाव धारण करून तो या जगाकडे केंवळ ज्ञाता–द्रष्टा होऊन तटस्थ – स्थितप्रज्ञ होत्साता राहतो, जगतो, 'मी शुद्धात्मा आहे' असे चिंतन असते भेद विज्ञानाची दृष्टी असते. परमात्मा प्रगट करण्याची साधना करतो.

३) शुद्धता म्हणजे परमात्मा

शुद्ध आत्मा हीच सिद्ध अवस्था. आता येथं जन्म–मरण नाही. सर्व कर्म ज्याने पुरुषार्थ करुन नष्ट केले, आत्म्या भोवती असलेल्या सर्व कर्म आवरणांना नष्ट करुन शुद्ध आत्म्याला – त्याच्या सर्व शक्तींना पूर्णपणे युक्त केले, (Comple'e Solvation) अनंत शुद्ध गुण प्रगट झालें. तो वीतरागी झाला. त्यालाच जिन, जिनवर, सिद्ध, भगवान परमेश्वर, परमात्मा म्हणतात.

केवलज्ञानाची उत्पत्ती

मोहनीय कर्माचा पूर्ण क्षय झाला व व ज्ञानावरण, दर्शनावरण व अन्तराय कर्मांच्या पूर्ण (हे चारही घाति कर्म) क्षयाने केवलज्ञान प्रगट होते. परमात्मा अर्थात परमविशुद्धीला प्राप्त आत्मा दोन प्रकारचे. पहिला सकळ परमात्मा दुसरा निकल

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

परमात्मा–कल याचा अर्थ शरीर असा आहे. शरीर असताना सुद्धा जो परमात्मपदाला प्राप्त करतो तो सकल परमात्मा होय. त्यालाच अरहंत, जिन, सर्वज्ञ इ.अनेक नावांनी ओळखतात. ज्याने अन्त्य अवस्थेत शरीराचाही अभाव केला व सिद्ध अवस्थेला प्राप्त केले तो निकल परमात्मा होय. निकलपरमात्मा होण्या-पूर्वी सकलपरमात्मपदाची प्राप्ती नियमाने होतेच. अरहंत अवस्थेनंतरच सिद्ध होतो. सर्व जैन मंदिरात अरहंत अवस्थेतील मूर्ती असते. कारण तेच हितोपदेश देतात. ते सर्वज्ञ व सर्व-दर्शी असतात.

मोक्षाचे स्वरूप –

बंधाच्या कारणांचा अभाव व निर्जरा यांनी कर्माचा पूर्ण नाश (आत्म्याचा व कर्माचा संयोग पूर्णपणे सुटणे) होणे याला ' मोक्ष ' म्हणातात. आचार्य गृध्दपिच्छ यांच्या तत्वार्थ–सूत्र १० व्या अध्यायातील दुसऱ्या सूत्रात स्वरूप सांगितले आहे.

बंधहेत्वभावनिर्जराभ्यां कृत्स्नकर्म–विप्रमोक्षो मोक्षः ।

संसाराची परिपाटी छिद्र असलेल्या नावेसारखी आहे. छिद्र असलेल्या नावेतील पाणी उपसणे सुरू असले तरी जो पर्यंत छिद्र बंद होणार नाही तोपर्यंत बाहेरील पाणी नावेत शिरणारच, नावेची छिद्र बुजविणे म्हणजे बंधांच्या कारणांचा अभाव करणे होय. नावे-तील पाणी काढणे हे कर्माची निर्जरा करणे होय नवीन कर्म बांधण्याची प्रक्रिया थांबविली तरच जुन्या कर्माची निर्जरा होऊन पूर्णपणें आत्मा कर्ममुक्त होईल.

बंधाची कारणे –

मिथ्यादर्शन, अविरति, प्रमाद, कषाय व योग ही बंधाची पाच कारणे आगमग्रंथात सांगितली आहेत. त्यांचा अभाव झाला तर नवीन कर्माचा बंध होत नाही. तप–संयम यामुळे पूर्वबद्ध कर्माची निर्जरा होते. नवीन कर्माचे व्दार पूर्ण बंद करणे म्हणजे बंधाच्या कारणांचा अभाव व निर्जरा यामुळे या जीवास (जीव व आत्मा एकच) मोक्ष अवस्था प्राप्त होते. सामान्यपणें आठकर्माच्या नाशाने मोक्ष होतो असे म्टलले जाते. कर्मांचा अभाव प्रथम संवर (नवीन कर्माला रोकणे) व नंतर निर्जरेने (पूर्वबद्ध कर्माचा नाश) होतो. आयु, नाम, गोत्र व वेदनीय ही चार अघाति कर्मे आहेत. या चारही कर्मांची विशेष तपाने–पुरुषार्थाने पूर्ण निर्जरा करतात. बन्धहेतु (कारणे) मध्ये योग एक कारण सांगितले आहे. त्याचाही अभाव होतो. जीवाचे शुद्ध, निर्मल रूपात राहणे म्हणजेच मोक्ष.

मोक्ष प्राप्तीचे वेळी कोणत्या भाव–कर्मांचा अभाव असतो ?

औपशमिकादिभव्यत्वानां च ॥१०-३स.सू.

मोक्षप्राप्त होतांना जीवांच्या औप–शमिकादि व पारिणामिकादि भावांपैकी भव्यत्व-भावाचाही अभाव होतो. मुक्त होतांना द्रव्य–कर्मांचा नाश केला. संपूर्ण औपशमिक, क्षायो-पशमिक, औदयिक, तसेच पारिणामिक भावां–पैकी भव्यत्व भावाचा सुद्धा मोक्षवेळी अभाव होतो. पारिणामिक भाव जीवाचे स्व-भाव असल्यामुळे मोक्षाला बाधक नाहीत. परंतु भव्यत्वभाव सापेक्ष पारिणामिक असल्यामुळे जीवाचे स्व–भाव नाहीत त्यामुळे मोक्ष होते वेंळी भव्यत्वभावाचा अभाव सांगितला आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मुक्त जीवांना कोणते भाव असतात ?

अन्यत्र केवलसम्यक्त्वज्ञानदर्शनसिद्धत्वेभ्यः
॥ १०-४ त. सू.

मुक्त जीवांना क्षायिक सम्यक्त्व, केवळ ज्ञान, केवल दर्शन आणि सिद्धत्व हे भाव असतात बाकीच्या सर्व भावांचा मुक्त जीवांना अभाव असतो. क्षायिकभाव हें जीवाचे स्व-भाव आहेत' कर्मामुळे त्यांचा घात होतो व ते प्रगट होऊ शकत नाहीत. आता सर्व कर्म नष्ट झाल्यामुळे ते क्षायिक भाव प्रगट होतात. ज्ञान, अनंतवीर्य, अनंतशक्ती, अनंत सुख अनुभवरूपाने म्हणजे ज्ञानरूपाने असतेच.

मुक्तजीव कोठे जातो ?

संपूर्ण कर्माचा नाश झाल्यानंतर मुक्त जीव वर लोकांच्या अंतापर्यंत जातो. जीवाचा स्वभाव ऊर्ध्वगमन करण्याचा असल्यामुळ लोकांच्या अंतापर्यंत जातो. धर्मद्रव्य लोकाकाशातच अंतापर्यंत आहे. पुढे धर्मद्रव्याचा अभाव आहे. मुक्त जीवाची गमन शक्ती फक्त लोकाकाशांतापर्यंतच आहे.

मुक्तजीवाच्या ऊर्ध्वगमनाची कारणे

पूर्वीच्या संस्कारामुळे, परपदार्थांचा संबंध सुटल्यामुळे, कर्मबंधाचा नाश झाल्यामुळे व स्वभावत. ऊर्ध्वगमन करण्याचा स्वभाव असल्यामुळे हा जीव ऊर्ध्वगमन करतो. प्रत्येक कारणांचे उदाहरण देऊन स्पष्ट केले आहे.

१) अविद्धकुलालचक्रवत् पूर्व प्रयोगात -

प्रथम कुंभार काठीने चाकास गति देतो. काठी काढून घेतली तरी चाक मात्र फिरतच राहते. त्या प्रमाणे ह्या जीवाने संसारअवस्थेत मोक्षासाठी वारंवार प्रयत्न केलेत. मोक्षानंतर प्रयत्न नाहीत. परंतु पूर्वीच्या सवयीने (पूर्व प्रयोगामुळे जीव स्वभावतः ऊर्ध्वगमन करतो.

२) व्यपगतलेपालांबुवत् असंगत्वात् -

भोपळा पाण्यावर तरंगतो परंतु त्यावर माती वगैरेचा लेंप असल्यामुळे तो पाण्यात बुडेल. लेप नसलेला भोपळा जसा पाण्यावर येतो त्याप्रमाणे कर्मलेप नष्ट झाल्यामुळे हा जीव स्वभावतः ऊर्ध्वगमन करतो.

३) एरंडबीजवत् बंधछेदात् -

उन्हात असलेले एरंडाचे बी त्यावरील कवच वाळून फुटल्यांबरोबर स्वभावत् टणकन उडून जाते त्याचप्रमाणे मनुष्यादि भवात प्राप्त होणारे गति आदि कर्मांचे बंधन नाहीसे होताच हा जीव स्वभावतः ऊर्ध्वगमन करतो.

४) अग्निशिखावत् तथागतिपरिणामात् -

वाऱ्याच्या अभावी अग्निज्वाला इकडे-तिकडे न जाता स्वभावतः वर जाते त्याप्रमाणें कर्ममुक्त जीव स्वभावतः ऊर्ध्वगमन करतो.

मुक्तजीवाचे विशेष वर्णन -

मुक्त जीवांना सिद्ध म्हणतात क्षेत्र, काल, गति, लिंग, तीर्थ, चारित्र, प्रत्येक-बुद्ध-बोधित बुद्ध, ज्ञान, अवगाहना, अंतर, संख्या व अल्पबहुत्व या बारा प्रकरांनी सिद्धामधील

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विशेष दाखविले आहेत. याला अनुयोग म्हणतात.

सिद्ध अवस्थेचे यथार्थ ज्ञान होण्यासाठी दोन नयांनी विचार करतात. ऋजुसुत्रनय हा वर्तमान पर्यायाला प्राधान्य देऊन विचार करतो. दुसरा भूतनैगमनय जो भूतकालीन पर्यायाला प्राधान्य देऊन विचार करतो. यास व्यवहार नय असेही म्हणतात.

१. क्षेत्र – ऋजुसुत्र नयाच्या अपेक्षेने सिद्धाचे क्षेत्र त्यांचे त्यांचे आत्मप्रदेश आंहेत. आकाश प्रदेशात सिद्ध आहे. सिद्धात स्वरूपाने भेद नाही, भूतनैगमनयाच्या अपेक्षेने पंधरा कर्मभूमितील पुरुषच सिद्ध होतात. भरत क्षेत्रातून ऐरावत क्षेत्रातून, विदेहक्षेत्रातून किंवा ओढून दुसरीकडे नेले तर संपूर्ण मनुष्यलोकांतून जीव मुक्त होतात. याप्रमाणे क्षेत्रअपेक्षेने भेद केला जाऊ शकतो.

२. काल – ऋजुसूत्र नयाच्या अपेक्षेने एक समयात सिद्ध होतो. भूतनैगमनयाच्या अपेक्षेने उत्सर्पिणी काळात, अवसर्पिणी मध्ये सिद्ध होतात. विदेहक्षेत्रात उत्सर्पिणी व अवसर्पिणी असा काळाचा भेद नाही. विदेह क्षेत्रात उत्पन्न झालेले जीव अडीच व्दीपाच्या कोणत्याही भागात सर्वकाळी मोक्षास जातात.

३. गति – ऋजुसूत्र नयाच्या अपेक्षेने सिद्धगतीतून मोक्षास जातात. भूतनैगमनयाच्या अपेक्षेने मनुष्यगतितूनच जीव मोक्षास जातात.

४. लिंग – ऋजुसूत्र नयाच्या अपेक्षेने सिद्धअवस्था लिंग (वेद) रहित आहे. भूतनैगमनयाच्या अपेक्षेने तिन्ही प्रकारच्या भाववेदात क्षपक श्रेणी मांडून मोक्ष प्राप्त करतो, द्रव्यवेद तर सर्वांचा पुरुषवेदच असतो. सर्व निर्ग्रंथलिंगानेच मुक्त होतात.

५. तीर्थ – काही तीर्थंकर होऊन मोक्षास जातात. कोणी सामान्य-केवली होऊन मोक्षास जातात. कित्येक तीर्थंकरांच्या अस्तित्वात मोक्षास जातात. तीर्थंकरांच्या नंतरही कित्येक मुक्त होतात. वस्तुतः सिद्धांच्या स्वरूपात यामुळे भेद निर्माण होत नाही.

६. चारित्र – ऋजुसूत्र नयाच्या अपेक्षेने चारित्राच्या भेदाचा अभाव करून मोक्षास जातात. भूतनैगमनयाच्या अपेक्षेने यथाख्यात चारित्रपूर्वकच सिद्ध होतात, किंवा सिद्ध क्षायिक चारित्राने सहितच असतात.

७. प्रत्येक बुद्ध–बोधितबुद्ध – प्रत्येक सिद्ध स्वशक्तिरूप आत्मज्ञानाने मुक्त होतो. परंतु कित्येकांना आत्मज्ञानाची प्राप्ती परोपदेशाच्या निमित्ताने (बोधितबुध्द) होते.

८. ज्ञान – सर्व सिद्ध केवलज्ञानपूर्वकच होतात व केवलज्ञानस्वरूपच असतात. पण कित्येकांना मतिज्ञान श्रुतज्ञान ही दोन ज्ञानें, तर काहींना मति, श्रुत, अवधि किंवा मति, श्रुत, मनःपर्यय तर कित्येकांना मति, श्रुत, अवधि, मनःपर्यय अशा ज्ञानपूर्वक केवलज्ञान होते.

९. अवगाहना– आत्मप्रदेशांनी व्यापलेल्या प्रदेशात विशिष्ट आकाराने स्थित राहणे याला अवगाहना म्हणतात. सिध्द जीवांची अवगाहना अंतिम शरीरापेक्षा किंचित न्यून असते. त्यांचे अंतिम शरीर नाना प्रकारचे असल्यामुळे किंवा उपसर्गादिकामुळे त्यांची अवगाहना भिन्न भिन्न

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असते. कित्येकांची उंची ५०० धनुष्य तर कित्येकांची साडे तीन हात आहे. मध्यम अवगाहना अनेक प्रकारची असते.

१०) अंतर – विरहकाळास अंतर म्हणतात जीव सिद्ध झाल्यानंतर दुसरा सिद्ध होईपर्यंत सिद्धाचे कमीत कमी अंतर एक समय तर जास्तीत जास्त अंतर सहा महिने असू शकते. सिद्ध दशेत मात्र फरक नसतो. एका सिद्धां- नंतर दुसरा सिद्ध काही अंतराने होतो. त्याला **सान्तर सिद्ध** म्हणतात.

११) संख्या – एक समयात कमीत कमी एक सिद्ध होतो, जास्तीत जास्त १०८ जीव सिद्ध होतात. संख्येने मात्र सिद्ध स्वरूपात फरक पडत नाही.

१) अल्पबहुत्व – स्वरूपाच्या, स्वभावाच्या अपेक्षेने सिद्धामध्ये तरतमता नाहीच. क्षेत्र, काल आदि वरील अकरा बावीद्वारे – म्हणजे अनुयोगाच्या अपेक्षेने तरतमता असते – जो कमी अधिकपणा असतो. त्याला **अल्व-बहुत्व** म्हणतात. समुद्रसिद्ध थोडे आहेत. तर क्षेत्रसिद्ध अधिक आहे.

क्षेत्रसिद्ध दोन प्रकारचे असतात –
१) जन्म सिध्द २) संहरण सिद्ध. जो ज्या क्षेत्रात जन्मतो तो त्याच क्षेत्रातून सिद्ध होतो. त्याला जन्मसिद्ध म्हणतात. अन्यक्षेत्रात जन्म झालेल्या जीवाचे आपहरण करून दुसऱ्या नेतात व त्या क्षेत्रात जे जीव सिद्ध होतात त्यांना **संहरण सिद्ध** म्हणतात. संहरण सिद्ध थोडे होतात, जन्म सिद्ध संख्यात गुणे अधिक असतात. ऊर्ध्व–लोक–सिद्ध सर्वात कमी असतात,अधोलोक सिद्ध त्यापेक्षा संख्यात गुणे होतात. तिर्थंकलोक सिद्ध त्यापेक्षा संख्यातगुणे होतात. समुद्र सिद्ध सर्वात कमी होतात नि द्वीप सिद्ध त्यांच्यापेक्षा संख्यात– पटीने अधिक असतात.

याप्रमाणे बाह्य – निमित्ताच्या अपेक्षेने सिद्धात भेद केला जातो. वास्तविक सिद्ध स्वभावाच्या अपेक्षेने सिद्ध अवस्थेत कोणताच फरक नाही. सिद्धशिलेवर एका सिद्धात दुसरा सिद्ध मिळून जातो तरी प्रत्येक सिद्ध जीवाचे अस्थित्व स्वतंत्र असते. पंचकल्याणिकात 'केवलज्ञान' कल्याणिकाद्वारे सर्व घाती कर्मांना नष्ट करून केवलज्ञानाची प्राप्ती झाल्याचे दृश्य दाखवितात. परंतु सिद्ध अवस्थां अशी दृष्य नसल्यामुळे ती दाखविता येत नाही. केवल ज्ञान झाल्यानंतर अंतरगुहूर्तातच तो जीव सिद्ध होतो म्हणजे मोक्षास जातो. म्हणून सिद्ध अवस्था प्राप्त होण्याचे उद्दिष्ट जैनांचे असते. जैन संस्कृतीत वीतरागाची आराधना – साधना आहे. प्रत्येक जीवात पुरूषार्थ करून मोक्षास जाण्याचा अनंतशक्ती आहे. प्रयत्न मात्र निरंतर करायला पाहिजे. ॐ नमो वीतरागाय – सिद्धाय.

ल. अ. मानेकर
निवृत्त मुख्याध्यापक
नगर परिषदेजवळ, वाशीम
जि. अकोला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

5169

जैन लोकगीते - वैदर्भीय क्षेत्रे व मुनींचा आहारविहार।

- प्रा. डॉ. दिलीप यशवंत इंगोले
संपादक 'स्वहितवाल संदेश'

मराठी भाषेतील प्राचीन जैन साहित्याची रचना प्रामुख्यानें विदर्भ-मराठवाडा या भागातच झाली· भाषेच्या अभ्यासकांनी हें दाखवून दिले आहे. ही तर झाली ग्रंथ रचना. परंतु हजारो वर्षापासून चालत आलेली मौखिक परंपरा, देखील या ठिकाणी आहे. मराठी भाषेतील जैन लोकगीतांचा अभ्यास करतांना असे आढळून आले की, ही लोकगीते विदर्भ आणि मराठवाड्यात भरपूर आहेत. या लोकगीतातून जैन धर्मियांची श्रध्दास्थान असलेल्या विदर्भातील तीर्थक्षेत्रांचे पण दर्शन होते. हे दर्शन अत्यंत विलोभनीय असे आहें.

या गीतांमधून केवल तीर्थाचे वर्णनच नाही. तर त्यासोबतच, त्यांचेशी निगडीत असणारी श्रध्दा, भावना व त्याची वैशिष्टये देखील सांगितलेली दिसतात. यामधून सिध्द-क्षेत्र मुक्तागिरी, रामटेक, भातकुली तसेच शिरपूर या क्षेत्रांची महती आणि माहिती समजते.

मुक्तागिरीच्या पहाडावरी । मोर टाहो देते ॥
शिखरजी महाराजाची । आनंदानं पूजा होते॥१
केशर कस्तुरीचा वास । कोठुनी गं आला ॥
मुक्तागिरीच्या पहाडावरी । देव घालती सडा ॥२

हे वर्णन आहे मुक्तागिरी सिध्द-क्षेत्राचे समस्त दिगंबर जैनांच्या श्रध्देचे ठिकाण. विदर्भातील अचलपूर या शहरापासून जवळच असलेले. महाराष्ट्राच्या सीमेवरील निसर्गरम्य पर्वतराजीतील, मुक्तागिरी हे अनेक मुनींच्या मोक्षगमनाने पावन झाले आहें. येथील एका टोकावरून मेंढा पडला,परंतु महामंत्राच्या प्रभावानें त्याचा उध्दार झाला. त्यावरून त्यास मेंढागिरी हे नांव पडले. अशा या क्षेत्राचे ठिकाणी इंद्रादिक देव देखील पूजनासांठी येतात· चतुर्दशीचे दिवशी त्या ठिकाणी केशर कस्तुरीचा सडा पडतो· अशी आख्यायिका आहें. लोकगीतातून याचे वर्णन अगदी यथार्थ केले आहें· जे श्रावक-श्राविका शिखरजीस जाऊ शकत नाही ते या ठिकाणी दर्शनास येतात. या क्षेत्रासच शिखरजीची कल्पना करून पूजन करतात· विदर्भ-मराठवाड्यातील लोक शिखरजी यात्रेस जातांना प्रथम दर्शन घेतात ते शिरपूर-मुक्तागिरी किंवा रामटेकचे·

शिखरजीला जाता । प्रस्तान ठेवू कुठे ?
पहिलं दर्शन रामटेके । शांतीनाथ महाराजांचे ।।

रामटेक येथील भगवान शांतीनाथांची १५ फुट उंच भव्य प्रतिमा पाहून मनास जी शांती लाभते ती शब्दात सांगणे कठीणच. आणि म्हणून की काय कशी ही धारणा आहें. संसारात गुरफटलेला हा जीव थोडा फार वेळ काढून येथे दर्शनास येतो· येथे त्याला शांती लाभते·

Ganeshvarni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

लोक जाती शिखरजीला । आपण जाऊ रामटेका
दुकानाला कुलुप ठोका ।।

अमरावती या शहरापासून जवळच असलेल्या अतिशय क्षेत्र भातकुली येथील भगवान अदिनाथांच्या मूर्तीस पाहिले की मन हरकून जात. एवढी देखणी रेखीव, सुंदर प्रतिमा कोठे आढळत नाही.

अंतरी ओतले । सख्या तुझे नख बोटं ।
भातकुली सारखी । प्रतिमा नाही कुठं ।।

पेढी नदीच्या किनाऱ्यावर हे गांव वसलेले आहे. मोठ्या श्रद्धेने लोक त्या ठिकाणी येतात. सर्वसाधारण-ग्रामीण भागातून वास्तव्यास असलेल्या लोकात नवस – सामास करण्याची प्रथा आहे. ते आपल्या मुलांची जावळं वगैरे काढण्यासाठी मुद्दाम येथे घेऊन यंतात.

लोक जाती यात्रेला । आपण जाऊ भातकुलीला ।।
बाळासाठी नवस केला । रुपया पायरीला ।।

म्हणूनच लोकगीतात त्याची नोंद घेतलेली आढळून येते. या लोकगीतात सर्वाधिक गीते आहेत. पद्मावतीची, त्यानंतर शिखरजी आणि शिरपूर विषयीची. विदर्भ व मराठवाड्यातील भाविकांचे विशेष श्रद्धेचे स्थान म्हणजे शिरपूर अंतरिक्ष पार्श्वनाथ शिरपूर हे टिकाण इतिहासात श्रीपूर म्हणून प्रसिद्ध होते. अनेक आख्यायिका या ठिकाणा बाबत प्रचलित आहेत. येथील मूर्ती जमिनीपासून अधर आहेत.

चला जाऊ पाहू । शिरपूर नगर ।।
अंतरिक्ष पारसनाथ । ग बाई धरनीच्या अधर

आजही या मूर्तिचे मागे दिवा ठेवला तर प्रकाश दिसतो' गाळण्याचे कापड सुद्धा सहजपणे मूर्तिखालून काढता येते.

शिरपूर हे गांव कसे आहे. येथील वस्ती कशी आहें. प्रत्येक घरी आड आहेत. (विहिरी) याची चर्चा या गीतामधून आहेच. पण मंदिर आरसे लावून कसे सजविले. भ. पार्श्वनाथाच्य रथयात्रेचे स्वागत कसे केले जाते याचें देखील अतिशय नेटके वर्णन यातून केले आहे. या गावात जरी प्रत्येक घरी आड (विहीर) आहे. तरी पण पवळी मंदिरात असलेल्याा आडाच पाणी काही वेगळच आहे. त्यात गोडी तर आहेत पण गुण वैशिटष्य पण आहे. असे म्हणतात की या विहिरींच्या पाण्याचा उपयोग केल्याने श्रीपाल राजाचा कोड बरा झाला.

शिरपूर गावामध्ये । आहे घरोघरी आड
पाणी पवळीचे गोड । देवाच्या प्रक्षाळाला ।।

म्हणूनच या क्षेत्राचा महिमा काही वेगळा आहे

चला जाऊ पाहु । शिरपूरचा मयमा ।
अंतरिक्ष महाराजाची । आहे वाळूची ग प्रतिमा ।
चला जाऊ पाहु । शिरपूर शहरात अंतरिक्ष भुयारात ।।

अशा या सुंदर ठिकाणाच वेड श्रद्धळू-श्रावक श्राविकांना कां बरे नाही लागणार ? स्वप्नात देखील पारसनाथ दर्शन देतो स्यित्रांना हे आपले माहेर वाटते. कारण या ठिकाणी आल्यानंतर त्या सर्वकाळ विसरून जातात. संसारातील कष्टाला विसरून आत्म सूखाची अनुभूती त्यांना या ठिकाणी येते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हे पाहिले आपण काही क्षेत्रासंबंधी परंतु भारतातील दिं जैन तीर्थसेत्रांचे सौरक्षण व विकासाच्या दृष्टीने पू. गुरू संमत भद्राच्या आज्ञेवरून एक कोटी निधीची प्रेरणा ज्यांनी भारत पायी घालून ३३,००० कि मि. चा विहार केली. त्या गुरूवर्य १०८ आचार्य आर्यनंदी महाराजांच्याही गुरूमहिमा काही महिलांच्या तोंडून लोकगीताच्या सुरेल चालीत ऐकतांना किती आनंद होतो म्हणून सांगावा तो कमीच अशा या तपोमूर्ती, तीर्थरक्षक, वात्सल्यमूर्ति. दिगंबर मुनींचे पदचरण पंच-ल्याणिक महोत्सवाच्या निमित्ताने लागत असताना आता भाविकाचा उत्साहही अमाप वाढला. या वृध्यापकाला ८८ वर्षाच्या वयातही पू. श्री ची उत्कट इच्छा पाहून व शब्द तो शब्द पाळणाऱ्या मुनीवरांचे चरणी कोण नतमस्तक होणार नाही. आणि त्यांचे स्वागत म्हणजे एक अपूर्व सोहळा मानावा लागेल.

तया स्वागताच्या वेळी, नयनी अश्रू येती ।
वचनपूर्ति बघुनि सारे, नम्र पदी होती ॥

पू. श्री चे आगमन व स्वागत झाल्यावर माता भगिनी आहाराची तयारी करणार तेव्हा त्यांचे भाव कसे होतील त्यांच्याच शब्दात पहा

भावरीसाठी लाविता चौका कोणी ।
सांभाळ ग बाई, इथं घालू नको वेणी ॥

त्यांच्या आहारावेळी निघतांना काही संकल्प घेतात त्यावेळी बाई म्हणते
महाराजांच्या आहरासाठी कळसावरी नारळ ।
आहार देतेवेळी कोणी करू नका गोंधळ ।

आहार शब्दाऐवजी 'भावर' हा शब्द प्रयोग पण करतात. आहार होताच भगिनीला समाधान वाटते व ती म्हणते –

दिगांबर मुनींची माझ्या घरी भावर पटली ।
साता जन्माची पुण्याई, आज उदयाला आली ॥

आहार कोणकोणत्या पद्धतीने दिला जातो. मी तर आंबेमोहरा तांदुळाचा भात केला यावर ती म्हणते –

आंबेमोहर तांदुळाचा केला मी साखरभात ।
आर्यनंदी महाराजांचा आहार माझ्या घरात ॥
चांदीचा ग पेला बाई भरला बासुंदीचा ।
मुनीला आहार देते की फळाच्या रसाचा ॥
हात मी जोडिते पाया मी पडते ।
आर्यनंदी महाराजांचे दर्शन घडवीते ॥

यापुढेही जाऊन जेव्हा तिचा आनंद गगनात मावेनासा होतो तेव्हा ती फुगडीचे पण गाणे म्हणते –

फू बाई फू फुगडी फू दमलास काय माझ्या
श्रावका तू रे, श्रावका तू ॥

णमोकार मंत्राचा १०८ जप –
आर्यनंदी महाराजांनी खरं केला तपं ॥
आता फुगडी ॥ १ ॥
लहान गांव मोठ गाव, गावासारखे गांव ।
आर्यनंदी महाराजांच्या मातेचे कृष्णाबाई नाव ।
लहान हार मोठा हार, हा सारखाहार ॥
आता फुगडी ॥ २ ॥
आर्यनंदी महाराजांना क्लेश झाले फार ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

लहान गडू मोठा गडू गडू सारखा कडू ।
आर्यनंदी महाराजांना दोन्ही हात जोडू ॥
आता फुगडी फू ॥ ३ ॥

राग नको द्वेष नको, नको देवा काही
जिन धर्माची सेवा घडो हीच मागणी पाही ॥
आता फुगडी फू ॥

ही लोकगीते वाचली की त्यातील वैदर्भीय ळेत्रांती माहिती मिळते. एक नव्हे अनेक अज्ञात पैलूचे वाचन पुन्हा पुन्हा केल्यानंतर दर्शन घडते. या लोकगीतांच्या माध्यमातून आमच्या अज्ञानी, अशिक्षित समजल्या जाणाऱ्या भगिनींनी आपल्या धर्माची धुरा, धर्मध्वज उंच राहण्याकरिता जो संयम राखला, चारित्र्र सांभाळले, पूजा, प्रभावना, करीत करीत हा वसा कायम ठेवून नवीन पीढीच्या हाती दिला. तो नव्या पीढीने आता सांभाळला आहे. नवी पीढी सुशिक्षित विद्वान होत चालली याचे कारण आजचा शिक्षण प्रसार व शिक्षणाच्या सोई, प्रकाशित होत असलेले नव-नवीन साहित्य, याचा भरपूर उपयोग आमच्या या पीढीने स्वाध्याया द्वारे करून आपले जीवन उज्वल करण्याचा प्रयत्न करावा.

पंचकल्याणिक महोत्सव ही त्या करिता आलेली पर्वणी आहे. येथे पूज्य - पुजक व पुजारी आहेत. यात भाग घेऊन आपणास मोक्ष मार्गांची शिडी चढावयाची आहे. मग सारे येणार आहात ना आमच्या सोबत पू. आचार्य आर्यनंदी गुरूदेवांचा आशीर्वाद घेऊन ! या तर चला !

प्रा. डॉ. दिलीप यशवंत इंगोले
' वात्सल्य '
खेडकर नगर, अकोला

* *

हार्दिक शुभ कामनाएं !

॥ श्रीं महावीराय नमः ॥

दोशी ब्रदर्स

किराणा, सुखा मेवा तथा अनाज के व्यापारी
मेन रोड, वर्धा - ४४२ ००१
फोन : ३३२१

- प्रवीणचंद्र मणीलाल दोशी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वात्सल्यमूर्ती

आचार्य श्री आर्यनंदी महाराज

– यशवंत इंगोले
नि. उपशिक्षणाधिकारी, अकोला

विन्यस्यैदंयुगीनेषु, मतिमासु जिनानिव ।
भक्त्या पूर्वमुनीन् अर्चेत्, कुतः श्रेयोऽति–
चर्चिनाम् ॥
(सागारधर्मामृत)

जैन धर्मीय श्रावकास वीतराग मूर्तीचें दर्शन होताच सर्वश्रमपरिहार झालासा वाटतो. तीर्थकरांच्या गुणविशेषाचे हें महात्म्य आहे· म्हणून आपण जशी रत्न,पाषाणादिकांची मूर्ति करून तिला वृषभ, अजित इ. नामे देऊन तिची स्थापना करून पूजा करतो त्याचप्रमाणे या पंचमकालातल्या मुर्तीच्याठायी पूर्व काल–च्या मूर्तीची कल्पना करून भक्तीने त्याचा यथायोग्य सत्कार करावा

जैन धर्मांत तत्त्वज्ञानासोबतच व्याव-हारिक जीवनाचे दृष्टीने आचारशास्त्राचे स्थान फार महत्त्वाचे आहे. कारण सदाचारानेच समाजात वैयक्तिक जीवन सुखी होऊ शकत नाही· पू. गुरुवर्य श्री १०८ आचार्य आर्यनंदी महाराजांचे जीवन हा अशाच अमृतमय ठेवा आहे.

जनतेचा कैवारु । दीनांचा दयाळू ।
धर्मियांचा महामेस, सोयरा सखा ॥ १ ॥

दिगंबर जैनियांचा सोयरा व सखा असाहा दिगंबर साधू साऱ्या जनतेचा. भारत–भूचा सखा बनला आहे, त्याच्यातील साधूवृत्ति ही गृहस्थाश्रमानच जागृत झाली होती· प्रामाणिकपणा, राजनिष्ठा, निष्कामसेवा, सदैव समाधानी, अत्यंत स्नेहल, गुरुभक्ति परायण इतकेंच काय तर परमात्म्याशी तादात्म्यता इ· गुणविशेष ज्यात आहेत· यात अतिशयोक्ति नसून सत्यता आहे. याचा अनुभव साऱ्यांना येत आहे म्हणूनच भारतीय मुनीवर्गात एक आगळेच आकर्षण निर्माण झालें आहे· त्यामुळे·

शांतिरूप तीर्थरूप धर्मरूप स्नेहला
शतायु हो, यशवंत हो, त्रिवार वंदन आजला

असे भाव शब्दरूपाने साहजिक व्यक्त होतात.

ज्या प्रातः स्मरणीय प.पू.शांतिसागर आचार्यांनी त्यागी जीवनाची व. दीक्षा दिली. त्यांच्याच स्वभावातील शांत स्वभाव, जाणून जिनधर्मियास–अजैनासही वात्सल्याचे पाठ दिलेत. ज्या क्षेत्री पू. आचार्य शांतिसागरांनी सल्लेखना घेतली. ते आपले जन्मस्थान मानून कुंथलगिरी क्षेत्राचा विकास घडवून आणण्यास श्री शिवाजीराव पाटील (निलंगेकर) सारख्या राजगादीवर बसणाऱ्या पाटबंधारे मंत्र्यास प्रेरणा देऊन स्थानाचे महत्व पटविले व त्यांना मुख्यमंत्री होण्याच्या आशीर्वादाची सत्यता फळास आली. काम करा. तुम्ही मंत्री काय मुख्यमंत्री व्हाल हें शब्द ते आमदार नसताही मुख्यमंत्री झाले. त्यावेळी त्या शब्दांची आठ–वण ठेवून स्वतः दर्शनास आलेत. परवा परवात्तर २ वर्षांपूर्वी मुंबईस पू. आर्यनंदीना आचार्यपद देण्याच्या कार्यक्रमासही आवर्जून उपस्थित झाले. कुंथलगिरीस प्रामुख्याने

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवितांना त्यांनी धरणच बांधल्याने परिसरातील आम जनता सुखी झाली. रत्नमय मंदिर स्व. समंतभद्र हॉल, शाळेची इमारत, शिक्षकांची घरे, वसतिगृहे, देशभूषण–कुलभूषण पहाडास परिक्रमना रस्ता इत्यादी तयार झाला. त्यानंतर वेरुळचा तर आता नवागड क्षेत्राचाही याच पद्धतीने विकास होत आहे. तो पू. श्री आचार्य आर्य–नंदेच्या प्रेरणेने नवागडला तर गुरूकुलासोबच रतनबाई सोनटक्के या नावाने माध्यमिक शाळा काढून श्राविकाश्रम काढण्याचे घाटत आहे ? वरील सर्व कार्यात मुंबईचे वास्तव्यात मुंबईकरांनी तथा इतर विहारात जनतेला दानाची प्रेरणा दिल्याने जनतेची दानत किती असू शकते हे केवळ श्री आर्यनंदीच जाणू शकतात.

मुनी दीक्षा देणारे गुरुदेव समंतभद्र यांना तर कृपेची साऊली मानून गुरुआज्ञेचे पालन म्हणून भारतीय तीर्थक्षेत्राच्या रक्षणार्थ संकल्पित एक कोटीची पूर्ति करण्यास ३३,००० कि.मी. ची भारतयात्रा केली. त्याकरिता केलेल्या साखरेच्या त्यागाची पूर्ति शेवटी बेलगावकरांनी केल्याने तेथे एक मोठा कार्यक्रम आयोजित केला होता. तीर्थाप्रति जनतेत वात्सल्यभाव निर्माण केला. ते म्हणत ‘ वात्सल्यअंग सदा जो घ्यावे, सो ही तीर्थंकर पद पावे ’ हीच खरी गुरूभक्ति !

गृहस्थ जीवनातील आपल्या मातोश्री व पिताश्रींचे आशीर्वाद व धर्मसंस्कारामुळे त्यांचे जीवन उजळून निघाले. त्यांनी वडिलांच्या निवृत्ति बरोबर आपल्या शिक्षणास तिलांजली देऊन त्यांची सेवा करता यावी म्हणून त्यांचीच नाकेदारीची जागा पत्करली व मोगलाईतील रझाकारांच्या अमानुष अत्याचारांचा अनुभव घेतांनाही पंचाणुव्रतांचे पालन करून राजनिष्टा ढळू दिली नाही. अत्यंत प्रामाणिकपणे व सहबंधूंशी वात्सल्यभाव ठेवूनच नोकरी केली. जीवदया हा त्यांच्या जीवनातील स्थायिभावच आहे, मोहवाली या गावी वंजारी लोक रेडे, बकरे बळी देत ही प्रथा (अंधश्रद्धा) त्यांनी पाटलाकरवी पुरणपोळीचा नैवेद्य देऊन हजारो बकऱ्यांना जीवदान दिले.

समाजातील आपसीकलह मिट–विण्याचे अनेक प्रसंग त्यांचे जीवनात घडले. त्यात वर्धानगरी पण आहे.काही माता-भगिनींचे जीवन जगण्यासही त्यांनी मदत केली. ज्या घरात दुही असल्यानें पतिपत्नित तेढ निर्माण झाल्याने पत्नी माहेरी गेलेली पण शंकररावांच्या शब्दावर तिचे पिता तिला सुपर्द करून परत संसार उभा करून देतात. तर नाकेदारीत असतांना श्वेतांबर युगलाजवळचें दागिने शासनदारी जप्त होणार तेवढ्यात ‘शंकरराव’ (पू. श्री) तेथे पोचले व त्यांनी त्यांना सोडविले. विहारात मराठा, भिल्ल, मांग–महार इ. कित्येक लोकांकडून दारूची व्यसने सोड–विलीत. व्यसनमुक्ति हा ही एक मोठा कार्यक्रम त्यांनीं राबविला.

ब्रह्मचारी असतांना जैन मंत्रतंत्रांनी कित्येक श्रावकांना दुःखमुक्त केले ‘ णमोकार मंत्र हा केवळ जैनांचा नसून सर्व प्राणीमात्राचा आहे हे पटवून दिले. भगवंतांची भक्ति–पूजा किती भक्तीभावानें करावी याचे प्रात्यक्षिक पाठ त्यांनी समाजास दिले. विविध पूजा शास्त्रशुद्ध कशा कराव्यात. त्याच अर्थ बोध जाणून करात्व्यात. पूजेचे मंडळ सुंदर रांगोळ्यांनी काढणे त्यास संगीताची साथ देऊनही

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भक्तिभाव प्रगट करता येतो. इद्र/सागर चातुर्मासात तर त्यांनी 'बालकांना' पाठशाळे-सोबत रांगोळयाचे पाठ दिलेत. आधि केले मग सांगितले ही त्यांची वृत्ती मग हा त्यांचा आदर्श आम्ही कसे विसरणार !

गृहस्थाश्रमात अत्यंत साधें जीवन जगलेत. कोणाकडून कर्पादिकेची अपेक्षा केली नाही. नोकरीत असतांना स्वत ची चूक नसतांनाही जेलमध्ये जाण्याचा प्रसंग आला पण निष्ठा ढळू न देता 'भक्तामर' पाठ तन्मय-तेने म्हणतातच त्यांना मुक्तीचे आदेश मिळतात· "आपको रिया कर दिया जाता है।" आप पाक है। आपमे कुछ जादू है। असे म्हणणारे रझाकार नतमस्तक होऊन त्यांना संरक्षण देऊन रात्री औरंगाबाद येथील जैन मंदिरात पोचवितात. त्यानंतर ते अपूर्ण लब्धि-विधानाची पूर्तता करतात. त्यांचे पंचाणुव्रत पाळतात. त्यांचे अधिकारी व सहकारी मदत करतात· ब्राम्हण अधिकारी तर घरी बोलावून पादप्रक्षाल करतात व आतिथ्य स्वीकारतात. असे कित्येक प्रसंग त्यांच्या जीवनात घडलेत.

नोकरीत राहून मातृ-पितृ गुरू सेवा करतांनाच मराठी, उर्दू राजभाषासोबत हिन्दी इंग्रजी, संस्कृत, कानडीचाही अभ्यास करतात. व आवश्यक त्या भाषेत प्रवचन करून मंत्र-मुग्ध करतात· पैठणचे नाथमंदीर उभारतांना त्यांचा सिंहाचा वाटा आहे· वैदिक अभ्यासही असल्यानें बुलडाणा राममंदिरात शेगावचे गजानन मंदिरात मराठीत तर नांदेडच्या गुरु-द्वारात उर्दू प्रवचने झालीत वरुड येथे माळी समाजासमोर वैदिक प्रवचने दिलीत. त्यामुळे ते विधर्मियांचे ही गुरू बनले·

एकला विहार असला तरी सर्वगुण संपन्नता / सहिष्णुता असल्यानें त्यांचा विहार सफल होतो· एक गावाहून दुसरे गावी पोचले की मागच्याची जबाबदारी संपली. त्यामुळे परिग्रहाचे कारण बाल-तरूण-वृद्धांनाही ते आपलेसे वाटतात.

या वयातही धर्माध्ययन, लेखन, अनुवाद कार्य सुरु आहेत· त्यांनी समय-सार आदि १५ ग्रंथांचा अनुवाद तर भेदसंग्रह. बाळगंगा, आत्मसाक्षात्कारीध्यान इ. १० ग्रंथांचे संकलन केलें. गुरूंची पत्रे लिहितांना त्यांची अलौकिक शैली आढळते तर प्रवचना-तून (पठनातील संग्रहामुळे) उत्तमोत्तम सूक्तींचा ते उपयोग करतात.

मुनींचा शब्द म्हणजे शब्द. एकदा शब्द दिला तर तो पाळलाच पाहिजे. हा त्यांचा बाणा. मग आपल्या शरीर जीवनाची त्यांनी पर्वा केली नाही. हार्ट अटॅक आल्या-वरही-२४ कि मी.-केसापूर यात्रेस व लगेच हैद्राबाद पंचकल्याणिकास पोचले. आताही वयाच्या ८९व्या वर्षात पदार्पण करीत असूनही वर्धा नगरीतील पूजेस येत आहेत. त्यांच्या मुनीदीक्षासही ३५ वर्ष होत आहेत. अशा या आदर्श जीवन जगणाऱ्या मोक्षगामी-मुनी वर्याचे जीवन सर्वांना आदर्शभूत व्हावे· ते म्हणतात-

जब आये तुम जगतमे सब हासे तुम रोय।
ऐसी करनी कर चलो की तुम हासे हम रोय॥

अशा या या महामानवाबद्दल सोला-पूरचे डॉ· कुलभूषण लोखंडे म्हणतात. "पू. महाराजांचे जीवन एका नदींच्या संथ प्रवाहा-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रमाणे असून अनेक तृषार्त श्रावकांना त्यांनी शांत केले, नवजीवन दिले एवढेच काय तर अनेकांची जीवने त्यांनी नदीच्या किनाऱ्या-वरील वृक्षाप्रमाणे समृद्ध व सतेज केलीत."

डॉ. निर्मलकुमार फडकुले म्हणतात- "आर्यनंदीची अनेक रूपे मी पाहिलीत. त्यांची जीवनगाथा म्हणजे आत्मविकासाच्या वाटेने चालत राहिलेल्या एका श्रमणाची पावनकथा आहे. स्वतःला जिंकणाऱ्या जिनानुयाची पुरु-षार्थ कहाणी आहे. मिथ्यात्व आणि अज्ञान यांचे खडक फोडून मार्ग तयार करणाऱ्या पथिकाची ही प्रेरक कविता आहे. प्रज्ञा आणि तपस्या यांच्या आविष्काराची ही एक स्फूर्ति आहे."

अेक सत् प्रवृत गृहस्थाश्रमी, कर्तव्य-निष्ठ, सुसंस्कृत सरकारी सेवक, एक धार्मिक रस घेणारा चिंतनशील साधक, निग्रंथ, तपस्वी, समाज शिक्षक, तीर्थक्षेत्र रक्षणास कोटी निधी उभारणारा परम जिनभक्त अशी आर्यनंदीची अनेक रूपे आहेत· आर्यनंदी होणे किती कठिण आहे. याची जाणीव आपणास होते त्यांच्या विहारात-जीवनात-निर्जीव सतारीच्या तारा बोलू लागतात. त्यावरून हात फिरवावा लागतो ते काम केले. आचार्य आर्यनंदीने निस्वार्थतेची सीमाच गाठली.

एक कवि म्हणातात-

जीवन त्यांना कळले हो
मी पण त्यांचे पक्व फळापरी
सहजपणाने गळले हो ।

अशा या गुरुदेवांचे ८९ व्या वर्षांत पदार्पण व ३५ व्या मुनी दीक्षेच्या वर्षाचे आपण वर्धाकर स्वागत करून सेवा करणार आहात ही अत्यंत भाग्याची गोष्ट आहे.

'दिव्यत्वाची जेथ प्रचीति,
तेथे कर माझे जुळती'

– यशवंत इंगोले
से. नि. उपशिक्षणाधिकारी
'वात्सल्य' खेडकरनगर,
अकोला.

प्रणाम शतशतवार

महावीर चरणांना अमुचे,
प्रणाम शतशतवार ॥ धृ ॥

गैरसमज ते नष्ट करू या
स्वरूपदर्शन स्पष्ट करू या
स्वप्न आमचें पुष्ट करू या
परावलंबन त्यागुनी बनले,
शक्तीचे आगार ॥ १ ॥

नयनांना नयदृष्टि देऊ या
चरणांना आचरण करू या
विज्ञाना ज्ञानात रमवू या
केवलज्ञानीं केवल रमुनी,
बनले सौख्यागार ॥ २ ॥

नागपूर – मनोहर मारवडकर

व्यर्थ शिक्षा समाजाची नसता धर्म शिक्षण ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मंगलाचरण

ब. विद्युल्लता हिराचंद शहा
श्राविका संस्थानगर, सोलापूर

अकरा अंग चौदा पूर्व ज्ञानाचा महा-सागर आहे. यात कांहीच अतिशयोक्ति नाही. मात्र जैन साहित्याचे अध्ययन केले पाहिजे. त्याशिवाय वरील विधानाची सत्यता पटत नाही.

भ. महावीरापर्यंत अकरा अंग चौदा पूर्वाचे ज्ञान मौखिक स्वरूपात होते. काल दोषामुळे केवलज्ञान परंपरा लोप पावली. तसेच शारीरिक असमर्थतेमुळे मौखिक ज्ञानाचा ऱ्हास होऊ लागला. त्यामुळे जगा-तील प्राणी मात्रावर ज्ञानाचा अनुग्रह राहावा म्हणून पुष्पदंत व भुतबली या दोन आचार्यांनी षट्खंडागमाची रचना केली. आगम परंपरा अक्षुरण रहावी म्हणून या हेतूने केलेले प्रयत्न जगावर महत् उपकार ठरले.

असा हा ज्ञानयज्ञ निर्विघ्नपणे संपन्न व्हावा अशी स्वाभाविक इच्छा असणे मनाच्या निसर्गवृत्तीला धरून आहे. म्हणून त्यासाठी ऋषीमुनींनी सांगोपांग चर्चा करून व्यवस्थित स्वरूप दिले आहे. ते इतके व्यवस्थित साधले की, ती एक परंपराच होऊन बसली. ही परं-परा सर्वांनी यथामती पाळली आहे.

सर्व भाषाप्रभूंनी आपआपल्या आराध्य देवतेचे स्मरण केले आहे. या स्मरणामध्ये इंद्रधनुष्याची सप्तरंगी मनमोहक छटा आहे. त्या बहुरंगी बहु आयामी स्मरणाचे किंचित् अभ्यासपूर्ण विश्लेषण मी सादर करणार आहे. प्रकाशित आणि अप्रकाशित अशा दोन रूपात दि. जैन साहित्य आहे. पैकी अप्रकाशित साहित्य अधिक आहे. अभ्यासासाठी संदर्भ म्हणून जे ग्रंथ मी वाचले ते मला प्रवेशद्वारा-सारखे वाटले. भिंतीसारखे ते रोखीत नसत.

अध्ययन करतांना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती ही की, कांहीतरी अवास्तव / स्तुती करून आराध्य देवतेस प्रयत्न करून घ्यावीं अशी इच्छा कुणाचीच दिसली नाही. फक्त आपले लौकिककार्य साधून घ्यायचे हा उद्देश कुठेच नाही. परम वीतराग देवाच्या संदर्भात हे शक्यही नाही व सिद्ध देखील होऊ शकत नाही. कारण सच्चिदानंद रूप असल्यामुळे वीतराग देव, ज्ञान, आणि आनं-दमय आहे. त्यात रागांश नसतो आणि त्या-मुळे स्तुती प्रशंसेने काही नवीन प्रसन्नतेचा त्यांच्यात संचार होऊ शकत नाही.

वीतराग अर्हतदेव परम उदासीन असतात. त्यामुळे भक्ताचं भलं किंवा अभक्ताच बुरं काहीच करू शकत नाहीत. मग मंगलाचरणरूपाने त्याची स्तुती का केलेली आहे ? त्यांच्यावर कर्तृत्व का लादले गेले याची चर्चा करणे उद्बोधक ठरेल. एवढे असू द्यावे को, केवळ इच्छापूर्वकच कार्य करणारा देखील कर्ता असतो. इच्छाशुन्य कर्ता निमित्तकारण असतात. काही उदाहरणे थोडक्यात पहा -

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१) या औषधामुळे मी बरा झालो, असे कुणी म्हणतो, तेव्हा औषधाने इच्छापूर्वक रोग्याच्या शरीरात काहीच केलेले नसते. पण औषधाच्या निमित्ताने शरीरात रोगनाशक कार्य झाले म्हणून रोग निवारण हे औषधाचे कार्य समजल्या जाते. सारांश उपचाराने औषधावर कर्तपणाचा आरोप केला जातो.

२) औषधामुळे रोग नाहीसा होतो औषधामध्ये इच्छा नाही. आणि बुद्धी देखील नाही. तरींही रोगनिवारणास औषध निमित्त कारण ठरते.

३) एका जवळ छत्री आहे. दुसऱ्याजवळ नाही. दुसऱ्याला पहिल्याची छत्री पाहून आपल्या छत्रीची आठवण होईल. औपचारिक-पणे तो म्हणेल, या छत्रीचा मी आभारी आहे, कारण तिने माझ्या छत्रीची आठवण करून दिली. छत्री जड असली तरी तिच्या निमित्ताने आठवण होणे हे कार्य झाले म्हणून अलंकारिक भाषेने आभार मानले आहेत.

४) माझे त्या वस्तूने मन हरण केले आहे. तिच्या शिवाय मी राहू शकत नाही. असे जेव्हा एखादा जीव म्हणतो. त्यावेळी त्या वस्तूला किंवा व्यक्तीला मात्र खबर नसते. त्या वस्तुकडून बुद्धीपूर्वक कार्यही झालेले नसते पण तिच्या निमित्ताने मोही जीव उत्तेजित होतो, मात्र दोष त्या वस्तूला देतो.

५) एका साधूकडे एकजण येतो, भक्ति भावाने सेवा करतो. साधूते इतर भक्त त्याच्या सेवेने प्रभावित होतात आणि त्याची सर्व व्यवस्था करतात. सेवा करतेवेळी साधूचीं त्याने स्तुती केली त्यात साधूने काहीही केले नाही. किंवा भक्ताची व्यवस्था करण्याचा संकेत देखील केला नाही, मात्र दोन्ही प्रकार घडले. त्यामुळे तो भक्त त्याचे श्रेय साधूला देतो.

वरील पांचही उदाहरणावरून लक्षात आले असेल की, एखादया कार्याचा कर्ता किंवा कारण होण्यासाठी इच्छा, बुद्धी किंवा प्रेरणा असणे अनिवार्य नाही. कार्य त्याशिवाय देखील होऊ शकतें. इतकेच नाही तर प्रत्यक्ष वस्तू देणे, प्रेरणा देणे या मुळेही दाता होत नाही. होते असे की त्या निमित्ताने, प्रभावाने आश्रयाने, संपर्क होण्याने कारणाचे कारण होण्यामुळे एखादी वस्तू प्राप्त होऊ शकते. त्याप्रमाणे परम वीतराग अरहंत देवाकडे कर्तृत्व सोपवणे निव्वळ व्यर्थ होऊ शकत नाही कार्य होण्यात अरहंत देवांचा प्रत्यक्ष संबंध नसेलही, मोहनीय कर्माच्या अभावामुळे इच्छा नसेलही आणि प्रेरणाही दिली नसेल पण कर्तृत्वाचा आरोप मात्र केला जातो. म्हणून " हे " भगवान आपल्या कृपा प्रसादाने माझे कार्य सिद्ध झाले, असेच म्हणावे लागते अर्थात अलंकृत भाषेत असे म्हणतात. वास्तविक कार्य वस्तू स्वभावामुळे होते. अनुकुल संयोग झाल्यामुळे होते. त्या होण्यामध्ये कुणाची इच्छा किंवा प्रसन्नता निमित्त होऊ शकत नाही.

वीतराग भगवंताची प्रार्थना ही एक भावना आहे अलंकारिक भाषेने असे म्हणता येईल की, भगवंता समोर आपली मनोकामना व्यक्त करून मनात असा भाव धरावा की, हे भगवान मी आपल्या या चरणी राहून संस्कारित होऊन आणि प्रेरणा घेऊन माझी मनोकामना पूर्णकरुन घेण्यास मी स्वतःच

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

समर्थ होईन, प्रार्थनेचा असा भाव मात्र नसतो की, " हे भगवान आपण स्वतः हातपाय हलवून माझे कार्य करा. किंवा माझ्यासाठी आपण स्वतः बोलून माझे कार्य करण्यास प्रेरित करा, आदेश द्या. " असा भाव नसणेच योग्य आहे.

जीवाच्या शुभाशुभ भावाच्या तरतमते-मुळे आणि कषायादि परिणामांच्या तीव्र-मंद-तेमुळे कर्म-प्रकृतिमध्ये परिवर्तन, बदल किंवा संक्रमण होते. ज्यावेळी ज्या प्रकारच्या कर्म-प्रकृतीच्या दयाचे प्राबल्य असेल त्यावेळी बहुतेक कार्य तदनुरुप निष्पन्न होते. वीतराग देवाच्या उपासनेच्यावेळी त्यांच्या गुणांचे स्मरण होते. चिंतन होते आणि भगवंताच्या गुणा-विषयी अनुराग ओढ वाढीस लागते. त्यामुळे प्रार्थना करणाऱ्या जीवामध्ये शुभ भावांची उत्पति होते. अर्थातच पापपरिणति विर्सजित होते आणि पुण्यापरिणति त्या जागी येते. परिणाम असा होतो की पापकृतिचा रस संपतो. आणि पुण्यप्रकृतीचा रस वाढतो. या प्रक्रियेमुळे जी प्रकृती जीवाचे दान, लाभ, भोग, उपभोग व वीर्य (शक्ति) यामध्ये विघ्न निर्माण करते ती प्रकृती (अंतराय कर्म) निर्बल-क्षीण होते. त्यामुळे जीवाच्या इच्छित कार्यामधील अडथळाच दूर होतो आणि अनेक लौकिक कार्य अनायासेच सिद्ध होतात, न होणारे कठीन कार्य देखील सहज होते. म्हणून कार्यसिद्धीचे श्रेय उपासनेकडे जाते' साहजि-कच स्तुती वंदनेला इष्ट फलदायी म्हटले जाते, मंगल शब्दाचा अर्थ –

अनेक शास्त्रातून मंगल शब्दाचा अर्थ दिला आहे. सर्व शास्त्रात दिलेला अर्थ एकत्रित करून देणे विस्तारभयास्तव योग्य नाही. अर्थ इतका स्पष्ट आहे की त्यावर वेगळे भाष्य करणें चर्वितचर्वण होईल. म्हणून काही निवडक शास्त्रातील अर्थ पहा –

१) मलं गालयति विनाशयति घातयति दहति हन्ति विशोधयति विध्वंयतीति मंगल !

२. मंगं सुख तल्लति आदत्त इति वा मंगलम् ।

३. मं मलुं पाप गालयति ध्वंसयति, मंगं वा पुण्य लात्यादत्ते इति मंगलम् ।

४. मलं पापं गालयन्ति ध्वंसयति, मंगं पुण्य लात्यादत्तें अस्मादिति मंगलम् ।

५. मलं पापं गालयन्ति मूलादुन्मूलयन्ति निर्मूलकाषं कषन्तीति मंगल अथवा मंग सुखं परमानंदलक्षणं लान्ति ददति इति मंगलम् ।

६. मलं पापं गालयति विध्वंसयतीति मंगल अथवा मंगं पुण्यम् सुखम् तल्लति आदत्ते गृण्हति वा मंगलम् ।

७. मंग्यते-धिगम्यते हिमनेति मंगलम् अथवा मंगं इति धर्मस्यारख्या तं लाति आदत्ते इति मंगलम् ।

अशा अनेक व्याख्या आढळतात. जैन शास्त्रातीलच व्याख्या एकत्र केल्यातर ४०/५० व्याख्या सहज होतील. सारांश रूपाने मंगल शब्दाचा अर्थ असा – उपचाराने जीवाच्या पापांना मळ किंवा मल म्हटले आहे. द्रव्यमल (स्वेदमल. रेणू, कर्दम इ.) व भाव मल (अज्ञान, अदर्शन,) असे दोन भंद होतात त्यांना नाहीसे करणारे तें मंगल अतरंग-बहि-रंग तसे द्रव्य व भाव या अपेक्षेने अनेक भेद होतात. त्या सर्व मलांचा नाश करतो, गाळतो, दहन करतो, शुद्ध करतो, विध्वंस करतो तो मंगल होय

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

"मंग" म्हणजे सुख. म्हणून सुखाला देते ते मंगल "मं" म्हणजे पाप "मंग" म्हणजे सुख, हे दोन शब्द एकत्रित घेऊन तिसरी व्याख्या आहे. (पाप नाश करते व पुण्य देते, ते मंगल) चौथी देखील व्याख्या तशीच आहे. पांचव्या व्याख्येत परमानंदलक्षण शब्द जास्त आहे तर सातव्या व्याख्येत धर्म शब्द जास्त आहे. पापाचा अभाव व पुण्याचा सद्भाव हे दोन्ही एकाच वेळी साधणेही मंगल शब्दाची किमया आहे. मगि धातूपासून मंगल शब्दाची उत्पत्ति झाली. अर्थात मगि धातूला अलच् प्रत्यय जोडल्यानंतर मंगल शब्द बनतो. पांढऱ्या स्वच्छ कांचेतून प्रकाश किरण आरपार गेल्यानंतर नयन मनोहर रंगकिरणांचा पट दिसावा, त्याचप्रमाणे मंगल या एका शब्दाच्या अनेक व्याख्या आढळून येतात.

शब्द कोशामध्ये देखील मंगल शब्दाचे सुदैव, सुख, कल्याण, शुभ–शकुन, शुभ कार्य असे अनेक अर्थ आहेत.

मंगल शब्दाचा एकार्थवाची शब्दावरून त्याची व्यापकता दिसून येते. तिलोयपण्णत्ति (१,८) मधील खालील श्लोक पहा,

पुण्णं पूदपवित्ता पसत्थसिव भद्द खेमकल्लाण्णा।
सुह सोक्खावि सव्वे णिद्दिट्ठा मंगलस्स
पज्जाया ॥

(पुण्य, पूत, पवित्र, प्रशस्त, शिव, शुभ, कल्याण, भद्र आणि सौख्य इत्यादि मंगल शब्दाचे पर्यायवाची नामें आहेत.)

धनंजय नाममाला मध्ये देखील खालील श्लोक आढळतो –

क्षेमं कल्याणमभयं, श्रेयो भद्रं च मङगलम् ।
भावुकं भाविकं भव्यं कुशलं च शिवं तथा ॥

(क्षेम, कल्याण अभय, श्रेयस्, भद्र, मंगल, भावुक, भव्य कुशल आणि शिव एकार्थवाची आहेत.)

अमरकोशातील श्लोक असाच मंगल शब्दाचे अनेक अर्थ सांगणारा आहे. धनंजय नाममाला पेक्षा हा प्राचीन श्लोक आहे.

श्वः श्रेयसं शिवं भद्रं कल्याणं मंगल शुभम् ।
भावुकं भाविकं भव्यं कुशलं क्षेमं शस्त्रियाम् ॥

(स्व–श्रेयस, शिव, भद्र, कल्याण मंगल, शुभ, भावुक भविक, भव्य, कुशल, क्षेम आणि शस्त एकार्थवाची आहेत.)

गदगदून फांद्या हलवल्यानंतर सुगंधी फुलांचा सडाच पडावा तसेच या मंगल शब्दाचे आहे. धवल ग्रंथ, तिलोयपण्णत्ति, पंचास्तिकाय-अनगार धर्मामृत आदि ग्रंथातील मंगल शब्दाचे वर्णन पाहिल्यावर वरील विधानाची सत्यता पटते.

फुलाची एक पाकळी उलगडायचा अवकाश की पाठोपाठ भोवतालच्या अनेक पाकळ्या उघडून पूर्ण सुगंधी फूल व्हावे तसेच मंगल शब्दाचा अर्थ, व्याख्या पहातांना होते.

बहुतेक ग्रंथकारांनी मंगलाचरण केलेलेच आहे. त्यामुळे प्रसंगवशात् मंगल चर्चा करणे स्वाभाविक ठरले. साखर जास्त खाल्यामुळे साखरेचा वीट येतो. पण मंगल शब्दांची खूप चर्चा केली किंवा व्याकरणादि शास्त्राप्रमाणे शब्दार्थ, भावार्थ करीत बसल्यावर मंगल शब्दांचे स्वारस्य माधूर्य वाढते.

– ब्र. विद्युल्लता शहा
संपादिका, 'श्राविका'
श्राविका संस्थानगर,
सोलापूर–४१३ ००२

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

धार्मिक संस्कार

– ज. रा. तळ्ळणकर
निवृत्त मुख्याध्यापक, परभणी

घरात 'मुलगा' असावा. अशी प्रत्येकाची अपेक्षा असणे स्वाभाविक आहे. मुलीपेक्षा सर्वांना मुलेच अधिक प्रिय असतात. नवीन लग्न झालेल्या पती-पत्नीस प्रथम 'मुलगा' व्हावा अशी इच्छा असते. मुलांचे 'बारसे' करण्यात येऊन सर्वांना आनंद वाटतो. लहान वयात मुलांचे लाड होतात.

मुले १०-१२ वर्षे वयाची झाल्यावर घरातील आई-वडिलापेक्षा त्यांना बाहेरचे आकर्षण वाढू लागते. आपल्या समान असणाऱ्या मित्रा बरोबर राहावे, त्यांच्या बरोबर खेळण्यात वेळ घालवावा, अशी त्यांची इच्छा असते. त्यासाठी पालकानी व आई-वडिलांनी मुलांना चांगला व योग्य मित्र परिवार लाभावा व त्याना चांगली संगत लागावी, याकडे लक्ष पुरवावे. मुलावर धार्मिक संस्कार कसे दृढ होतील आणि राष्ट्रीय एकात्मता कशी वाढेल, याकडे शाळेतील शिक्षकानीही विशेष काळजी घ्यावयास हवी.

आजच्या या काळात भ्रष्टाचारास आळा घालण्यासाठी मुलाना लहान वयापासूनच या भ्रष्टाचारापासून अलिप्त ठेवावे, परंतु 'कुंपणच शेत खाऊ लागले तर।' शिक्षणातही पवित्र असणाऱ्या क्षेत्रात वातावरण भ्रष्ट झाल्याचे दृष्टोत्पत्तीस येत आहे. त्याचा विद्यार्थी, पालक व शिक्षकावर अनिष्ट परिणाम होत आहे. तेव्हा 'राष्ट्रीय' भावना पुन्हा जागृत करण्यासाठी समाज सुधारक, संत, विद्वान व राष्ट्रातील प्रमुख नेत्यानी या भ्रष्टाचाराविरुद्ध लढा देण्याची नितांत गरज आहे. त्यासाठी गुरूकुलांची स्थापना करून धार्मिक शिक्षणावर अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. मुलांच्या सर्वांगीण विकासाची काळजी घेतल्यास त्यांच्या भावी पिढीवर चांगला परिणाम होईल.

या संस्कार निर्मितीसाठी महिलांचा सहभाग महत्त्वाचा आहे. लहान मुले जन्मल्यापासून अधिक वेळ आईच्या सहवासात असल्यामुळे मुले आई-वडिलांच्या व घरातील वडील मंडळीच्या सान्निध्यात राहातात. त्यांचे अनुकरण करतात. म्हणून महिलानी मुला-मुलीवर योग्य व समाजास हितकर ठरतील. असे संस्कार घडविण्याचा प्रयत्न करावा. मुलाना नियमित पूजा-पाठ, स्तोत्रे व इतर धार्मिक कार्यक्रमाकडे आकर्षित करावे. हे धार्मिक कार्यक्रम कंटाळवाणे न होता त्यात त्याना गोडी वाटेल, याची दक्षता घ्यावी. पूजा अर्चा, अभिषेक यांचा सोप्या भाषेत अर्थ सांगून नवीन चालीवर भजन-पूजनाचा सराव ठेवल्यास त्यांची निष्ठा वाढेल.

अशा प्रकारे मुला-मुलीवर लहान वयात उत्तम संस्कार घडल्यामुळे उत्तम संस्कृती व त्यातून उत्तम कलाकृती निर्माण होऊ शकेल. प्राचीनकाळी नालंदा, तक्षशिला, अयोध्या अशा विद्यापीठातून गुरुकुल प्रणाली असल्यामुळे सुसंस्कारित विद्या-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

थ्यांची प्रगती झाली. मधल्या काळात पाश्चात्यांच्या आक्रमणामुळे गुरूकुल शिक्षण पद्धती खंडित होते की काय ? अशी भीती वाटू लागली. परंतु प. पू. समंतभद्र महाराजांच्या प्रेरणेने या गुरूकुल पद्धतीचा पुन्हा नव्याने उदय होऊन तरूण पिढीस धर्माबद्दल आदरभाव व देशाविषयी प्रेम निर्माण झाले. कारंजा, बाहुबली, वेरूळ, रामटेक, सोलापूर इत्यादि ठिकाणी गुरूकुलातून विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर स्वावलंबन व उत्तम चारित्र्याचे धडे देण्यात आले. नवागढ (उरवळद) येथे प. पू. आर्यनंदी महाराजानी गुरूकुलाची मुहूर्तमेढ रोवून या कार्याची दिशा दाखवून दिली आहे.

– ज. रा तळणकर
निवृत्त मुख्याध्यापक,
परभणी

महावीराचा पाळणा

(चाल : पापणीच्या पंखात झोपू दे)

चैत्रशुद्ध त्रयोदशीच्या दिवसी,
कुंडलपुरी जन्मला बाळा जो जो रे ॥ धृ ॥

सिद्धार्थ नृपति जगती मान्य,
त्रिशला माता झाली धन्य ।
जन्मा येउनि भूलोकीच्या
जीवा उद्धरिले ॥ १ ॥

इंद्रादिक सुर येउनि भुवरी
बाळा नेती मेरू शिखरी ।
अष्टाधिक दशशत कलशांनी,
बाळा अभिर्सिचिले ॥ २ ॥

रोग दैन्य जनतेचे गेले,
शांति सौख्य वृद्धिगत झाले ।
यास्तव बाळा ‘ वर्धमान ’ हे
नाव ठेवीयेले ॥ ३ ॥

नागाचे नी मत्त गजाचे,
भय वारूनी अभया दिधले ।
जय ‘वीर’ ध्वनि करिती जनही,
प्रमुदित अति झाले ॥ ४ ॥

सत्य अहिंसामय जीवन बनले,
स्याद्वादाचे कथनहि केले ।
मुनिशंकेचे वारण झाले,
‘सन्मति’ जिन झाले ॥ ५ ॥

पूर्व जन्मिचा रुद्र भयानक,
अज्ञानाने छळी अचानक ।
‘अतिवीर’ तुम्ही यतिगणनायक,
स्वामी रत झाले ॥ ६ ॥

कषाय नाशुनि कर्मं जिकले,
‘महावीर’ भव तरून गेले ।
आश्विन अमावस्येच्या रात्री,
सिद्धपदी रमले ॥ ७ ॥

कारंजा, **– कुमुदिनी काळे**

जर हवी तुम्हा शांती इंद्रियांच्या नसा वश ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हार्दिक शुभेच्छा !

" अहिंसक जीवनदृष्टी हीच खरी जीवनदृष्टी असून त्ती मुळेच व्यक्तीचे व्यक्तिगत कौटुंबिक व सामाजिक जीमन सुखी, समृद्ध व उन्नत होते. ' जगा व जगू द्या ' हा अहिंसेचा महामंत्र होय. "

महावीर वाणी

पारस किराणा स्टोअर्स

मु. पो. कोंढाळी जि. नागपूर

प्रोप्रा. जिनेश्वर तुकारावजी उमाठे
कोंढाळी

फोन : ०७११२-५८२२४

हार्दिक शुभेच्छा !

त लाभे स्वर्णकोटीने आयुष्याचा क्षणैकही ।
क्षणा घालविता व्यर्थ हानी त्याहून कोणती ? ।।

M/S KAMCO

५, ' सौभाग्य ' दुसरा मजला

अस्. के. बोले रोड, दादर मुंबई - ४०० ०२८

जेथे निवास लोभाचा तेथे संतोष ना कधी ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

WITH BEST COMPLIMENTS FROM

JIVARAJ RAVAJI GANDHI

P.o Akluj Dist. Solapur

Pin - 413 101

Phones : Shop - 522207, 522281

Residence - 522330 STD No. 0218

DEALER IN

★ Grains ★ Seeds ★ Fertilizers ★ Oil Seeds
★ Oil Cakes ★ Cattle Feed ★ Cement Etc.

BRANCHES ★ Natepute Ph 379
★ 169, Budhwar peth, Solapur
Ph. Office - 26206 Res. 28809
★ Arihant, Ruikar Colony, Kolhapur 5
Ph. - 26230

हार्दिक शुभेच्छा

आचार्य श्री १०८ आर्यनंदी महाराज
यांच्या शुभहस्ते संस्थापित

राऊत दि. जैन चॅरिटेबल ट्रस्ट

मु. पो. रिठद जि. अकोला

पिन- ४४४५१०

0 धर्म शिक्षण 0 विधवा परित्यक्ता कल्याण
0 शिबिरांचे आयोजन 0 धर्म साहित्य वितरण 0 रोग निदान शिबीरे
0 बेकारांना रोजगार 0 शिष्यवृत्ती
(दि. ३० जून पूर्वी अर्ज करावेत)

प्रमुख ट्रस्टी

श्री कांतिलाल ओंकारराव राऊत
रिठद - ४४४५१० जि. अकोला

हार्दिक शुभेच्छा

बंडप्पा बो. मुस्तारी

संचालक

मुंबई पूर्व उपनगर जिल्हा मजूर सहकारी संस्थांचा संघ मर्यादित

नाईक नगर, जी नॉर्थ, सागर हॉटेल
शेजारी, सायन-धारावी मेन रोड,
सायन, मुंबई - ४०००२२

स्वाध्यायाच्या विना जीवा तत्त्वज्ञान न लाभते।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आमच्या हार्दिक शुभ कामना

औषधी गुण जे काही सर्व ते पथ्यसेवनी ।
लंघनी गुण जे काही सर्व ते अल्पभोजनी ॥

महेश मेडिकल्स

रामनगर, वर्धा - ४४२००१

— महेश गांधी
रामनगर, वर्धा.

हार्दिक शुभ कामना

" सर्व जीवोंके साथ मेरी मैत्री वृत्ति है,
किसी के साथ मेरा वैर नही है ।"

बेद ब्रदर्स

किराणा दुकान

पानचंद चौक, वर्धा

— आर्. अेन्. वेद

हार्दिक शुभेच्छा !

नांदो विश्वी सदा शांती
सामंजस्य सहिष्णुता ।
मैत्रीभाव समानत्व
सत्यनिष्ठा दया क्षमा ॥

भगवती गृह उद्योग

मानापुरे रोड, वर्धा.

फोन : ३६४५

— गिरधरभाई दोशी

मीपणा हेच दुःखाचे जाण तू मूळ कारण ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आमच्या शुभ कामना

बोथरा ट्रेडर्स

किराणा ओळी, वर्धा-४४२ ००१

पशु खाद्य विक्रेता

– श्री स्वरूपचंद बोथरा

आमच्या हार्दिक शुभेच्छा !

धनराज मोतीलाल ओस्तवाल

मेन रोड, हिंगणघाट

☎ : 44078, 44870

आमच्या शुभ कामना

व्यंकटेश एंटरप्राईजेस

२८, इंदिरा मार्केट, वर्धा – ४४२ ००१

अधिकृत विक्रेता – सलोरा टी. व्ही; कॉम्पटन. बजाज पंखे.

आधुनिक पध्दतीचे लाकडी व स्टील फर्निचर, गिफ्ट आर्टिकल्स व स्टील भांडी

पी. व्ही. मापारी

हार्दिक शुभ कामना

पंचशील स्टोअर्स

कापड दुकान, कपडा लाईन,

वर्धा – ४४२००१

करुणा तोषवी सर्वा निवारी भय आर्तता ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दिगंबर जैन महासमिती
काळाची गरज

दिनकर महाजन
महामंत्री
दि. जैन महासमिती (महाराष्ट्र)
खामगांव

इ. स. १९७४-७५ काळात भ. महावीर २५०० वा निर्वाणोत्सव संपूर्ण भारत वर्षात आणि परदेशात सुद्धा फार मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. सर्वत्र धर्मप्रभावनेची लहर पसरली. त्यावेळी एक सर्व समावेशक ग्रंथ – एक ध्वज – एक प्रतीक यांची निर्मिती झाली- दिगंबर, श्वेतांबर, स्थानकवासी – तेरापंथी सर्व पंथ एकत्र आले. परंतु हे सर्व मृगजळच ठरले. आमच्या श्वेतांबरी धर्मबंधूनी श्री अंतरिक्ष पार्श्वनाथ दि. जैन तीर्थक्षेत्र शिरपूर आणि श्री क्षेत्र बाहुबली या ठिकाणी आक्रमण केले· विश्वासघात केला.

परंतु त्यावेळी समस्त दि. जैन समाजाचे एकमेव नेते स्व. श्री शांतीप्रसादजी जैन हे होते. ते दूरदृष्टी संपन्न होते. त्यांनी दि. जैन समाजाचेही संघटन बांधले होते. १९७४–७५ साली त्यांनी समस्त दि. जैन समाजाची प्रातिनिधिक संस्था म्हणून स्थापन केली· समाजातील अनेक लहान मोठ्या संस्था विलीन झाल्या. काही संलग्न झाल्या आणि थोड्याच काळात महासमिती ही राष्ट्रीय पातळीवरील संसद बनली.

खालीलप्रमाणे संस्थेचे उद्देश ठरले.

१) वीतराग देव, शास्त्र, गुरू, वर पूर्ण निष्ठा ठेवणे. अहिंसा, सत्य अनेकांत प्रचार

२) शाकाहार प्रचार, प्रसार

३) सामाजिक कुरिती, कुप्रथा नष्ट करणें.

४) सर्व उपजाती मध्ये सहकार्याची भावना वृद्धिगत करणे

५) भारतीय जैन पुरातन संस्कृतीचे संरक्षण

६) जैन संस्कृती, कला, विज्ञान, इतिहास यांना उजाळा देणें.

७) जैन साहित्य, दर्शन, पुरातत्व यावर प्रबंध लिहिणाचा साहित्यिकांना प्रोत्साहन देणे.

८) असहाय, बेरोजगार, अपंग वृद्ध व्यक्तींना सक्रीय सहकार्य करणे.

९) औषधालये, वाचनालये, पाठशाळा, स्वाध्याय मंडळाना प्रोत्साहन देणे.

१०) तीर्थक्षेत्र कमेटीला सहयोग देणे.

वरील दृष्टीकोण लक्षात ठेऊन महा– समितीचे सामाजिक संघटनाचे कार्य भारतात अग्रेसर होत आहे.

महाराष्ट्र प्रांतीय समितीचे कार्य त्याच दृष्टीने आज पावेतो चालत आले आहे. महा– समिती ही कोणत्याही धार्मिक वैयक्तिक बाबीमध्ये हस्तक्षेप करीत नाही. स्थानिक संघटनाला त्याचे स्वतंत्र्य कायम ठेऊन त्यांना सक्रीय सहयोग देण्याचे कार्य महासमिती करीत आहे. आणि म्हणूनच समाजातील सर्व प्रवृतीच्या व्यक्ती आणि संस्था यांना एकसंघ करण्याचे महत्वपूर्ण कार्य महासमितीचे माध्य- मातून होत आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

0 १८ वर्षावरील कोणतीही दिगंबर जैन त्यक्ती महासमितीची सदस्य होऊ शकते.

0 समाजातील मिथ्यात्व नष्ट करून समाज घटकांचे स्थितीकरण करण्याचे महत्वपूर्ण कार्य समिती करीत आहे.

0 आज पावेतो अनेक प्रकाशित ग्रंथाचे प्रकाशन महासमितीचे सहाय्याने केले गेले.

0 अनेक साहित्यकांना प्रोत्साहन देवून त्यांना समाजोन्मुख केले आहे.

0 शिक्षक मंचाचा एक प्रयोग महासमितीने केला होता.

0 पूर पीडित आणि भूकंप पीडित समाज बांधवांना भरघोस आर्थिक सहाय्य देऊन त्यांचें स्थितीकरण केले आहे.

0 दुर्बल महिलांना शिवण यंत्र देऊन त्यांच्या जीविकोपार्जनाला हातभार लावला.

0 तीर्थ क्षेत्र, यात्रा महोत्सव यांचा समाज संघटनासाठी उपयोग करुन घेण्याचे दृष्टीने सभा सम्मेलने, अधिवेशने घेण्यात आली.

0 समाजातील गुणवंत विद्यार्थी, पंडित, सेवाभावी कार्यकर्ते, स्वातंत्र्य सैनिक यांचा यथोचित सत्कार करून त्याचे ऋण फेडण्याचा समिती प्रयत्न करीत आहे.

0 समाजातील सधन व्यवतीं, संस्था यांना होतकरू परंतु गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळवून देण्याचे महत्वपूर्ण कार्य महासमिती सतत करीत आली आहे.

आज श्री शिखरजी वर जे श्वेतांबरी बंधूचे उघड उघड आक्रमण होत आहे. त्याचा प्रतिकार करण्यासाठी समिती कटिबद्ध आहे. त्यासाठी जनजागरणाचे कार्यं करण्याचे व्रत समितीने घेतले आहे. प्रस्तुत आंदोलन हे लवकर शमेंल असे वाटत नाही. वास्तविक प्रस्तुत तीर्थक्षेत्र हें संपूर्ण तया दिगंबर आम्नायाचे असून २० तीर्थंकर (दिगंबर) तेथे मोक्षास गेले आहेत. हे तीर्थराज आमचा मानबिंदू आहे. त्याचे संरक्षण संवर्धन करणें हे आमचे कर्तव्य आहे. त्यासाठी दिगंबर जैन समाजातील सर्व लहान मोठ्या सेवाभावी संस्था व व्यक्ती यांच्यामध्ये समन्वय साधणं अत्यावश्यक झाले आहे.

महासमिती, महासभा, शक्ती परिषद, युवामंच जैन इ. सर्व संस्था आपसातील लहान मोठे मतभेद बाजूला सारून एकत्र येणे आवश्यक आहे. ती प्रक्रिया सुरु झाली आहे.

आज ऐक्य, संघटन आणि साहिष्णुतेची अत्यंत आवश्यकता निर्माण झाली आहे. अशा प्रसंगी आमचे वरिष्ठ नेते साहू, श्री अशोक कुमारजी यांचा आदेश शिरसावंद्य मानून तीर्थराज समेद शिखरजी हित शत्रूपासून वाचविणे. हे एकमेव कार्यं दिगंबर जैन समाजा समोर आहे.

महाराष्ट्र दि. जैन महासमिती त्या दृष्टीने सक्रिय आहे. या अनुषंगानेच दिल्लीला जो २ लाख धर्मंबंधूचा मूक मोर्चा निघाला होता, त्यामध्ये महासमितीचा फार मोठा वाटा आहे. त्यासाठी ठिकठिकाणी संपर्क साधायाचा प्रयत्न होत आहे. सम्मेद शिखरजी क्षेत्रावर जाऊन करसेवा करावी लागेल त्यासाठी स्थानिक ते प्रांत घटकांना जागृत करणे व संघर्षासाठी उधुक्त करणे आवश्यक आहे करिता दि. जैन समाजाची सर्वं समाजक संस्था दि. जैन महासमितीचे अस्तित्त्व ही काळाची गरज आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पंच कल्याणक महोत्सव

– लालचंद हरिश्चंद्र. मानवत.

त्रिलोकतिलक तीर्थंकरांच्या पंच-कल्याणिक महोत्सव स्वर्गातील देवांच्या जीवनातील सर्व श्रेष्ठ आनंदाचे क्षण असतात, मग तेच मानवी जीवनात सुद्धा सर्वश्रेष्ठ आनंद कां देऊ शकणार नाहीत ? याच साठी दरवर्षी अनेक ठिकाणी प्रतिष्ठा महोत्सव होत असतात. त्यानिमित्ताने मंदिरांचे आणि मूर्तीचे फार मोठ्या प्रमाणात निर्माण होते. सध्या एक सामाजिक धारणा होऊन बसली आहे की, असंख्य जैन समाजावर अनेक तीर्थक्षेत्रे-असंख्य मूर्ती सांभाळण्याची जबाबदारी अगो, दरच आहे, त्यात पुन्हा नव्या मंदिराची आणि मूर्तींची भर कशाला ? असा विचार करणे हे डोक्याचे काम आहे आणि उत्सव साजरा करणे हे हृदयांचे काम आहे. डोक्याचा विचार पक्ष आणि हृदयाचा भावपक्ष या दोन्हीत भाव पक्षाचे विचार पक्षावर मात केली आहे. अशा वेळी मुमुक्षु जीवांनी श्रेयस्कर प्रेरणा घेऊन शुभकर्ममय जीवनाची सफल साधना करून घ्यावी. 'मूर्तियाँ तो बन रही है, हम भी कुछ तो बनें, इसलिए उत्सवों के माध्यम से प्रेरणा लेकर आगे बढो ।' अशा अर्थाचे विचार कुठे तरी वाचल्याचे आठवते.

निष्पक्ष वक्ता मिळणे कठिणच. निष्पक्ष श्रोता सुद्धा. यथासमय ज्ञानी वक्ता स्वतः एखाद्या दृष्टिकोणातूच एखाद्या गुणधर्मास मुख्य करून वर्णन करतो, त्यावेळी इतर गुणधर्म गौण होतात पण निषिद्ध होत नाहीत. निष्पक्ष श्रोता त्याच्या प्ररूपणास लक्षपूर्वक श्रवण करून वस्तूच्या यथार्थ अखंड व्यापक-रूपास ग्रहण करतो. हे न्याय संगत आहे. वक्ता ज्या अभिप्रायाने बोलतो त्या एकांश-ग्राही ज्ञानास नय म्हणतात- त्रिलोक मंगल तीर्थंकरांच्या पंचकल्याणिकाकडे अशाच एका बोलक्या अभिप्रायाने पहाणारे वर्णन पुढे देत आहे. नयचक्र ग्रंथात असे वर्णन आहे की, जरी मोक्षरूप कार्यांमध्ये भूतार्थ निश्चय नयाने जाणलेल्या आत्माचे दानकारण सर्वा-जवळ आहेच, तरी सुद्धा ती आत्मा सहकारी कारणाविना मुक्त होत नाही. म्हणून सहकारी कारणाच्या प्रसिद्धीसाठी व्यवहार नयाचा अविनाभाव संबंध आहे. तीर्थंकरांचे पंच-कल्याणिक हा व्यवहार आहे. त्याकडे निश्चय नयाच्या दृष्टिकोणातून पहाणे किती रम्य आहे. हे वाक्य येथे 'कर्मक्षयाय शुद्धनयः' हे लक्षात घ्यावे आणि पंचकल्याणिकाचा श्रेष्ठ आनंद उपभोगावा.

(ममल पाहुड ग्रंथाच्या द्वितीय भागाच्या आधारे)

१) गर्भकल्याणिक –

जब जिनु गर्भवास अवतरिओ ।
ऊर्ध्वध्यान मनु लायो ॥
दर्शनज्ञान चरण तव चरियो ।
उन उवन सिधि चित लायो ॥

(**भावार्थ** – श्री जिनेंद्रभगवान जेव्हां श्रद्धालु सम्यग्दृष्टी भव्य जीवाच्या मानस गर्भात निवास करतात, तेव्हां त्या भव्य जीवाचे मनच गर्भ आहे. तेथे तेव्हां स्वतःच्या कारण पर-मात्म्याचे मनन होते तेव्हां मनाची एकाग्रता

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

होते, उत्तम धर्मध्यान जमते अशा वेळी निश्चय सम्यग्दर्शन, निश्चय सम्यक्ज्ञान, निश्चय सम्यक्चारित्र आणि निश्चय सम्यक्तप या चारी आराधनांचे आरोहन होते अर्थातच आत्मध्यानातच दर्शन ज्ञानचारित्र तप गर्भित आहेत. त्यासमयी प्रकाशमान सिद्ध भगवानांचा स्वभाव अनुभवला जातो. शुद्धात्मरूप परिणती होत राहते.)

२) जन्मकल्याणिक –

(जन्म कल्याणिकाचे येथे प्रयोजन असे आहे की, जेव्हां प्रकाशरूप तीर्थंकर भगवान भव्य जीवाच्या भाव भासनेत स्वयं उत्पन्न झालेले आहेत अर्थात परमात्म तत्त्व भव्य ज्ञानीच्या मनी झळकत आहे तेव्हां ज्ञानीचे मानस प्रकाशमय आहे. तेव्हां ते प्रकाशमान आत्मिक पद अत्यंत हितकारी व सहकारी प्रगट झाले आहे. या आत्म भावामध्ये रमण करीत राहिल्यांमुळे जणु कांही मुक्तिदर्शनच होत.

३) तप कल्याणिक –

जब जिनु रमन उवळे ।
अन्भोय न्यान चितु लायो ॥
न दिप्ति दिस्टि पिंड शब्द रमन जिनु ।
सहसमय मुक्ति सिध्दु पाए ।

(**भावार्थ** – जेव्हां श्री तीर्थंकर भगवान रत्नमय रमणता स्वरूप तपास धारण करतात तेव्हां स्वतःमध्ये निश्चय रत्नत्रय स्वरूपी आत्मानुभूतीना उदय झालेला आहे. चित्तामध्ये ज्ञानानंद प्रकाशला आहे. तेव्हां मी आत्मज्ञान प्रकाशक परम प्रिय ॐ आदि शब्दाद्वारा शुद्ध स्वभावात विहरू लागलो. त्यामुळे आत्मा–मुक्ती प्रत स्वयं पोहोंचत आहे.)

४) केवलज्ञान कल्याणिक –

उत्पन्नं रंजुभय विपंक रमन जिनु ।
नन्द नन्द खुद पाए ॥
हियथार रंजु तं अमिय रमनु जिनु ।
आनंद मुक्ति पाए ॥
अब मै पाए है स्वामि

(**भावार्थ** – ज्या परमात्म्यामध्ये अनंत सुख प्रगटते, ज्याचे सारे भय नाश पावले, जो वीत राग भावात रमला आहे. निजानंदामध्ये मग्न आहे, अशा प्रभुचे दर्शन प्रगट झाले अर्थात् स्वतःचा परमात्म लाभ झाला तोच स्वतःला हितकारी आहे. तो आनंदामृताचा स्वाद घेऊन मोठ्या आनंदाने मुक्तींमध्ये रमून गेला आहे.)

५) मोक्ष कल्याणिक –

सहयार रंजु पै दिप्ति रमन जिनुद्धि ।
अगमु अगमु रिधि पाए ॥
अगमु अगोचर अलप्त रमन जिनु ।
सित रमन जिन राए ॥

